


सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह

धाराशिव | रविवार, ११ जानेवारी २०२६ | वर्ष ३ रे अंक ३१२ | पाने १२+८ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com









# होय, आम्हीच करणार सोलापूरचा कायापालट!

## मुख्यमंत्री फडणवीसांचा सोलापूरकरांना 'शब्द'

- २०१४ पासून सोलापूर शहराच्या विकासात मोठी भर
- दररोज पाणीपुरवठा, २०५७ सालपर्यंतचे व्हिजन
- आयटी पार्क होणार, १०० ई बसेस येणार
- लाडकी बहीण योजना सुरुच राहणार
- फडणवीसांनी परिधान केला बाराबंदी पोषाख
- 'भाजपा'च्या विजयासाठी सिध्दरामेश्वरांना साकडे



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० जानेवारी-**

काँग्रेस-राष्ट्रवादीच्या सरकारकडून तब्बल ७० वर्षे सोलापूर विकासापासून दुर्लक्षित राहिल्याचा आरोप करुन आता या शहरात विविध विकासकामे आणून शहराचा संपूर्ण कायापालट आम्हीच करणार असल्याचा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापुरातील जाहीर सभेत दिला. दरम्यान, आगामी ५ वर्ष मनपाच्या माध्यमातून सोलापूरच्या जनतेची सेवा करण्याची संधी मिळावी, असेही साकडे ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वरांना मी घातले आहे. श्री सिध्दरामेश्वर आमच्या पाठीशी असल्याचा आत्मविश्वासही त्यांनी व्यक्त केला.

देवाभाऊ मुख्यमंत्री असेपर्यंत लाडकी बहिण योजना सुरुच राहणार असून लखपती दिदी योजनेतून बहिणींना लखपती करणारच, अशी घोषणा देखील फडणवीसांनी केली. सोलापूर मनपा निवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित 'विजय संकल्प सभेत' ते बोलत होते. व्यासपीठावर पालकमंत्री जयकुमार गोरे, आ.सुभाष देशमुख, आ. विजयकुमार देशमुख, आ.देवेंद्र कोठे, आ.सचिन कल्याणशेट्टी, आ.समाधान आवताडे, अण्णासाहेब पाटील महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, माजी खासदार डॉ.जयसिध्देश्वर महास्वामी, माजी आमदार दिलीप माने, राजाभाऊ राऊत, प्रशांत परिचारक, राम सातपुते, नरसिंग मेंगजी, शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, शशिकांत चव्हाण, शहाजी पवार, चेतनसिंह केदार-सावंत, मनिष देशमुख, विकास वाघमारे उपस्थित होते. **(उर्वरित वृत्त पान २ वर)**

### लाडक्या बहिणींना बनविणार 'लखपती दीदी'

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला लखपती दीदी ही योजना दिली आहे. सोलापूर महानगरपालिकेवर भारतीय जनता पार्टीची सत्ता आल्यानंतर सोलापूर शहरातील लाडक्या बहिणींना लखपती दीदी बनविण्यात येणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. महाराष्ट्रातील भगिनींसाठी सुरु करण्यात आलेली लाडकी बहीण योजना बंद होईल, असे विरोधकांकडून खोटे सांगण्यात येत आहे. जोपर्यंत देवाभाऊ मुख्यमंत्री आहे, तोपर्यंत लाडकी बहीण योजना बंद होणार नाही. याउलट महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींना लखपती दीदी करण्याचे काम वेगाने सुरु आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरु केलेल्या लखपती दीदी या योजनेच्या महाराष्ट्रात ५० लाख लाभार्थी महिला आहेत. पुढील चार महिन्यात लखपती दीदी या योजनेचा एक कोटी महिलांना लाभ मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

### 'आयटी पार्क'द्वारे रोजगार निर्मिती

सोलापूरकरांचे अनेक वर्षांपासून स्वप्न असलेले 'आयटी पार्क'चा विषय मार्गी लागला आहे. 'आयटी पार्क' माध्यमातून स्थानिक पातळीवर म्हणजेच सोलापुरातील तरुणांना सोलापुरातच मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करुन दिले जाणार आहे. मुख्यमंत्र्यांनी केलेल्या वक्तव्यामुळे सोलापूरच्या तरुणांच्या आशा पल्लवित झाल्याचे दिसून येत आहे.

**ठाकरे सरकारच्या काळातील निर्णय बदलणार :** सोलापूर शहरातील सीटीबस सेवा विस्कळीत झाली आहे. नव्याने १०० ई-बसेस सेवा देणार आहे. यासाठी आवश्यक असलेले चार्जिंग स्टेशनचेही काम अंतिम टप्प्यात आले आहे. ठाकरे सरकारच्या काळातील झालेले चुकीचे निर्णय मी बदलणार आहे. यंत्रमाग नगरी असलेल्या सोलापुरात इचलकरंजी पॅटर्न राबवून शहराला नव्याने उभारी देण्याची ग्वाही दिली.

## विचारपुष्प




काम करताना भावनिक संयम ठेवण्याची आपली क्षमताही असावयास हवी. चिडखोरपणाने किंवा क्षुल्लक कारणाने भावना प्रक्षुब्ध होऊन आवेशाने वा फटकळपणे बोलण्यामुळे कामाची हानी होते.

**एकनाथ रानडे**

रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

## विनम्र अभिवादन



माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचा आज स्मृतिदिन

# फडणवीस, शिंदेंना तुरुंगात टाकण्याचा होता कट!

## ● एसआयटी अहवालातून धक्कादायक खुलासे

**मुंबई, १० जानेवारी**

राज्याच्या राजकारणात खळबळ उडवून देणारे एक अत्यंत गंभीर आणि धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकवून थेट तुरुंगात टाकण्याचा योजनाबद्ध कट रचण्यात आल्याचा खुलासा राज्य सरकारने नियुक्त केलेल्या विशेष तपास पथकाच्या अहवालात करण्यात आला आहे.

या प्रकरणाची सुरुवात २०२४ मध्ये झाली. विधान परिषद सदस्य प्रवीण दरेकर यांनी विधानसभेत तत्कालीन विरोधी नेते देवेंद्र फडणवीस आणि शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांना राजकीय सूडबुद्धीने लक्ष्य केल्याचा आरोप केला होता. त्यानंतर उद्योगपती संजय पुनामिया यांनी एक खळबळजनक स्टिंग व्हिडीओ आणि ऑडिओ क्लिप समोर आणली. या स्टिंगमध्ये मुंबईचे निवृत्त सहायक



पोलिस आयुक्त सरदार पाटील हे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या दबावाखाली फडणवीस आणि शिंदे यांच्याविरोधात गुन्हे कसे रचले जात होते, याची माहिती देताना दिसतात. या कटाचा मुख्य उद्देश दोन्ही नेत्यांना अर्बन लॅण्ड सीलिंग (यूएलसी) प्रकरणात अडकवून अटक करणे, हाच असल्याचे या व्हिडीओतून स्पष्ट होते.

**मला अडकविण्याचा प्रयत्न फसला**

महाविकास आघाडीने मला खोट्या प्रकरणांमध्ये अडकविण्याचे शर्थीचे प्रयत्न केले. ते यात यशस्वी झाले नाहीत, त्यांचे प्रयत्न फसले. मात्र, अलिकडे आलेल्या एका एसआयटीच्या अहवालातून त्यांचे हे कारस्थान आता उघड झाले आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

### माजी डीजीपी संजय पांडे रडारवर

एसआयटी अहवालात महाराष्ट्राचे माजी पोलिस महासंचालक संजय पांडे, ठाण्याचे तत्कालीन डीसीपी लक्ष्मीकांत पाटील आणि एसीपी सरदार पाटील यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. अहवालानुसार, संजय पांडे यांनी या दोन्ही नेत्यांना यूएलसी घोटाळ्यात अडकविण्यासाठी अधीनस्थ अधिकाऱ्यांवर सातत्याने दबाव टाकला. फडणवीस आणि शिंदे यांनी बिल्डर्सकडून पैसे घेतल्याचे कबूल करण्यासाठी धमक्या देण्यात आल्या. कॅमेऱ्यावर जबाब देण्यासाठी साक्षीदारांना भाग पाडण्यात आले. एसआयटीचा निष्कर्ष आहे की ही संपूर्ण प्रक्रिया योजनाबद्ध, राजकीय हेतूने प्रेरित आणि कायद्याचा दुरुपयोग करणारी होती. ■

# राममंदिरात नमाज पठणाचा प्रयत्न फसला

### काश्मिरातील अबू अहमद शेखला पोलिसांनी केली अटक

**अयोध्या, १० जानेवारी**

अयोध्येतील राममंदिराच्या दक्षिणेतील भागात नमाज पठनाचा प्रयत्न करण्याचा खळबळजनक प्रयत्न शनिवारी उधळण्यात आला. अबू अहमद शेख, असे नमाज पठन करणाऱ्याचे नाव आहे. त्याला रोखण्याचा प्रयत्न केला असता, त्याने धार्मिक घोषणाबाजी केली.

मात्र, सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्याला ताब्यात घेऊन रामजन्मभूमी पोलिसांच्या हवाली केले. पोलिस आणि गुप्तचर यंत्रणा अबू अहमद शेखची चौकशी करीत आहे. तो शोपियाँ जिल्ह्यातील असल्याचे स्पष्ट झाले असून, पोलिस अधीक्षक बलरामाचारी दुबे यांनी या घटनेच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. शेखची चौकशी केली जात असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस अधीक्षक डॉ. गौरव ग्रोव्हर यांनी दिली. शेख आज सकाळी गेट क्रमांक डी-१ मधून मंदिर परिसरात दाखल झाला होता. रामलल्लाचे दर्शन घेतल्यावर तो मंदिर संकुलातील 'सीता रसोई' भागात गेला. तिथे दक्षिण परिमिती भिंतीजवळ बसून त्याने नमाजची तयारी सुरू केली.

घटनेच्या वेळी त्याने पारंपरिक काश्मिरी पोशाख परिधान केला होता. घटनेची माहिती मिळताच गुप्तचर विभागाचे वरिष्ठ अधिकारी, वरिष्ठ पोलिस अधिकारी आणि जिल्हा प्रशासकीय अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली.









CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### मणिपूरमध्ये तीन बंडखोरांना अटक

**इम्फाळ** : सुरक्षा दलांनी मणिपूरच्या खोऱ्यातील जिल्ह्यांमध्ये विविध प्रतिबंधित संघटनांशी संबंधित तीन दहशतवाद्यांना अटक केली. प्रतिबंधित कांगलेपाक कम्युनिस्ट पार्टी (नोयोन) च्या एका सक्रिय कार्यकर्त्याला गुरुवारी इम्फाळ पूर्व जिल्ह्यातील कोंगपाल चिंगांगबाम परिसरातून अटक करण्यात आली, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. पश्चिम जिल्ह्यातील आंबोइखोंगनांगखोंग परिसरातून प्रतिबंधित प्रेपाक (प्रो) च्या एका सदस्याला अटक करण्यात आली. प्रतिबंधित पीपल्स लिबरेशन आर्मीच्या एका कार्यकर्त्याला खंडणीच्या कारवायांमध्ये सामील असल्याच्या आरोपावरून गुरुवारी इम्फाळ पश्चिम जिल्ह्यातील नागाराम परिसरातून अटक करण्यात आली. त्याच्या ताब्यातून दहा मागणी पत्रांचे एक पाकीट जप्त करण्यात आले.

### बेकायदेशीर ड्रग कारखाना उद्ध्वस्त

**आगर माळवा** : मध्य प्रदेशातील आगर मालवा जिल्ह्यात पोलिसांनी शनिवारी एका बेकायदेशीर मादक पदार्थ निर्मिती कारखान्याचा छडा लावला. सुमारे १० कोटी रुपये किमतीचे मेफेड्रोन जप्त केले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. ही फॅक्टरी जिल्हा मुख्यालयापासून सुमारे २० किलोमीटर अंतरावर, इंदूर-कोटा राष्ट्रीय महामार्गाजवळ एका फार्महाऊसमध्ये होती. आमला गावातील तीर्थ हर्बल नर्सरी फार्महाऊसमध्ये मेफेड्रोनची निर्मिती केली जात आहे आणि कोणीतरी मोठा साठा घेण्यासाठी येणार असल्याची माहिती केंद्रीय मादक पदार्थ विभागाला मिळाली होती, असे केंद्रीय मादक पदार्थ विभाग उज्जैन शाखेचे अधीक्षक मुकेश खत्री म्हणाले. उज्जैन, जावरा आणि नीमच युनिटच्या संयुक्त पथकाने पहाटे ४ वाजता घटनास्थळी पोहोचून कारवाई सुरू करण्यापूर्वी परिसराला सर्व बाजूंनी वेढा घातला. तथापि, सकाळी १० वाजेपर्यंत कोणीही साठा घेण्यासाठी आले नाही. फार्महाऊसच्या झडतीदरम्यान, अधिकाऱ्यांनी सुमारे १० कोटी रुपये किमतीचे ३१.२५ किलो मेफेड्रोन आणि मादक पदार्थ बनवण्यासाठी वापरले जाणारे ६०० किलो रसायने जप्त केली.

### डॉ. संग्राम पाटील पोलिसांच्या ताब्यात

**मुंबई** : लंडनस्थित डॉक्टर आणि लोकप्रिय युट्यूबर संग्राम पाटील यांना एका भाजप पदाधिकाऱ्याने दाखल केलेल्या मानहानीच्या प्रकरणात शनिवारी सकाळी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर ताब्यात घेण्यात आले. डॉ. पाटील लंडनहून आल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांची पत्नीसह चौकशी करण्यात आली. प्राथमिक तपासानंतर त्यांना सोडून देण्यात आले, असे अधिकाऱ्याने सांगितले. ही कारवाई भाजपच्या माध्यम विभागाचे पदाधिकारी निखिल भामरे यांच्या तक्रारीवरून दाखल करण्यात आली. पाटील यांनी सत्ताधारी पक्षाबद्दल खोटी माहिती पसरवली आणि त्यांच्या नेत्यांविरुद्ध अपमानास्पद टिप्पणी केली असल्याचा आरोप भामरे यांनी केला.

# पुणेकरांना मोफत बस, मेट्रोसेवा

## दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचा संयुक्त जाहीरनामा

मनपा निवडणूक रणधुमाळी

◆ **पुणे, १० जानेवारी**

गर्दी नियंत्रण, प्रदूषणात घट आणि इंधनाची बचत व्हावी, यासाठी सत्ता आल्यास पुणेकरांसाठी मोफत बस आणि मेट्रो प्रवासाची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल, असे आश्वासन दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने दिले आहे. पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने शनिवारी जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. त्यामध्ये हे आश्वासन दिले आहे.

सत्ताधारी महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस आणि विरोधातील महाविकास आघाडीमधील घटकपक्ष शरद पवार गट यांनी अष्टसूत्री प्रगतीचा जाहीरनामा प्रकाशित केला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह खासदार सुप्रिया सुळे, खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्यासह स्थानिक आमदार आणि अन्य नेते उपस्थित होते. याप्रसंगी अजित पवार म्हणाले की, ''पुण्यात दररोज ३० लाख वाहने रस्त्यावर धावतात. त्यामुळे वाहतूक कोंडी होऊन इंधन आणि वेळेचा अपव्यय होतो. पुणेकर दररोज ३० कोटी रुपये म्हणजे वर्षाला १० हजार ८०० कोटी प्रवासावर खर्च करतात. मोफत बस आणि मेट्रो सेवा दिल्यास दोन्ही कंपन्यांना वर्षाला फक्त ३०० कोटी द्यावे लागतील.'' पुण्यात सध्या टँकर माफियांचा दबदबा आहे. परिणामी शहराला दररोज नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी आणि टँकर माफियांचा प्रभाव रोखण्यासाठी पाणीपुरवठा यंत्रणा सुधारण्याची ग्वाही देतानाच उपमुख्यमंत्र्यांनी पुण्यातील जुने वाडे, म्हाडाच्या इमारतींचा पुनर्विकास, झोपडपट्टी पुनर्वसन आणि १५० आदर्श शाळा उभारण्याची आश्वासनेही जाहीरनाम्यात दिली आहेत. (वृत्तसंस्था)



### 'राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेशिवाय जिवंत राहूच शकत नाही'

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सत्तेशिवाय जिवंत राहूच शकत नाही. पुणे आणि पिंपरी-चिंचवड येथे दोन्ही पक्ष एकत्र लढत आहेत. कदाचित सुप्रिया सुळे यांना केंद्रात तर रोहित पवारांना राज्यात मंत्रिपद मिळू शकेल, या आशेने दोन्ही पक्ष एकत्र आले असावेत. पक्षाची विचारधारा हा मुद्दाच नाही, अशी जोरदार टीका काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

### जाहीरनाम्यातील काही महत्त्वाची आश्वासने

- १ एप्रिल २०२६ पासून ५०० फुटांपर्यंतची घरे पूर्णपणे मालमत्ता करमुक्त असतील.
- विद्यार्थ्यांना डेटा प्लॅनसह मोफत टॅबलेट मिळेल.
- महिलांना स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी अथवा विस्तारण्यासाठी पाच लाखांपर्यंत व्याजमुक्त कर्ज.
- गुंठेवारी नियमितकरण प्रक्रिया ऑनलाइन व पारदर्शक केली जाईल. -सर्व कायदेशीर विकसित मालमत्तांना संपूर्ण संरक्षण दिले जाईल.
- तीन वर्षांमध्ये प्रकल्प पूर्ण न झाल्यास, विस्थापितांना देण्यात येणाऱ्या दरमहा भाड्याची दुप्पट रक्कम देण्याची तरतूद.
- पावसाळ्यातील पुरस्थिती, पाणी साचणे नियंत्रित करण्यासाठी व्यापक अभ्यास करून दीर्घकालीन व प्रभावी पायाभूत सुविधा आधारित उपाययोजना केल्या जातील.
- नैसर्गिक जलनिचरा प्रणालीच्या संरक्षणासाठी नाले, ओढे बुजविण्यावर कडक निर्बंध घातले जातील आणि यांच्या पुनरूज्जीवनाला प्राधान्य दिले जाईल.

# 'भोली सूरत, दिल के खोटे'

## शेलारांची उद्धव ठाकरे यांच्यावर घणाघाती टीका

◆ **मुंबई, १० जानेवारी**

भ्रष्टाचाराचे पाठीराखे आणि कंत्राटदारांचे रखवालदार तर हे आधीपासूनच आहेत. मात्र आता खोटी, विघातक षड्यंत्र रचणारे, कपटी आणि कारस्थानी चेहरेही समोर आले आहेत. त्यामुळे उद्धव ठाकरे यांना 'भोली सूरत, दिल के खोटे' असेच म्हणावे लागेल, अशा शब्दांत शेलार यांनी घणाघाती टीका केली.

संजय पांडे प्रकरणाचा उल्लेख करताना शेलार म्हणाले की, तपास यंत्रणांकडे आलेल्या माहितीनुसार तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्यासाठी तत्कालीन पोलीस महासंचालक संजय पांडे यांनी पोलिस अधिकाऱ्यांवर दबाव टाकला होता. मात्र, खरा प्रश्न असा आहे की, संजय पांडेंवर नेमका कोणाचा दबाव होता? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.



उद्धव ठाकरे यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळावर टीका करताना आशिष शेलार म्हणाले, त्या काळात सीबीआयसारख्या केंद्रीय तपास यंत्रणांनी काम करू नये, ईडीने आर्थिक गुन्हेगारांवर कारवाई करू नये आणि पोलिसांनी सामान्य नागरिकांवर खोटे गुन्हे दाखल करावेत, अशी परिस्थिती राज्यात का निर्माण झाली? याची उत्तरे उद्धव ठाकरे यांनी जनतेला द्यावी लागतील. (तभा वृत्तसेवा)

### अलिबागमध्ये करण्यात आली पाणपक्षी गणना

**मुंबई** : बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीने महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील अलिबागजवळ पाणपक्ष्यांची गणना केली. यामुळे पाणपक्ष्यांमधील स्थलांतराचा कल समजण्यास आणि पाणथळ जागांची स्थिती जाणून घेण्यास मदत होईल. महाराष्ट्र वन विभाग (मँग्रोव्ह सेल) यांच्या सहकार्याने आक्षी समुद्रकिनाऱ्यावर 'एशियन वॉटरबर्ड सेन्सेस' आयोजित करण्यात आला होता. या गणनेदरम्यान, एकूण ८०९ किनारी पक्ष्यांची नोंद करण्यात आली. निरीक्षणात आढळलेल्या प्रमुख प्रजातींमध्ये तपकिरी डोक्याचा सीगल, काळ्या डोक्याचा सीगल, लेसर सॅण्ड प्लोव्हर, रडी टर्नस्टोन आणि व्हिम्ब्रेल यांचा समावेश असल्याचे बीएनएचएसने प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.



### लोकांना विकास हवा, 'ब्रॅण्ड नव्हे': शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे येथे बोलताना ठाकरे बंधूंवर जोरदार टीका केली. मतदारांना आता तथाकथित 'ब्रॅण्ड' नव्हे तर विकास हवा आहे, असे शिंदे कल्याण-डोंबिवली येथे आयोजित प्रचारसभेत बोलत होते. हा भाग महायुतीचा बालेकिल्ला असून कल्याण-डोंबिवली मनपावर भगवा फडकेल, असा आत्मविश्वास उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.



### ओवेसींचे विधान बेजबाबदारपणाचेः बोंडे

हिजाब घालणारी महिला एक दिवस या देशाची पंतप्रधान होऊ शकते, असे एमआयएमचे नेते असादुद्दीन ओवेसी यांचे विधान बेजबाबदारपणाचे आहे, अशी टीका भाजपचे खासदार अनिल बोंडे यांनी केली आहे. एकीकडे इराणमध्ये हिजाबविरूद्ध आंदोलन सुरू असताना ओवेसींनी केलेले वक्तव्य त्यांचाच फोलपणा उघड करणारे असल्याचे बोंडे म्हणाले.

# पोक्सो कायद्याचा गैरवापर रोखण्यासाठी उपाय करा

## सर्वोच्च न्यायालयाचा केंद्र सरकारला निर्देश

◆ **नवी दिल्ली, १० जानेवारी**

सर्वोच्च न्यायालयाने मुलांवरील लैंगिक गुन्ह्यांशी संबंधित संरक्षण कायदा पोक्सोचा गैरवापर चिंतेची बाब असून, यावर तोडगा काढण्यासाठी उपाययोजना करावी, असा निर्देश सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला दिला.

एका प्रकरणावर सुनावणी करताना न्यायालयाने केंद्र सरकारला रोमियो-ज्युलिएट क्लॉज आणण्याचा विचार करण्यास सांगितले, जेणेकरून सहमतीने तयार झालेल्या खऱ्या किशोरवयीन संबंधांना (टीनएज रिलेशनशिप्स) कायद्याच्या कठोर तरतुदींमधून वगळता येईल. न्या. संजय करोल आणि न्या. एन. कोटिश्वर सिंह यांच्या न्यायासनाने सुनावणीवेळी सांगितले की, पोक्सोसारख्या कठोर कायद्याचा मोठ्या प्रमाणावर होणारा गैरवापर रोखण्यासाठी सरकारने प्रभावी पावले उचलणे आवश्यक आहे. आम्ही दिलेल्या निर्देशाची एक प्रत कायदा सचिवांना पाठवली जावी, जेणेकरून कायद्यातील संभाव्य सुधारणांवर विचार करता येईल. याशिवाय अशी एक प्रणाली तयार केली जावी, ज्यामुळे या कायद्यांचा गैरवापर करून सूड घेऊ इच्छिणाऱ्यांवर खटला चालवता येईल. (वृत्तसंस्था)

### पीडितेची वैद्यकीय वय निर्धारण चाचणी गरजेची

सर्वोच्च न्यायालयाने अलाहाबाद उच्च न्यायालयाचा आदेश रद्द करताना म्हटले की, पोक्सोच्या प्रत्येक प्रकरणात जामिनाच्या स्तरावर पीडितेची वैद्यकीय वय निर्धारण चाचणी करणे गरजेचे आहे. कलम ४३९ अंतर्गत पीडितेचे वय निश्चित करणे हा खटल्याचा विषय आहे. जर वयाबाबत वाद असेल, तर न्यायालय केवळ सादर केलेल्या कागदपत्रांवरून जामिनाचा निर्णय घेऊ शकते. मात्र त्यासाठी सत्यता तपासणे गरजेचे आहे. कायद्याचा वापर सूड घेण्यासाठी किंवा स्वार्थासाठी केला जातो, तेव्हा यामुळे न्यायव्यवस्थेवरील लोकांचा विश्वास कमी होतो.

### काय आहे प्रकरण?

हे प्रकरण उत्तर प्रदेश सरकारच्या त्या याचिकेशी संबंधित होते, ज्यात त्यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या एका आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्या आदेशात उच्च न्यायालयाने अल्पवयीन मुलीच्या लैंगिक छळाच्या एका प्रकरणात आरोपीला जामीन दिला होता. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा आदेश चुकीचा ठरवला, परंतु आरोपीला दिलेला जामीन कायम ठेवला.

### रशिया, चीन, इराणचा समुद्रात युद्धाभ्यास

**तेहरान** : दक्षिण आफ्रिकेच्या समुद्रात केपटाऊनजवळ चीन, रशिया आणि इराणच्या नौदलाने एकत्र युद्धाभ्यास सुरू केला असून, अमेरिकेच्या धमक्यांना प्रत्युत्तर म्हणून याकडे पाहिले जात आहे. ब्रिक्स समूहातील तीन देश विल फॉर पीस २०२६ अंतर्गत युद्धाभ्यास करीत आहे. व्हेनेझुएलावर केलेला हल्ला आणि इराणमधील संघर्षात हस्तक्षेप करण्याच्या अमेरिकेच्या धमकीच्या पृष्ठभूमीवर तिन्ही देशांचे नौदल युद्धाभ्यासात सहभागी झाले. ट्रम्प यांनी यापूर्वीच ब्रिक्सला अमेरिकेच्या विरोधातील संघटना म्हटले आहे. अशातच आता ब्रिक्स देश चीनच्या नेतृत्वात अभ्यास करत आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी सोमनाथ मंदिराला भेट देऊन अभिषेक केला. या मंदिरावर परकीय आक्रमक महमूद गझनीने आक्रमण केल्याच्या घटनेला एक हजार वर्षे पूर्ण झाली. हजार वर्षे होऊनही सोमनाथ स्वाभिमानाने उभे आहे. यानिमित्त ८ ते ११ जानेवारीदरम्यान 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' साजरे केले जात आहे.

# प्रभाग १७ मधील भाजपा उमेदवारांना जय तिरुपती क्रीडा सेवा मंडळाचा पाठिंबा

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दौऱ्यानंतर उमेदवारांच्या विजयाच्या आशा पल्लवित**

**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि.१० जानेवारी-**

सोलापूर महापालिका निवडणुकीच्या प्रभाग क्रमांक १७ मध्ये भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार निर्मला हरीश जंगम, भारतसिंग विठ्ठलसिंग बडुरवाले, जुगनबाई शमशेरसिंग आंबेवाले, रवी शंकरसिंग कय्यावाले यांना लष्कर भागातील प्रसिध्द मानाचा गणपती जय तिरुपती क्रीडा सेवा महामंडळाच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आल्याने भाजपच्या उमेदवारात उत्सवाचे वातावरण पसरले.

नळबाजार चौकातील बालाजी मंदिरात झालेल्या एका कार्यक्रमात हा पाठिंबा दर्शविण्यात आला. यावेळी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तुळजाराम खंडेवाले, उपाध्यक्ष रामसिंग बिलोरेवाले, सचिव अशोक बोकेवाले, काळूराम लगेवाले, तुळजाराम बलरामवाले, बळीराम बॉम्बेवाले, विक्रमसिंग हजारीवाले, जालिंदर मनसावाले यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



प्रभाग क्रमांक १७ मधील भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित केलेल्या रॅलीला मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होते. यावेळी लाडक्या बहिणींनी उपस्थिती दर्शवून पाठबळाचे आश्वासन दिले.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दौऱ्यामुळे शहरात भाजपमय वातावरण निर्माण झाले असून या प्रभागातील भाजपच्या उमेदवारांच्या आशा पल्लवित झाल्याचे दिसून येत आहे.

**श्री जांबमुनी मोची समाज भवन**

शहर मध्यचे लोकप्रिय आमदार देवेंद्र कोठे यांच्या मागणीनुसार श्री जांबमुनी मोची समाज भवनासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी २ कोटी रुपयांचा भरघोस निधी भरसभेत जाहीर केल्याने समाजबांधवांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. जांबमुनी मोची समाजातर्फे पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. कोठेंचे आभार मानण्यात आले.

## पान १ वरुन

### ....आम्हीच करणार सोलापूरचा कायापालट!

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, सोलापूर शहराकडे काँग्रेस-राष्ट्रवादीच्या नेत्यांनी लक्ष दिले नाहीत. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्यदायी सुविधा योग्य पध्दतीने पुरविल्या नाहीत. शासनाच्या विविध योजना या शहरात राबविल्या नसल्याने असंख्य लोक आजही गरिबीत जीवन जगत आहेत. मात्र मोदी सरकार आल्यापासून म्हणजेच २०१४ पासून या शहराच्या विकासात मोठी भर पडत आहे. या शहरात स्मार्ट सिटी योजना राबविली. याद्वारे हजारो कोटींची विकासकामे मार्गी लागली आहेत. पंतप्रधान आवास योजनेतून हजारो गरिबांना १५ हजारांपर्यंत घरेही दिली आहेत.

महामार्गामुळे शहराची प्रगती होत आहे. मुंबई, गोवा या दोन मार्गावर विमानसेवाही सुरु झाली आहे. तिरुपती, हैदराबाद, बेंगलोर आदी ठिकाणीही विमानसेवा सुरु करण्यात येणार आहे. आयटी पार्कला मंजुरी मिळाली असून जागाही फायनल झाली, असेही त्यांनी सांगितले.

**नाशिक-सोलापूर-अक्कलकोट महामार्ग लवकरच**

सोलापूर जिल्ह्यातील विविध शहरात धार्मिक पर्यटन आहे. यामुळे विविध महामार्ग सोलापूरला जोडले आहेत. आता नव्याने शक्तीपीठ म ार्गासह नाशिक-सोलापूर-अक्कलकोट हाही मार्ग सोलापूरसाठी होत आहे. यामुळे पंढरपूर, अक्कलकोट आणि गाणगापूर येथे भाविकांची गर्दी वाढणार आहे. वरील मार्गाला मुंबई-दिल्लीही जोडली जाणार आहे आणि यातून जिल्ह्याची आर्थिक उलाढाल वाढणार आहे. या ठिकाणच्या चटणी, चादर आणि टॉवेल्सचीही मागणी वाढणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

**प्रत्येक घरात पाणी देण्याचा संकल्प**

पाणीप्रश्न अनेक वर्ष प्रलंबित होता. यासाठी एनटीपीसी आणि शासनस्तरावरुनही पिण्याच्या पाण्यासाठी ८९२ कोटींचा निधी देवून येथील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी निकाली काढला आहे. २०५७ सालच्या सोलापूरच्या लोकसंख्येचा विचार करून ही पाईपलाईन उजनीवरुन आणली आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**बाराबंदी पोषाखात गाजविली सभा**

मुख्यमंत्र्यांच्या जाहीर सभेसाठी शहरातील नागरिकांची प्रचंड गर्दी होती. विशेषतः महिला वर्ग मोठ्या प्रमाणात होता. सोलापुरात येताच मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रथम श्री सिध्दरामेश्वरांचे दर्शन घेतले. याठिकाणी त्यांनी बाराबंदी पोषाख परिधान करून थेट सभास्थळ गाठले आणि याच पोषाखातून त्यांनी सभा गाजविली.

**भाजपाचे शहर विकासाचे व्हिजनः पालकमंत्री**

सोलापूर शहर हे बहुभाषिक, कष्टकरी आणि संघर्षशील शहर आहे. येथील लोकांची जीवनपध्दती संघर्षमय अशी आहे. याठिकाणी हातमाग, यंत्रमाग आणि विडी उद्योग मोठ्या प्रमाणात आहेत. सोलापुरी चादरीसह कडक भाकरी, शेंगा चटणीची वेगळीच ओळख आहे. येथील डाळिंबही जगभरात दिसू लागले आहे. पूर्वीच्या सरकारने सोलापूरकडे नीट लक्ष दिले नाही; यामुळे शहरविकास मागे पडला आहे. भाजपाने शहर विकासाचे व्हिजन डोळ्या समोर ठेवून काम सुरु केले आहे. यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांची मोठी साथ लाभत आहे, असे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

**तर आमदारकीचा त्याग करीन : आ.कोठे**

आजच्या सभेत आ.देवेंद्र कोठे यांचे जोरदार भाषण झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या माध्यमातून केलेली शहर विकासाची कामे त्यांनी विस्ताराने मांडली. विधानसभेत सोलापूरचा पाणीप्रश्न चांगलाच लावून धरल्याने ८९२ कोटींचा निधी आणता आला. आपल्या आमदारकीच्या काळात सोलापुरातील घरोघरी पाणी देवू शकलो नाहीतर आमदारकीचा त्याग करीन, असे ग्रामदैवत सिध्देरामेश्वरांचय साक्षीने सांगतो, असे आ.कोठे म्हणताच सभास्थळी काही क्षण शांतता पसरली होती. शहरातील विविध प्रश्नांचा निपटारा करण्यासाठी आपला मुख्यमंत्र्यांवर पूर्ण विश्वास असल्यानेच आपण ही घोषणा केल्याचा खुलासाही आ. कोठे यांनी केला.

### विष पाजून हिंदू युवकाचा घेतला जीव

**ढाका** : कर्जाची परतफेड वेळेवर न केल्याने शुक्रवारी बांगलादेशच्या सुनामगंज जिल्ह्यातील दराई गावात एका २२ वर्षीय तरुणाला जबर मारहाण करून विष पाजून त्याची हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. याप्रकरणाच्या तक्रारीनंतरदेखील अद्याप पोलिसांकडून कारवाई करण्यात आलेली नाही. मृतकाचे नाव जॉय महापात्रो, असे आहे. बांगलादेशात सातत्याने हिंदू नागरिकांवर अत्याचार होत असताना सरकारकडून त्यांच्या रक्षणासाठी उपाययोजना करण्यात येत नसल्याने समुदायांमध्ये दहशत आहे. जॉयचा चुलत भाऊ अयान दास याने वृत्तसंस्थेला सांगितले.

# आठवीच्या अभ्यासक्रमात आयुर्वेदाचे धडे

◆ **नागपूर, १० जानेवारी**

'नवीन शैक्षणिक धोरण २०२०' नुसार (एनईपी) अभ्यासक्रमांमध्ये बदल केला जात आहे. त्याच धर्तीवर राज्य अभ्यासक्रमाचा आराखडा तयार करण्यात आला असून आता एनसीईआरटीने सहावी आणि आठवीच्या विज्ञान अभ्यासक्रमात आयुर्वेदावरील प्रकरणे समाविष्ट केली आहेत. येत्या शैक्षणिक वर्षात हा बदल दिसणार आहे.

२०२० पासून नवीन शैक्षणिक धोरण लागू झाले आहे. त्यानुसार शैक्षणिक बदल केला जात आहे. या बदलांचा उद्देश विद्यार्थ्यांना केवळ वैज्ञानिक ज्ञानाचीच नव्हे, तर शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या तत्त्वांशी ओळख करून देण्याचा उद्देश आहे. एनसीईआरटीने सहावीच्या विज्ञान विषयाच्या पाठ्यपुस्तकात आयुर्वेदाच्या गुणांची मूलभूत तत्त्वे समाविष्ट केली आहेत.




आठवीच्या पुस्तकात दिनचर्या आणि ऋतूनुसार शिस्त यासारख्या विषयांवर लक्ष केंद्रित करते. हा बदल केवळ पाठ्यपुस्तकांपुरता मर्यादित नाही, तर भारताच्या वैज्ञानिक परंपरा आणि आयुर्वेद वारसा जाणून घेण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करण्याची सुरुवात आहे. विद्यार्थ्यांना आता भारतीय दृष्टिकोनातून आरोग्य, पोषण आणि पर्यावरण संतुलन समजेल. शालेय स्तरावर आयुर्वेदाचा समावेश करण्याचा हा उपक्रम आहे. त्याचबरोबर उच्च शिक्षणातही आयुर्वेदाचा समावेश करण्यात येत आहे. (तभा वृत्तसेवा)

**सहावीसाठी हा बदल**

सहावीच्या अभ्यासक्रमात विज्ञानात आयुर्वेदाचे महत्त्व सांगण्याबरोबरच पदार्थांचे वर्गीकरण हे प्रकरण २० गुणांसाठी समाविष्ट आहे. यात आयुर्वेदाचा गुणधर्म, ऋतूनुसार उष्ण, थंड, हलके, जड अन्न याची तत्त्वे विद्यार्थ्यांना समजून सांगितली जातील. यामुळे त्यांना एकूण आरोग्याची मूलभूत समज होईल.

**आठवीसाठी हा बदल**

इयत्ता आठवीच्या वर्गात आयुर्वेद : शरीर, मन आणि पर्यावरणाचे संतुलन या प्रकरणाद्वारे दिनचर्या (निरोगी दैनंदिनी सवयी), ऋतुचर्या (हंगामी आहार) आणि संतुलित जीवनशैलीचे महत्त्व शिकवले जाईल.

### ३८ बांगलादेशींना केले हद्दपार

**आग्रा** : आग्रा येथून शनिवारी आठ मुलांसह ३८ बांगलादेशी नागरिकांना हद्दपार करण्यात आले. ५ फेब्रुवारी २०२२ रोजी सिकंदरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सेक्टर १५ मध्ये ३८ बांगलादेशी नागरिक बेकायदेशीरपणे वास्तव्य करत असल्याचे आढळून आले, असे सहाय्यक पोलिस आयुक्त दिनेश सिंह यांनी शनिवारी सांगितले.

३८ पैकी ३० पुरुष आणि महिला तर आठ अल्पवयीन होते. त्यांच्यापैकी कोणाकडेही वैध कागदपत्र नव्हते. पोलिसांनी त्यांना बेकायदेशीर वास्तव्याच्या आरोपाखाली न्यायालयात हजर केले आणि न्यायालयाने त्यांना परकीय नागरिक कायद्यांतर्गत शिक्षा सुनावली. शिक्षेचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर, त्यांना शनिवारी वाहनांनी बांगलादेश सीमेवर पाठवण्यात आले.

# 'सिंदूर'मुळे पाकिस्तानने बदलली घटना

## सीडीएस अनिल चौहान यांची माहिती

◆ **पुणे, १० जानेवारी**

'ऑपरेशन सिंदूर'ने गलितगात्र झालेल्या पाकिस्तानला घटना बदलण्यास भाग पाडले. भारताने केलेल्या कारवाईमुळे पाकिस्तानात चांगल्या गोष्टी घडल्या नाहीत, याची ही शेजारी देशाने दिलेली कबुलीच आहे, असे स्पष्ट प्रतिपादन सीडीएस जनरल अनिल चौहान यांनी केले आहे. थिएटर कमांडचा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारने ३० मे २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे, असे अनिल चौहान यांनी सांगितले. तथापि, सशस्त्र दल अंतिम मुदतीपूर्वीच रचना कार्यान्वित करण्यासाठी काम करीत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



थिएटर कमांड ही माझ्या महत्त्वपूर्ण जबाबदारीपैकी एक असली, तरी ही प्रक्रिया आता अंतिम टप्प्यात आहे. 'ऑपरेशन सिंदूर' संपुष्टात आले नसून, ते सध्या थांबवलेले आहे, असे अनिल चौहान यांनी पुणे पब्लिक पॉलिसी फेस्टिव्हलला संबोधित करताना सांगितले.

खूप घाईघाईने केलेले घटनेतील बदलांसह इतर काही बदल वास्तविकतः ऑपरेशन सिंदूरमुळे पाकिस्तानचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची कबुली देतात आहे. त्यांना अनेक उणिवा आणि कमतरता आढळल्याचे अनिल चौहान यांनी सांगितले.

हा संपूर्ण सुधारणा प्रस्ताव मूलतः संघीय सीमाशुल्क न्यायालयांच्या स्थापनेशी संबंधित आहे. तो पूर्णपणे वेगळा विषय आहे. पाकिस्तानच्या घटनेतील कलम २४३ मध्ये केलेल्या दुरुस्तीमुळे त्या देशाच्या उच्च संरक्षण संघटनेत महत्त्वपूर्ण बदल झाले आहेत. भारतामध्ये आणि विशेषतः आपल्या सशस्त्र दलांसाठी या गोष्टीला विशेष महत्त्व आहे. हे बदल थोडक्यात सांगायचे झाल्यास, पहिला बदल म्हणजे जॉइंट चिफ ऑफ स्टाफ समितीचे अध्यक्षपद संपुष्टात आणले. हे पद तिन्ही सेवांमध्ये समन्वय वाढवण्यासाठी तयार करून गेले असावे. हे पद आता रद्द करण्यात आले आहे. त्याऐवजी चीफ ऑफ डिफेन्स फोर्सेस (सीडीएफ) हे पद तयार केले आहे, असे अनिल चौहान यांनी सांगितले. ◆(वृत्तसंस्था)

### राष्ट्रीय धोरणात्मक कमांडची निर्मिती

दुसरा बदल म्हणजे राष्ट्रीय धोरणात्मक कमांडची निर्मिती. त्या आघाडीवर त्यांच्या दृष्टिकोनातून गोष्टी चांगल्या प्रकारे पार पडू शकतात. यापूर्वी त्यांनी लष्करी रॉकेट फोर्सेस कमांडचीही स्थापना केली होती. ती पारंपरिक आणि सामरिक अशा दोन्ही दृष्टिकोनातून स्थापन करण्यात आली. यामुळे त्यांच्या क्षमता अधिक मजबूत होऊ शकतात. त्यांनी मूलतः या नवीन रचना तयार करून सत्ता केंद्रीकृत केली आहे, असे अनिल चौहान यांनी निदर्शनास आणून दिले. ■

# लष्कराचा निदर्शकांवर गोळीबार

## २१७ नागरिकांचा मृत्यू, हजारपेक्षा अधिक जखमी

## इराणच्या मानवाधिकार संघटनेची माहिती

◆ **तेहरान, १० जानेवारी**

इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्याविरोधात सुरू असलेल्या आंदोलनाला दडपण्यासाठी लष्कराला तैनात करण्यात आले. विविध भागात झालेल्या गोळीबारात गेल्या दहा दिवसांत २१७ नागरिकांचा मृत्यू आणि हजारपेक्षा अधिक जखमी झाल्याची माहिती आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या एका सदस्याने वृत्तसंस्थेला दिली.



मृत्यूच्या आकड्याची पुष्टी तेहरानमधील एका शासकीय रुग्णालयातील डॉक्टरनेदेखील केली आहे. खामेनी यांच्या राजवटीविरुद्ध सुरू असलेले निदर्शनांना हिंसक वळण लागले आहे. देशातील १३ प्रांतांत लष्करासोबत संघर्ष सुरू असून, तीन प्रांतावर निदर्शकांनी ताबा मिळवला. सरकारने देशभरात इंटरनेट आणि फोन सेवा पूर्णपणे बंद केली आहे. खामेनी यांच्याविरोधात सुरू असलेले बंड थोपविण्यासाठी लष्कराकडून सातत्याने गोळीबार केला जात असून, यात राजधानी तेहरानमध्ये आतापर्यंत २१७ नागरिकांना जीव गमवावा लागला, तसेच हजारपेक्षा अधिक जखमी असल्याचे मानवाधिकार आयोगाच्या सदस्या शिरीन इबादी यांनी सांगितले.

### खामेनी यांना कोणीही वाचवू शकणार नाही : ट्रम्प



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या परिस्थितीवर समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, आम्ही इशारा देऊनही इराणमध्ये निदर्शकांवर बळाचा वापर सुरू आहे. अमेरिकेला आता यात्प्रकरणात हस्तक्षेप करावा लागेल, खामेनी यांना जगातील कोणतीही शक्ती वाचवू शकणार नाही. अमेरिका इराणमधील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. निष्पाप लोकांना मारणे सुरूच राहिले, तर आम्ही शांत बसणार नाही. ■

कमकुवत अर्थव्यवस्था आणि वाढत्या महागाईमुळे सलग १३ व्या दिवशी निदर्शने सुरू आहे.

**खामेनींचे पोस्टर जाळून तरुणीने सिगारेट पेटवली**

इराणमध्ये सुरू असलेल्या सरकारविरोधी निदर्शनांमध्ये, चळवळीचा एक नवीन चेहरा समोर आला आहे, जिथे एक तरुणी सर्वोच्च नेते खामेनी यांचे पोस्टर जाळून सिगारेट पेटवत आहेत. या तरुणीचा व्हिडिओ समाज माध्यमांवर तुफान प्रसारित झाला आणि ती आंदोलनाचा चेहरा बनली आहे. देशाच्या अनेक भागांमध्ये महिलांना वर्षानुवर्षे धूम्रपान करण्यास बंदी घातली. महिला आंदोलनात उघडपणे सहभागी होऊन हिजाब नियमांचे उघडपणे उल्लंघन करून, सामाजिक निर्बंधांविरुद्ध आवाज उठवत आहेत. ◆(वृत्तसंस्था)

# आय-पॅकवरील छाप्यांप्रकरणी बंगाल सरकारचे 'कॅव्हेट'

◆ **नवी दिल्ली, १० जानेवारी**

राजकीय सल्लागार संस्था आय-पॅकच्या विरोधात अंमलबजावणी संचालनालयाने केलेल्या कारवाईच्या संदर्भात आपली बाजू ऐकून घेतल्याशिवाय कोणताही आदेश पारित केला जाऊ नये, अशी विनंती करणारे 'कॅव्हेट' पश्चिम बंगाल सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाखल केले आहे.

एखाद्या पक्षकाराकडून त्याचे म्हणणे ऐकून घेतल्याशिवाय त्याच्याविरोधात कोणताही आदेश पारित केला जाणार नाही, यासाठी उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात 'कॅव्हेट' दाखल केले जाते. कोळसा घोटाळा चौकशीचा भाग म्हणून ईडीने शुक्रवारी आय-पॅक आणि या कंपनीचा संचालक प्रतीक जैनच्या कोलकात्यातील ठिकाणांवर छापेमारी केली. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी छाप्याच्या ठिकाणी प्रवेश करून दस्तावेज आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांसह महत्त्वाचे पुरावे सोबत नेले, असा आरोप तपास यंत्रणेने केला आहे. ◆(वृत्तसंस्था)

# आग लागून तिघांचा मृत्यू

◆ **मुंबई, १० जानेवारी**

मुंबई उपनगरातील गोरेगाव येथील भगतसिंग नगर परिसरात शनिवारी पहाटे एका निवासी इमारतीत आग लागल्याने एकाच कुटुंबातील तीन जणांचा मृत्यू झाला.

आग लागलेली एक मजली इमारत राजाराम लेनमध्ये आहे. मुंबई अग्निशमन दलाला पहाटे ३:०६ वाजता आगीची माहिती देण्यात आली. आग तळमजला आणि पहिल्या मजल्यावरील इलेक्ट्रिक वायरिंग आणि घरातील वस्तूंना लागली. अग्निशमन दलाचे जवान पोहोचण्यापूर्वीच स्थानिकांनी आग विझवली. घटनास्थळी पोहोचल्यावर अग्निशमन दलाच्या जवानांनी वीजपुरवठा खंडित केला.

तिन्ही रहिवाशांना ट्रॉमा केअर रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मृतांची ओळख हर्षदा पावस्कर, कुशल पावस्कर आणि संजोग पावस्कर अशी पटली आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. आगीचे कारण अद्याप निश्चित झालेले नाही. ◆(वृत्तसंस्था)

# ड्रोनने साम्बात टाकलेला शस्त्रसाठा जप्त

◆ **जम्मू, १० जानेवारी**

पाकिस्तानमधून आलेल्या ड्रोनद्वारे टाकण्यात आलेली शस्त्रास्त्रांची एक खेप जम्मू-काश्मीरच्या सांबा जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय सीमेजवळील अग्रिम भागातून जप्त करण्यात आली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी शनिवारी दिली.

आगामी प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यात दहशतवाद्यांनी कोणताही व्यत्यय आणण्याचा प्रयत्न हाणून पाडण्यासाठी कडेकोट सुरक्षेदरम्यान दोन पिस्तूल, तीन मॅगझिन्स, १६ काडतुसे आणि ग्रेनेडचा समावेश असलेला हा साठा जप्त करण्यात आला.

सीमेपलीकडून आलेल्या ड्रोनच्या संशयास्पद हालचालींची माहिती मिळाल्यानंतर सीमा सुरक्षा दल आणि जम्मू-काश्मीर पोलिसांच्या विशेष कृती गटाच्या (एसओजी) संयुक्त पथकाने शुक्रवारी रात्री घगवालच्या पालोरा गावात शोधमोहीम सुरू केली.

शोध पथकांना एका ओढ्याच्या काठावर पिवळ्या टेपने गुंडाळलेले एक पाकीट सापडले आणि जवानांनी ते बॉम्बनाशक पथकाच्या मदतीने उघडले. त्यात ही शस्त्रे आढळली. शेवटचे वृत्त हाती आले, त्यावेळी ही कारवाई सुरूच होती, असे अधिकाऱ्याने सांगितले. ◆(वृत्तसंस्था)

# तुर्कमान गेट दगडफेक प्रकरणात आणखी तिघांना अटक

◆ **नवी दिल्ली, १० जानेवारी**

तुर्कमान गेट दगडफेक प्रकरणात आणखी तीन आरोपींना दिल्ली पोलिसांनी अटक केली. या कारवाईसह अटक झालेल्या आरोपींची एकूण संख्या १६ झाली असल्याची माहिती अधिकाऱ्याने शनिवारी दिली.

मोहम्मद नावेद, मोहम्मद फैझ, मोहम्मद उबैदुल्लाह, मोहम्मद आरिब, मोहम्मद काशिफ, मोहम्मद कैफ, मोहम्मद अदनान, समीर हुसैन, मोहम्मद अथर, शाहनवाझ आलम, मोहम्मद इम्रान, मोहम्मद इम्रान उर्फ राजू, मोहम्मद आफन, मोहम्मद आदिल, मोहम्मद आमिर हमझा आणि मोहम्मद उबैदुल्लाह, अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

दगडफेकीत सहभागी असलेल्या तीन जणांना शुक्रवारी अटक करण्यात आली. आतापर्यंत अटक केलेल्या आरोपींची संख्या १६ झाली आहे. पुढील तपास केला जात आहे, अशी माहिती अतिरिक्त पोलिस आयुक्त (मध्य) निधिन वालसन यांनी दिली. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी परिसरात मोठ्या प्रमाणात पोलिस आणि निमलष्करी दलाच्या जवानांना तैनात करण्यात आले आहे. वरिष्ठ पोलिस अधिकारी परिस्थितीवर नजर ठेवून असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. परिसरात ड्रोनने नजर ठेवली जात असून, सध्या येथील परिस्थिती नियंत्रणात आहे. ◆(वृत्तसंस्था)



ओडिशातील राऊरकेला जवळ रघुनाथपल्ली येथे खाजगी हेलिकॉप्टरला अपघात झाला. उड्डाण घेताच विमान कोसळले. यामध्ये सहा जण जखमी झाले. चालक गंभीर जखमी झाला असून सर्वांना रुग्णालयात दाखल केले आहे

# इस्रोच्या पृथ्वी निरीक्षण उपग्रहाचे उद्या प्रक्षेपण

◆ **चेन्नई, १० जानेवारी**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात् इस्रो सोमवारी पीएसएलव्ही-सी ६२ मोहिमेच्या माध्यमातून पृथ्वी निरीक्षक उपग्रह ईओएस-एन१ सह १४ इतर पेलोड्सचे प्रक्षेपण करून २०२६ मधील अंतराळ मोहिमांचा श्री गणेशा करणार आहे.

इस्रोच्या व्यावसायिक शाखा असलेली न्यूस्पेस इंडिया लि.द्वारे (एनएसआयएल) हाती घेण्यात आलेल्या या मोहिमेतील इतर १४ सहप्रवासी उपग्रह देशातील आणि विदेशी ग्राहकांचे आहेत. अंतराळ वाहन आणि उपग्रहांचे एकत्रीकरण पूर्ण झाले असून, प्रक्षेपणापूर्वीची तपासणी सुरू आहे. पीएसएलव्ही-सी ६२ मोहीम १२ जानेवारी रोजी सकाळी १०.१७ वाजता श्रीहरीकोटातील सतीश धवन अंतराळ केंद्रावरून प्रक्षेपण केले जाईल, असे इस्रोने शनिवारी सांगितले. पीएसएलव्हीच्या ६४ व्या उड्डाणासाठी असलेल्या या मोहिमेसाठी २५ तासांची उलटगणती ११ जानेवारी रोजी सुरू होणार आहे. पृथ्वी निरीक्षण उपग्रह थायलंड आणि युनायटेड किंगडमने संयुक्तपणे तयार केला आहे, असे इस्रोने सांगितले. १२ जानेवारी रोजी सकाळी १०.१७ वाजता प्रक्षेपण झाल्यानंतर ही संपूर्ण मोहीम दोन तासांपेक्षा जास्त कालावधीची असेल.


पृथ्वीच्या वातावरणात पुन्हा प्रवेश करणाऱ्या केआयडी कॅप्सुलचे प्रात्यक्षिक दाखवण्यासाठी शास्त्रज्ञ रॉकेटच्या चौथ्या टप्प्याला पुन्हा सुरुवात करतील. हे घडवून आणण्यासाठी शास्त्रज्ञ चौथा टप्पा पुन्हा सुरू करून त्याचा वेग कमी करतील आणि पुनर्प्रवेश मार्गावर येतील त्यानंतर केआयडी कॅप्सुल वेगळी केली जाईल, असे इस्रोने सांगितले. ◆(वृत्तसंस्था)

### १३ अन्य उपग्रह सोडणार

पृथ्वी निरीक्षण उपग्रहासोबत १३ इतर उपग्रह अंतराळात सोडले जाणार आहेत. प्रक्षेपणानंतर १७ मिनिटांनी सूर्यकालीन कक्षेत ते स्थापन केले जाणार आहेत. मात्र, प्रक्षेपण झाल्यावर दोन तासांनी रॉकेटच्या चौथ्या टप्प्याचे विलगीकरण आणि एका स्पॅनिश स्टार्टअपच्या केस्ट्रेल इनिशियल टेक्नॉलॉजी डेमॉन्स्ट्रेटर कॅप्सुलचे (केआयडी) प्रात्यक्षिक अपेक्षित आहे. ■

## चित्रपट वार्ता

### तापसीच्या 'घुंघट' चित्रपटाचे चित्रीकरण सुरू



**नवलगड :** बॉलिवूड अभिनेत्री तापसी पन्नू सध्या तिच्या आगामी 'घुंघट' चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी झुंझुनू जिल्ह्यातील नवलगड येथे आहे. या चित्रपटात तापसी एका पोलिस इन्स्पेक्टरच्या भूमिकेत दिसणार असून सेटवर ती खाकी वर्दीत दिसते आहे. जयपूरिया स्कूल परिसराला चित्रपटासाठी बारवाडा पोलिस स्टेशन म्हणून दाखवण्यात आले आहे. तिथे चित्रपटाची दृश्ये चित्रित केली जात आहेत. चित्रपटाचे दिग्दर्शन अनुभव सिन्हा आणि मकबूल खान संयुक्तपणे करत आहेत. निर्मात्यांनुसार, चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित केला जाईल. नवलगडमध्ये सुरू असलेल्या या चित्रीकरणामुळे शेखावाटी प्रदेशाला पुन्हा एकदा चित्रपटाच्या नकाशावर नवीन ओळख मिळण्याची आणि पर्यटनाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. ■

### नूपुर सेनन दोन वेळा करणार लग्न

**मुंबई :** बॉलिवूड दिवा क्रिती सेननची बहीण नूपुर सेनन आणि गायक स्टेबिन बेन लग्न बंधनात अडकणार आहेत. या जोडप्याचा विवाह उदयपूरमधील फेअरमोंट पॅलेसमध्ये होत आहे. नूपुर आणि स्टेबिन बेनच्या हळदी आणि संगीत समारंभाचे व्हिडिओ आणि फोटो समाज माध्यमावर व्हायरल होत आहेत. ११ जानेवारी रोजी, नूपुर आणि स्टेबिन प्रथम ख्रिश्चन पद्धतीने लग्न करणार आहेत यानंतर नूपुर हिंदू पद्धतीने विवाह करणार आहे. दोन्ही कुटुंबांच्या संस्कृतींचा आदर करून या जोडप्याने हा निर्णय घेतला आहे. क्रिती सेनन तिच्या धाकट्या बहिणीच्या लग्नाच्या प्रत्येक पैलूचा पुरेपूर आनंद घेत आहे. संगीत समारंभात तिने भोजपुरी आणि बॉलिवूड गाण्यांवर तिच्या नृत्याने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले आहे. ■



### संजय दत्तने घेतले पशुपतिनाथाचे दर्शन



**काठमांडू :** अभिनेता संजय दत्तचा 'द राजा साब' चित्रपट प्रदर्शित झाला आहे. या पृष्ठभूमीवर त्याने काठमांडूमधील पशुपतिनाथाचे दर्शन घेतले आहे. मंदिरातील त्याचे अनेक व्हिडिओ आणि फोटो समाज माध्यमावर व्हायरल होत आहेत. 'द राजा साब' प्रदर्शित होताच संजय दत्त दर्शनासाठी पोहोचला. या तो चित्रपटात एका भयावह भूमिकेत दिसतो आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शक मारुती असून यामध्ये बोमन ईरानी, मालविका मोहनन, निधि अग्रवाल, रिद्धि कुमार महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. या चित्रपटाने पहिल्या दिवशी बॉक्स ऑफिसवर ४५ कोटी रुपये कमावले आहेत. या चित्रपटाला चित्रपट समीक्षकांकडून संमिश्र प्रतिक्रीया मिळत आहे. ■

# गृहखरेदी घोटाळा प्रकरणात ५८५ कोटींची जमीन जप्त

## ईडीची हरयाणा, उत्तरप्रदेशात कारवाई

◆ **नवी दिल्ली, १० जानेवारी**

अनेक गृहखरेदीदारांची फसवणूक करणारी दिल्ली-राष्ट्रीय राजधानी परिसरातील एका स्थावर मालमत्ता कंपनीची मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात ५८० कोटी रुपयांपेक्षा जास्त मूल्याची उत्तरप्रदेश आणि हरयाणातील शेकडो एकर जमीन जप्त करण्यात आली, अशी माहिती अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने शनिवारी दिली.

एडीईएल लॅण्डमार्क्स लि.(पूर्वीची ईरा लॅण्डमार्क्स लि.) आणि त्याचे प्रवर्तक हेमसिंह भारणा आणि सुमित भारणा यांच्याविरोधात या प्रकरणी चौकशी सुरू असल्याची माहिती तपास यंत्रणेने दिली. बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत हरयाणातील फरिदाबाद,पलवल आणि बहादूरगड तसेच उत्तरप्रदेशातल मेरठ आणि गाझियाबाद येथील ३४० एकर जमीन तात्पुरती जप्त करण्याचा आदेश शुक्रवारी जारी करण्यात आला, असे ईडीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. जप्त केलेल्या जमिनीचे एकूण मूल्य ५८५.४६ कोटी रुपये आहे. मनी लॉण्ड्रिंगचा हा खटला हरयाणा आणि दिल्ली पोलिसांनी कंपनी आणि तिच्या प्रवर्तकांविरुद्ध दाखल केलेल्या ७४ एफआयआर आणि आरोपपत्रांवर आधारित आहे. यात १२ ते १९ वर्षांच्या विलंबानंतरही वचन दिलेल्या सदनिका आणि युनिट्स वितरित न करता असंख्य गृहखरेदीदारांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. ◆(वृत्तसंस्था)

### चार हजार ग्राहकांकडून घेतले १,०७५ कोटी

या स्थावर मालमत्ता कंपनीने हरयाणातील गुरुग्राम, फरिदाबाद आणि पलवल येथे अनेक निवासी गृनिर्माण प्रकल्प सुरू केले आणि कॉस्मोकोर्ट, कॉस्मोसिटी-१, कॉस्मोसिटी-२, स्कायविल, रेडवुड रेसिडेन्सी, एरा ग्रीन वर्ल्ड, एरा डिव्हाईन कोर्ट आणि एडीईएल डिव्हाईन कोर्ट या आठ प्रकल्पांतून ४,७७१ ग्राहकांकडून बुकिंग रक्कम म्हणून १,०७५ कोटी रुपये जमा केले. २००६-२०१२ दरम्यान सुरू झालेले प्रकल्प आजपर्यंत अपूर्ण आहेत, असे ईडीने सांगितले. ■

# मणिपूर खोऱ्यातील पेट्रोलपंप अनिश्चित काळासाठी बंद

◆ **इम्फाळ, १० जानेवारी**

बिष्णुपूर जिल्ह्यातील एका पेट्रोल पंपावर झालेल्या बॉम्ब हल्ल्यानंतर दोन दिवसांनी, मणिपूर पेट्रोलियम डीलर्स फ्रंटर्निटीने मागण्या पूर्ण होईपर्यंत शनिवारपासून खोऱ्यातील परिसर आणि त्याच्या आसपासच्या भागातील सर्व पेट्रोल पंप अनिश्चित काळासाठी बंद ठेवण्याची घोषणा केली आहे.

राज्य प्रशासनाने पेट्रोल पंप आणि डीलर्सच्या सुरक्षेसाठी कठोर पावले उचलली आहेत. मात्र गुरुवारी रात्री झालेल्या बॉम्बस्फोटावरून अजूनही गंभीर धोक्यांचा सामना करत असल्याचे एमपीडीएफने राज्यपाल अजय कुमार भल्ला यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. जोपर्यंत यावर तात्काळ लक्ष दिले जात नाही आणि सलोख्याचा तोडगा काढला जात नाही तोपर्यंत शनिवारपासून खोऱ्यातील परिसर आणि त्याच्या आसपासच्या भागातील सर्व पेट्रोल पंप अनिश्चित काळासाठी बंद ठेवण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला आहे, असे पेट्रोल पंपावर झालेल्या बॉम्बस्फोटामुळे झालेल्या नुकसानीसाठी नुकसानभरपाईची मागणी करताना, एमपीडीएफने सांगितले. गुरुवारी रात्री, बिष्णुपूर जिल्ह्यातील मोइरांग येथील एका पेट्रोल पंपावर अज्ञात समाजकंटकांनी बॉम्ब फेकला. यामुळे स्फोट झाला. या घटनेत कोणीही जखमी झाले नाही.पेट्रोल पंप, डीलर्स आणि कर्मचाऱ्यांची सुरक्षा वाढवून भविष्यात अशा प्रकारची कोणतीही घटना घडणार नाही याची खात्री करावी. ◆(वृत्तसंस्था)

# चुशुलमध्ये हरित हायड्रोजन प्रकल्प सुरू

## जगातील सर्वांत उंचावर कार्यान्वित ● जवानांना २४ तास मिळणार वीज

◆ **नवी दिल्ली, १० जानेवारी**

भारतीय लष्कराने पर्यावरण आणि स्वावलंबनात एक नवीन मानक स्थापित केला आहे. जगातील सर्वात उंचावरील हरित हायड्रोजन मायक्रोग्रिड प्रकल्प लडाखमधील चुशुल येथे कार्यान्वित झाला आहे. हा प्रकल्प भारताच्या सीमावर्ती गावांना स्वच्छ ऊर्जा मिळणार आहे.

हा प्रकल्प एनटीपीसी (नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन) च्या सहकार्याने विकसित करण्यात आला आहे. चुशुल हे लडाखमध्ये समुद्रसपाटीपासून १४,५०० फूट उंचीवर आहे. येथे असलेला हा जगातील सर्वात उंच हरित हायड्रोजन प्रकल्प आहे. हा प्रकल्प लष्कराच्या शाश्वत विकास, मजबूती आणि आत्मनिर्भरतेला दर्शवितो. लडाखमध्ये सीमेवर तैनात असलेल्या जवानांना सतत विजेची आवश्यकता असते. पूर्वी, डिझेलवर चालणारे जनरेटर वापरले जात होते. ते महाग असून प्रदूषण निर्माण करत होते आणि इंधन वाहतुकीत अडचणी येत होत्या. हरित हायड्रोजनने स्वच्छ ऊर्जा मिळेल, इंधनाची गरज कमी होईल, पर्यावरणाचे रक्षण होईल तसेच लष्करी खर्चही कमी होणार आहे. भारतासाठी एक प्रमुख लक्ष्य असलेल्या हरित हायड्रोजनला प्रोत्साहन मिळणार आहे. २०३० पर्यंत पाच दशलक्ष टन हायड्रोजन उत्पादन करण्याचे येणार आहे. भारतातील गावांना स्वच्छ ऊर्जा पुरवणारा हा पहिला प्रकल्प आहे. जगातील सर्वात उंच शिखरावर असलेला हरित ऊर्जा प्रकल्प हा भारताच्या तांत्रिक सामर्थ्याचे प्रतीक आहे. ◆(वृत्तसंस्था)

### हरित हायड्रोजन प्रकल्पाची मुख्य वैशिष्ट्ये

- **हरित हायड्रोजन उत्पादने :** सौर पॅनलमधून वीज निर्मिती करून पाण्यातून हायड्रोजन वायू काढला जाईल.
- **मायक्रोग्रिड :** हा एक छोटा पावर ग्रिड आहे. यामुळे जवानांना २४ तास वीज पुरवठा होणार आहे.
- **जीवाश्म इंधनांवरील अवलंबित्व कमी:** पूर्वी डिझेल जनरेटर वापरले जात होते, परंतु आता हायड्रोजन वीज निर्माण करेल.
- **कार्बन उत्सर्जनात घट:** दरवर्षी १,५०० टन उत्सर्जन कमी होईल.
- **कठोर परिस्थितीत काम:** ही प्रणाली उणे ४० अंश थंडी, जोरदार वारे आणि ऑक्सिजनच्या कमतरतेतही काम करणार. ■

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



रोखठोक

# लोकशाहीची पेरणी आणि सुगीचा हंगाम

दिनेश गुणे

भारत हा कृषिप्रधान देश आहे, त्यामुळे येथील सामान्य माणसाला राजकारणापेक्षा शेतीची भाषा लवकर समजते. पण शहरीकरण आणि विकासाच्या गदारोळात शेतीच्या जमिनींवरही विकासाच्या गगनचुंबी खुणा उमटू लागल्यापासून अलिकडे अनेकांना शेतीच्या भाषेचा विसर पडू लागला आहे. त्याऐवजी, राजकारणाची भाषा मात्र सर्वतोमुखी दिसू लागली आहे. गावाकडच्या पारावर, चावडीवर असो किंवा शहरातल्या कट्टा, जॉगर्स पार्कवर असो, सध्या सगळ्यांच्या तोंडी राजकारणाची भाषा ऐकू येते. त्यामुळे, राजकारणाच्या भाषेतून शेतीची भाषा किंवा शेतीच्या भाषेतून राजकारणाची भाषा समजून घेतली, तर शेतीच्या भाषेची जाण तरी शिल्लक राहील. कारण, शेतीची प्रक्रिया आणि लोकशाहीतील निवडणुकीची प्रक्रिया यात कमालीचे साम्य आहे. शेतकरी ज्याप्रमाणे आपल्या जमिनीची मशागत करून पीक घेतो, त्याचप्रमाणे जनता निवडणुकीच्या माध्यमातून आपल्या भविष्याची मशागत करत असते.

शेतीची सुरुवात जमिनीच्या मशागतीपासून होते. नांगरणी, कुळवणी करून जमीन पेरणीयोग्य केली जाते. निवडणुकीतही हीच प्रक्रिया घडते. निवडणुकीपूर्वी होणारी प्रभाग रचना, मतदार नोंदणी आणि राजकीय पक्षांनी बांधलेली मोर्चेबांधणी म्हणजे एक प्रकारची 'राजकीय मशागतच' असते. ज्या पक्षाची किंवा उमेदवाराची ही मशागत (जनसंपर्क) उत्तम असते, त्याचे पीक (निकाल) येण्याची शक्यता अधिक असते. मशागतीनंतर, योग्य बियाणांची निवड शेतीचा पुढचा महत्त्वाचा टप्पा असतो. कोणत्या हंगामात कोणते पीक घ्यायचे, त्यासाठी कोणते बियाणे निवडायचे, त्याची जातकुळी कोणती असावी, हे जाणून बियाणे निवडणारा शेतकरी हा उत्तम शेतकरी ठरतो आणि त्याची मेहनत वाया जात नाही. त्याने पेरलेल्या बियाणांतून उत्तम पीक निघते आणि त्याला आपल्या स्वप्नातले सुगीचे दिवस पाहता येतात. शेतकरी कितीही कष्टकरी असला, तरी त्याचे बियाणे दोषपूर्ण असेल, तर त्याचे कष्ट वाया जातात. निवडणुकीत 'उमेदवार' हा त्या बियाणासारखा असतो. राजकीय पक्ष जेव्हा उमेदवार निवडतात, तेव्हा ते बियाणे ज्या जमिनीत पेरावयाचे आहे त्या जमिनीचा पोत नेमका कसा आहे, तेथे कोणते बियाणे मूळ धरू लागेल आणि योग्य खतपाणी मिळाल्यावर ते फोफावेल याचा नेमका अंदाज जाणकार शेतकऱ्यास असावा लागतो. आपण सकस बियाणे निवडत आहोत की ते केवळ वरून चकचकीत दिसणारे बियाणे आहे, यावर त्या शेतकऱ्याच्या शेतीचा आणि राजकारण्याच्या मतदारसंघाचा विकास अवलंबून असतो. मतदारांनीही 'जातीयवाद' किंवा 'प्रलोभन' यांसारख्या कीड लागलेल्या बियाणांऐवजी 'कर्तृत्व' आणि 'इमानदारी' असलेल्या सकस बियाणाला, म्हणजे उमेदवाराला पसंती देणे आवश्यक असते.

असे योग्य उमेदवाराचे सकस बियाणे रुजू घातले की पुढचा टप्पा, त्याची जोपासना करण्याकरिता, पार पाडावा लागतो. शेतीच्या बाबतीत, बियाणे रुजून फोफावत जावे आणि त्याला चांगले पीक यावे यासाठी योग्य प्रमाणात खत आणि पुरेसे, गरजेएवढे पाणी पाजावे लागते. उमेदवाराच्या रूपाने रुजू घातलेल्या पिकाची मशागत करण्यासाठी त्याला प्रचाराचे खत आणि इतर पोषक द्रव्ये पुरवावी लागतात. शेतकऱ्याने रुजू घातलेले बियाणे त्या जमिनीच्या ओळखीचे असणे ही शेतीची पहिली गरज असते. म्हणजे, कोणती जमीन कोणत्या बियाणासाठी अनुकूल आहे, त्या बियाणास मुळे धरू देण्याची कोणत्या जमिनीची मानसिकता आहे, हे शेतकऱ्यास नेमके ठावूक असावे लागते. निवडणुकीच्या शेतीत रुजू घातलेल्या उमेदवारांची बियाणेदेखील अशाच हिशेबाने पारखून घ्यावी लागतात. अनेकदा, एखादी शेतजमीन पारंपरिकरीत्या स्थानिक बियाणांचे चांगले पोषण करते, तर उपऱ्या, बाहेरच्या बियाणास थारादेखील देत नाही. अशी बियाणे त्या जमिनीत रुजण्याचा प्रयत्न करतात. क्वचित त्यांना मुळे धरतात, पालवीही फुटते, पण त्यांची वाढ होतच नाही. कितीही खतपाणी घातले तरी ते वाया जातात. कदाचित ती हिरवीगार दिसतात, पण त्यांना मोहोर येत नाही. राजकारणाच्या जमिनीतही स्थानिक बियाणे चांगली रुजतात, जमिनीचा पोतही त्यांना पहिली पसंती देतो आणि परंपरेच्या सवयीमुळे स्थानिक बियाणांची पिकेदेखील चांगली येतात. अलिकडे संकरित बियाणांचा शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. ही बियाणे कोणत्याही जमिनीत रुजतात. शेतजमिनीने अशा बियाणांचा स्वीकार केला आहे किंवा नाही याचा फारसा विचारही केला जात नाही. अशी, जमिनीच्या मागणीला न जुमानता रुजविलेली पिके कालांतराने अधिक फोफावतात, त्यांचे उत्पन्नदेखील चांगले येते आणि सुरुवातीला नाईलाजाने स्वीकारलेल्या त्या बियाणांना शेतजमीनही निमूटपणे स्वीकारते. पुढे संकरिताचे पेव फुटते आणि त्यांची बाजारपेठ वधारते. आजकाल संकरित बियाणांमुळे शेतकऱ्याचा सुगीचा हंगाम अधिक चांगला होऊ लागला असून, जमिनीचा पोत बिघडूनही पिके फोफावतात, असेच दिसू लागल्याने शेतीची सारी भिस्त संकरितांच्या पेरणीवरच अवलंबून असलेली दिसते.

अशा जातिवंत, स्थानिक किंवा संकरित बियाणांची मतदारसंघ नावाच्या शेतजमिनीवर पेरणी केल्यानंतर, ज्याप्रमाणे उगवत्या पिकाला खत-पाणी द्यावे लागते, तसाच निवडणुकीत शेतात प्रचाराचा धुरळा उडतो. सभा, रॅली, जाहीरनामे ही मतदारांच्या मनातील विश्वासाला खत-पाणी घालण्याची साधने आहेत. मात्र, जसे अति खतामुळे पीक जळून जाते, तसेच अति-प्रचार आणि खोट्या आश्वासनांच्या भडिमारामुळे कधीकधी मतदार गोंधळून जातो. पिकामध्ये उगवणारे अनावश्यक गवत वेळोवेळी काढून टाकले, म्हणजे जमिनीच्या मशागतीकरिता घातलेले सारे खतपाणी त्या नेमक्या पिकाला मिळते आणि त्याची वाढ जोमाने होते. जमिनीत अनावश्यक गवत असले, तर पिकासाठी घातलेले खतपाणी पिऊन ते तणच फोफावतात आणि मूळ पिकांची वाढ खुंटते. त्यामुळे तण काढून टाकण्याचे काम शेतकऱ्यालाच करावे लागते. जमीन मात्र, तटस्थपणे तण किंवा पीक या दोघांनाही



आपल्या अंगाखांद्यावर सारख्याच मायेने वाढवत असते. चांगले पीक हवे असेल, तर तण काढून टाकणे ही जशी शेतकऱ्याची जबाबदारी असते, तशीच जबाबदारी निवडणुकीच्या सुगीच्या हंगामात मतदाराची असते. चांगल्या पिकाच्या निकोप वाढीसाठी अनावश्यक तण काढून टाकण्याचा सुज्ञपणा दाखविणे ही मतदार नावाच्या शेतकऱ्याची जबाबदारी असते,

> **मासेमारी जोरात!**
>
> पावसाळ्यानंतर, हिवाळ्याच्या हंगामात मासेमारीचाही सुगीचा हंगाम सुरू होत असतो. या काळात मुबलक मासे झुंडीने पाण्यात फिरत असतात. जाणकार मासेमार अशा वेळी गळ टाकून एकेक मासा पकडत नाही. मोठे जाळे फेकून अनेक माशांना एकाच वेळी पकडण्याचे कौशल्य ज्याच्या अंगी असते, तो मासेमार सुगीचे दिवस पाहतो. सध्या मासेमारीचा हा सुगीचा हंगाम राजकारणातही फोफावला आहे. अनेक मोठे मासे कोणाच्या ना कोणाच्या गळाला लागण्यासाठी धडपडत आहेत, तर अनेक मासे झुंडीने कोणत्या ना कोणत्या जाळ्यात अडकण्यासाठी धावपळ करताना दिसत आहेत. मासेमाराप्रमाणे माशांनाही सुगीचे दिवस येण्याचा काळ खरोखरीच गमतीदार असतो...

असे म्हटले जाते. सुगीच्या हंगामात केलेली मशागत ही शेतकऱ्याच्या पुढच्या हंगामापर्यंतच्या सुखाच्या दिवसांची बेगमी असते. तसेच मतदारांनी तण काढून चांगल्या पिकांना पसंतीचे खतपाणी घातले की त्यांच्या पुढच्या हंगामापर्यंतचा काळ सुखाचा जात असतो. म्हणूनच, सुज्ञ मतदाराने प्रचारातील 'खोटेपणा' ओळखून तो बाजूला सारला पाहिजे.

**सुगीचा हंगाम आणि कापणी** : निवडणुकीचा दिवस म्हणजे शेतकरी आणि मतदारांसाठी सारखाच असतो. शेतीची मशागत, पेरणी, खत-पाणी, राखण, तण काढून टाकणे आणि कापणीनंतर सुगीच्या समाधानात धान्याची कोठारे भरण्याचे जे सुख शेतकऱ्याच्या पदरात पडते, तो शेतकऱ्याचा खरा सुगीचा हंगाम असतो. निवडणुकीत ज्याच्या पदरात मताचे मोल पडते, तेथे सुगीचा हंगाम सुरू होतो. पण आपल्याकडची बरीचशी शेती निसर्गावरच अवलंबून असते. पाऊसपाणी चांगले झाले, हवामान पोषक असेल, तर पिके चांगली येतात, फळझाडे मोहरतात आणि पिकांचा, फळांचा दर्जाही चांगला राहतो. निसर्गाचा कोप झाला, तर शेतीचा सत्यानाश होतो आणि शेतकऱ्याच्या पदरी पुरती निराशा पडते. अनेकदा निसर्ग हुलकावणी देतो, पाऊस दडी मारून रुसतो, हवामानात अनपेक्षित बदल होतात आणि हातातोंडाशी आलेली पिके हातची गेल्याच्या भावनेने शेतकरी हवालदिल होतो. निवडणुकीच्या हंगामात जनमताचा कौलही असाच, लहरी निसर्गासारखाच असतो. कधीकधी जनमत पसंतीची पावती देते, तर कधीकधी अनपेक्षितपणे हुलकावणीही देते. तीच जमीन आहे, म्हणून शेतकरी त्या जमिनीत वारंवार तीच पिके घेत नाही. आलटून पालटून, प्रत्येक हंगामातील पिकांचा बाज बदलतो. त्यामुळे, जमिनीलाही पिके पारखून घेण्याची सवय लागते आणि कोणते पीक, कोणत्या हंगामात, कोणत्या जमिनीत चांगले फोफावते हे शेतकऱ्यासही समजते. जनमताचा कौलही निसर्गासारखाच लहरी असल्याने, आलटून पालटून पिके घेण्याची शेतकऱ्याची नीती राजकारणात वापरली, तर सुगीचे दिवस समाधानाचे ठरतात. जनमतदेखील पारखता येते. कारण अशा रीतीने केलेली शेती पुढच्या हंगामापर्यंतची बेगमी करून देते. थोडक्यात, शेती आणि निवडणूक या दोन्ही गोष्टी म्हणजे, 'धैर्याचा, समंजसपणाचा आणि योग्य नियोजनाचा' खेळ आहे. जर शेतात चांगले पीक आले नाही, तर शेतकरी पुढच्या वर्षी सुधारणा करू शकतो; पण निवडणुकीत जर चुकीचा उमेदवार निवडून दिला, तर मतदाराला पाच वर्षे वाट पाहावी लागते. म्हणूनच, लोकशाहीच्या या शेतीत 'मतदान' करताना प्रत्येक नागरिकाने एका जबाबदार शेतकऱ्याप्रमाणे विचार करणे गरजेचे आहे. जेव्हा आपण योग्य व्यक्तीची निवड करतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने विकासाचे सुगीचे दिवस येतात. निवडणुकांकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन वेगवेगळा असू शकतो. काहींसाठी हा लोकशाहीचा उत्सव आहे, तर काहींसाठी हा केवळ सत्तेचा खेळ. मात्र, ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही स्तरांवरील अर्थकारण आणि हालचाली पाहता, 'निवडणूक म्हणजे सुगीचा हंगाम' ही संकल्पना वास्तवाच्या खूप जवळ जाणारी वाटते.

**सुगीचा हंगाम...** : ज्याप्रमाणे शेतकरी वर्षभर राबतो आणि सुगीच्या हंगामात आपल्या कष्टाचे फळ पदरात पाडून घेतो, त्याचप्रमाणे राजकीय क्षेत्रात निवडणुका हा असा काळ असतो जेव्हा अनेक घटकांसाठी संधींची आणि लाभांची 'पिके' कापणीला आलेली असतात. हा काळ केवळ उमेदवारांसाठीच नाही, तर सामान्य जनता, व्यापारी आणि कार्यकर्त्यांसाठीही एका अर्थाने सुगीचाच ठरतो.

निवडणुकीची घोषणा होताच राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांना सुगीचे दिवस येतात. बॅनरबाजी, झेंडे लावणे, रॅलींचे आयोजन करणे आणि घरोघरी जाऊन प्रचार करणे या कामांसाठी कार्यकर्त्यांची मोठी फळी लागते. या काळात कार्यकर्त्यांच्या खानपानाची, प्रवासाची आणि अनेकदा रोजंदारीचीही सोय होते. ज्या कार्यकर्त्यांकडे संघटनकौशल्य आहे, त्यांच्यासाठी हा काळ आपली किंमत वाढवण्याचा असतो. निवडणुकीच्या काळात बाजारपेठेत अचानक मोठी उलाढाल सुरू होते. मुद्रण व्यवसाय, जाहिरातींचे फलक, पत्रके, टी-शर्ट आणि टोप्या छापणाऱ्या छपाईखान्यांना चोवीस तास काम मिळते, रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतात. अनेक जण तर, निवडणुकांच्या पुढच्या हंगामापर्यंतची बेगमी एकाच हंगामात करतात. त्यांच्यासाठीचा हा सुगीचा हंगाम तर, लेझीम घेऊन नाचावे एवढा आनंददायक ठरतो. प्रचारासाठी शेकडो गाड्या भाड्याने घेतल्या जातात, ज्यामुळे ट्रॅव्हल एजन्सी आणि वाहनचालकांना मोठा नफा होतो. अलिकडे हेलिकॉप्टर्स आणि विमानांची मागणीदेखील निवडणुकांच्या काळात वाढलेली दिसते. मोठ्या सभा, मंडप उभारणी, साऊंड सिस्टिम आणि जेवणावळीच्या कंत्राटांमुळे कॅटरर्स आणि डेकोरेटर्सना सुगीचे दिवस येतात.

दुर्दैवाने, भारतीय राजकारणात निवडणुका आणि पैसा यांचे समीकरण घट्ट झाले आहे. अनेक ठिकाणी मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध प्रलोभने दिली जातात. 'सुगीचा हंगाम' या अर्थाने पाहिले तर, काही मतदार या काळाकडे आपली प्रलंबित कामे करून घेण्याची किंवा अल्पकालीन आर्थिक लाभ मिळवण्याची संधी म्हणून पाहतात. रस्ते दुरुस्ती, पाणीपुरवठा किंवा वैयक्तिक मदतीचा ओघ या काळात वाढतो. केवळ आर्थिकच नाही, तर वैचारिक दृष्टिकोनातूनही हा 'सुगीचा हंगाम' असतो. या काळात चर्चांना उधाण येते. चहाच्या टपरीपासून ते सोशल मीडियापर्यंत प्रत्येक ठिकाणी राजकीय विश्लेषणे सादर केली जातात. नवीन नेतृत्व उदयाला येते आणि जुन्या नेतृत्वाच्या कामाचा हिशेब मांडला जातो. लोकशाहीच्या या हंगामात जनमताचे जे पीक येते, त्यावरच देशाचे भवितव्य अवलंबून असते.

पण, चांगला शेतकरी उत्तम शेती करताना पुढचाही विचार करत असतो. एक सुगीचा हंगाम संपल्यावर पुढच्या हंगामासाठी शेताची नवी मशागत करावी लागते, हे त्याला माहीत असते. तसेच निवडणुका हा वारंवार येणारा सुगीचा हंगाम असल्याने, पुढच्या हंगामाची तयारीही निवडणुका संपल्यानंतर लगेचच सुरू करावी लागते. निवडणुकीतून पसंतीच्या रूपाने स्वीकारलेले बियाणे दमदार आहे की नाही, याचा अंदाज घेण्यात काही काळ गेला, की तेच पीक पुन्हा घ्यायचे किंवा नाही हे राजकीय पक्ष नावाच्या नावाच्या शेतकऱ्याने ठरवायचे असते. कारण, अनेकदा, योग्य बियाणे निवडले नाही, तर पिके हातची जातात आणि काही बियाणे जमिनीलाच अमान्य असतात, हे शेतकऱ्यास माहीत असते. हंगाम केवळ 'घेण्या-देण्यापुरता' मर्यादित राहिला, तर लोकशाहीचे शेत नापीक होण्याची भीती असते. त्यामुळे या सुगीच्या हंगामात 'चांगले बी' पेरले, तरच पुढच्या हंगामापर्यंतचा काळ खऱ्या अर्थाने सुगीचा ठरतो.

dineshgune@gmail.com

रविवारची पत्रे

## समाजमनाचे आरोग्य सुदृढ असावे

समाजाला विराट पुरुष असे म्हणतात. देहरूपी पुरुषाप्रमाणे समाजाला देखील कर्मेंद्रिये, ज्ञानेंद्रिये आणि मन असते. ज्याप्रमाणे निरोगी शरीर आणि मन व्यक्तीस दीर्घायुष्य प्रदान करते, तद्वतच समाज निरोगी आणि सुदृढ ठेवण्यासाठी समाजातील सर्व घटकांतील सुबुद्ध, निःस्वार्थ व राष्ट्राप्रति समर्पण भावना असणाऱ्या नागरिकांनी संघटित होणे, ही काळाची गरज आहे. आयुर्वेद शास्त्रात एक मौलिक सूत्र आहे.

**''स्वस्थ्यस्य स्वास्थ्य रक्षणम । आतुरस्य विकार प्रशमनच''**

सर्वप्रथम स्वस्थ्य व्यक्तीचे स्वास्थ्य (शारीरिक आणि मानसिक) रक्षण करणे आणि आतुरस्य (रोगी) व्यक्तीच्या विकारांचे शमन करणे. हे सूत्र समाजाला लागू केल्यास प्रथम समाजातील विविध स्वस्थ्य घटकांचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आरोग्य प्रथम अबाधित ठेवणे आणि समाजातील काही घटकांना लागलेली कीड नष्ट करणे किंवा दोषांचे निर्मूलन अभिप्रेत आहे. समाज हा अनेक गुण आणि दोषांनी व्याप्त असतो. सद्गुणांची वृद्धी आणि दोषांचे निर्दालन करण्याची नैतिक जबाबदारी ही निष्ठावंत नागरिकांची असते. हे समर्पित निष्ठावंत नागरिक आपले संपूर्ण जीवन पणास लावून राष्ट्रसेवा करीत असतात. स्वस्थ समाज याच निष्ठावंत आणि आदर्श नागरिकांच्या संघटना, त्यांचे आचरण आणि समर्पण भावनेने होत असतो. समाजातील इतर घटक यांच्याकडून अपेक्षा ठेवून असतात. समाजातील लहान मुले, विद्यार्थ्यांना नैतिक शिक्षणासाठी परिसरातील समाज भवन, मंदिर, प्रार्थना गृह येथे संस्कार वर्ग सुरू करण्यात ज्येष्ठ नागरिकांची भूमिका महत्त्वाची ठरते. त्यांच्या अनुभवांचा लाभ या भविष्यातील पिढीला मिळाल्याने विद्यार्थिवर्गातून सक्षम आणि प्रगल्भ नेतृत्व घडू शकते. सद्यःस्थितीत या वर्गासमोर अनेक आव्हाने आहेत. त्यांचे कोवळे मन भरकटत जाण्याची शंका प्रबळ आहे. संस्कारित मनच या आव्हानांना सामोरे जाऊन कणखर होऊ शकते. समाजमनाचे आरोग्य सुदृढ राहण्यासाठी केंद्र शासनाच्या लोककल्याणकारी पण दीर्घकालीन योजना आणि त्यांची अंमलबजावणी महत्त्वाच्या ठरतात. या योजनांमुळे समाजातील घटकांना आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक लाभ मिळाला की स्थिरता प्राप्त होते. सर्व सुबुद्ध नागरिकांनी काळाची गरज ओळखून राष्ट्र प्रवाहात सामील होऊन समाजमनाचे आरोग्य सुदृढ होण्यास मदत करावी.

**संजय पाठक**/९४२२१४७६७७

●● ●●

## मनपा निवडणूक म्हणजे जनसेवा हीच ईश्वरसेवा...

अमरावती शहरातील जनतेची मनोभावे सेवा हीच खरी ईश्वरसेवा हा श्रद्धाभाव मनात ठेवून आज सर्व उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत. त्या पैकी बरेचजण अधिकृत पक्षाचा एबी फॉर्म घेऊन निवडणूक लढवत आहेत तर उर्वरित उमेदवार भाग्याची सत्त्व परीक्षा पाहण्यासाठीच रिंगणात आहेत.

ज्या भाग्यवंतांना पक्षाचा एबी फॉर्म प्राप्त झाला त्या लोकशाहीच्या भक्तांवर लक्ष्मीमातेची असीम कृपाच म्हणायला हवी, कारण एबी फार्म मिळवायला काही उमेदवारांना कोणत्या दिव्यातून जावे लागले हे आपण टीव्हीवर भुवया उंचावून, आश्चर्यचकित होऊन, याचि देही याचि डोळा पाहिले. विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यात एका उमेदवाराने एबी फॉर्म चक्क गिळला, तर काही उमेदवारांनी एबी फॉर्म असलेल्या गाडीचा, हिंदी चित्रपटात नायक खलनायकाच्या गाडीचा जसा पाठलाग करतात, तसाच चित्तथरारक पाठलाग नाशिकच्या मुख्य रस्त्यावर पाहायला मिळाला. काही जणांना तर चक्क फाटक तोडून, आडधाड आत घुसून एबी फॉर्म हस्तगत करावा लागला. एका उमेदवाराला पक्षाकडून एबी फॉर्म मिळेल की नाही याची खात्री नसल्यामुळे त्या उमेदवाराने डुप्लिकेट एबी फॉर्म बनुवून घेतला. या नाट्याचा पहिला अंक पार पडल्यानंतर लगेच पक्ष, पक्षप्रमुख व पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या दुसऱ्या अंकाला सुरुवात झाली. काही ठिकाणी ज्या उमेदवारांनी लक्ष्मीदर्शन घडवले, त्यानांच पक्षाचे तिकीट देण्यात आले असे सुद्धा ऐकण्यात आले. काही पक्षांनी फॉर्म दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी एबी फॉर्मचा गठ्ठा सोबत ठेवून उमेदवाराला तुला पाहिजे तेवढे तू घे... तू घे असे म्हणत एबी फॉर्म अगदी वेळेवर वाटले. आणि पक्षाचा अधिकृत उमेदवार म्हणून घोषित केले. त्यानंतर सुरू झाल्या उमेदवारी मागे घेण्याबाबत बैठका, विनवण्या, निवडणूक अधिकाऱ्यांना पत्र. या सर्व घडामोडी घडत असताना राज्यात अचानक जवळपास ५० ते ६० ठिकाणी सत्ताधारी महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले. हे कळताच कुणीतरी संतापून बोलले ''राज्यात लोकशाही संपली, झुंडशाही सुरू.'' हे ऐकून महाराष्ट्रातील जनता भयभीत झाली. हे भय संपत नाही तोच कुणीतरी आरोळी ठोकली ''मराठी जनतेने डोळे उघडावेत'', ''चुकाल तर संपाल.''

आपण संपून जाऊ या भीतीने मतदारांनी डोळे गच्च मिटून घेतले आणि स्वतःच्या मनाशी विचार करायला लागले की, महाराष्ट्रातील राजकीय नेते मंडळी विकासाच्या मुद्यावर व सुदृढ लोकशाहीसाठी जनतेला मतदानासाठी आव्हान करतात की भीती दाखवून घाबरवतात हेच कळत नाही. वारंवार पक्षांतर करणाऱ्या नेत्यांचा कोणताही फंडा असू द्या यांच्या फंद्यात न अडकता, आपण मात्र प्रामाणिकपणे समृद्ध लोकशाहीसाठी व शहराच्या सर्वांगीण विकासासाठी निर्भयपणे मतदान करूया.

**विजय शंकरराव इंगोले**/जुनी वस्ती, बडनेरा

●● ●●

## शहाबानो, 'हक' आणि संविधानाचा आवाज

चित्रपट हा केवळ मनोरंजनाचा प्रकार नसून समाजाचा आरसा आणि संस्कृतीचा जिवंत वाहक असतो. समाजातील विचार, भावना, संघर्ष आणि स्वप्ने यांचे प्रतिबिंब पडद्यावर उमटते. त्यामुळे चित्रपट केवळ कथा सांगत नाही, तर त्या काळाचा इतिहास, संस्कृती आणि मूल्यव्यवस्था जपतो. बदलत्या समाजमानसासोबत चित्रपटही बदलतो आणि त्यामुळेच तो आपल्या सामूहिक चेतनेचा महत्त्वाचा दुवा ठरतो.

नुकताच नेटफ्लिक्सवर 'हक' हा चित्रपट बघितला. या चित्रपटाने मनासमोर अनेक प्रश्न निर्माण केले. 'हक' चित्रपट पाहताना मनाच्या कडा हलतात. पडद्यावरची नायिका आपले अस्तित्व, आपला आवाज, आपला हक्क शोधत असते आणि तेव्हा नकळतच आपल्याला १९८५ मधील शहाबानो प्रकरणाची आठवण होते. एका वृद्ध, सामान्य मुस्लिम गृहिणीने न्यायालयाच्या दारात टाकलेले पाऊल हे केवळ निर्वाहभत्त्याची मागणी नव्हते; ते होते आपल्या देशातील भारतीय संविधान, न्यायव्यवस्था आणि धार्मिक कायदे विशेषतः मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड यांच्या परस्पर नात्याचा प्रश्न उपस्थित करणारे ऐतिहासिक पाऊल. 'हक' चित्रपट स्त्रीच्या स्वतंत्र ओळखीचा प्रश्न विचारतो. समाज, परंपरा, धर्म यांच्याकडून घातलेली चौकट स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाला किती घट्ट बांधून ठेवते, हे तो सांगतो. शहाबानो प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने भारतीय दंड प्रक्रिया संहितेनुसार स्त्रीस निर्वाहभत्ता देण्याचा निर्णय दिला. हा निर्णय भारतीय राज्यघटनेतील समतेचा आणि मानवी सन्मानाचा पुनरुच्चार होता. परंतु त्याला विरोध करताना मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने धार्मिक कायद्यांचा आधार घेत सरकारवर दबाव आणला आणि अखेरीस संसदेत वेगळा कायदा करून सर्वोच्च न्यायालयाचा परिणाम मर्यादित करण्यात आला. येथेच आपल्यासमोर एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो भारतीय संविधान मोठे की धार्मिक कायदे?

भारतीय संस्कृती विविधतेवर आधारलेली आहे. प्रत्येक धर्माला स्वतःची परंपरा, कायदे आणि जीवनपद्धती आहेत. मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड हे त्या परंपरेचे प्रतिनिधित्व करते. परंतु लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट अशी की, हे सर्व कायदे भारतीय संविधानाच्या चौकटीतच अस्तित्वात आहेत. संविधान हा या देशाचा सर्वोच्च कायदा आहे. सर्व नागरिकांना समानता, न्याय आणि स्वातंत्र्य देणारा एकमेव आधारस्तंभ. त्यामुळे कोणत्याही धार्मिक कायद्याला तेवढेच स्थान आहे, जेवढे ते संविधानाशी सुसंगत राहते. 'हक'मधील नायिका जेव्हा स्वतःच्या मुलांच्या जीवन जगण्याचा अधिकार मागते, तेव्हा समाज तिच्या आवाजाला परंपरेच्या नावाखाली थांबवू पाहतो. शहाबानोच्या बाबतीतही तेच घडले. एका बाजूला सर्वोच्च न्यायालयाने नागरिक या नात्याने तिला हक्क दिला; तर दुसऱ्या बाजूला धार्मिक परंपरेचे रक्षण करण्याच्या नावाखाली तिच्या हक्कांवर मर्यादा टाकण्याचा प्रयत्न झाला.

मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाला आपल्या देशात मान्यता मिळणे हीच एक जागा वेगळी बाब आहे इतर कुठल्याही देशांमध्ये तेथील अल्पसंख्यकांना स्वतःचा धार्मिक कायदा राबवण्याची मुभा अजिबात नाही; त्यांना त्या त्या देशातील घटनात्मक कायदे कानून मानावेच लागतात. त्यामानाने भारतातील मुस्लिमांना एक स्वतंत्र समांतर न्यायव्यवस्था उभी करण्याचा जो मर्यादित अधिकार प्राप्त झाला आहे तो आपल्या संविधानाच्या वर नाही हे एतद्देशीय मुस्लिमांनी पुरेपूर समजून घ्यावे. जेव्हा एखादा वैयक्तिक, नागरी हक्काचा प्रश्न येतो विशेषतः स्त्रीच्या सन्मानाशी संबंधित तेव्हा भारतीय संविधानाला प्राधान्य देणे अनिवार्य आहे. कारण संविधान सर्व नागरिकांना समान समजते; धर्मानुसार नव्हे, तर मानव म्हणून.

म्हणूनच कोणताही धार्मिक कायदा हा व्यक्तीच्या मूलभूत हक्कांवर वर्चस्व गाजवू शकत नाही. या ठिकाणी मुस्लिमांच्या दुटप्पी मानसिकतेचा प्रश्न अगदी स्पष्ट दिसतो. समाज आधुनिकतेची भाषा बोलतो, पण परंपरेच्या नावावर स्त्रीच्या हक्कांना कमी लेखतो. आज गरज आहे ती प्रामाणिक आत्मपरीक्षणाची. मुस्लिम समाजासह प्रत्येक समाजाने हा प्रश्न विचारला पाहिजे आपल्या धार्मिक परंपरा मानवी सन्मानाला पूरक आहेत का? आणि राज्याने, समाजाने, आपण सर्वांनी हे स्पष्टपणे मान्य केले पाहिजे. भारतीय संविधानापेक्षा मोठे अन्य कोणतेही धार्मिक, सामाजिक किंवा वैयक्तिक कायदे असू शकत नाहीत. कारण संविधानच या राष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीच्या 'हक्काचा श्वास' आहे.

**विवेक गडकर**/९३७०३२४१०५

●● ●●

## बंदी असताना नायलॉन मांजा येतो कुठून?

कायदे, अटी, नियम, बंदी अस्तित्वात असूनही नायलॉन मांजाची खरेदी-विक्री दिसून येते ही अत्यंत गंभीर आणि चिंताजनक बाब आहे. नायलॉन मांजाची विक्री होऊ नये म्हणून प्रशासन सज्ज असते व आहे. प्रशासन मांजाच्या दुकानावर छापे टाकते. तिथे कुठेही मांजा सापडत नाही किंवा दिसत नाही. नेमक्या मकरसंक्रांतीला नायलॉन मांजा कुठून येतो, हा आताही सर्वांपुढे मोठा गंभीर प्रश्न आहे. प्रशासनाने ऑनलाईन खरेदी-विक्रीकडे करडी नजर ठेवण्याची नितांत गरज आहे. तेथूनच नायलॉन मांजावर ब्रेक लावता येईल. राज्यातील अनेक भागांत नायलॉन मांजाची आवक



उत्तर प्रदेशच्या बरेली आणि गुजरातच्या वडोदरा येथून होत असल्याचे सांगितले जाते. नायलॉन मांजावर बंदी असून सुद्धा विक्री सर्रास सुरू आहे याला आपणच रोखू शकतो. नायलॉन मांजा मानव आणि पशु-पक्ष्यांसाठी जीवघेणा व अत्यंत घातक आहे. त्यामुळे नायलॉन मांजाचा बहिष्कार सर्वच स्तरातून होणे अत्यंत गरजेचे आहे. कारण नायलॉन मांजाच्या विरोधात प्रशासनाने कंबर कसली आहे. त्याच धर्तीवर सर्वसामान्यांनी नायलॉन मांजाच्या विरोधात ॲक्शन मोडमध्ये येण्याची नितांत गरज आहे. राज्यातील अनेक भागांत नायलॉन मांजामुळे अंगावर शहारे येणाऱ्या घटना घडल्या आहेत आणि आताही घडतच आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे. कोणत्याही दुर्घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता नायलॉन मांजाचा सर्वच स्तरातून बहिष्कार होणे अत्यंत आवश्यक आहे. याकरिता नागरिकांनीच प्रथम पाऊल उचलले पाहिजे तेव्हाच प्रशासनाला कारवाई करण्यास मोठी मदत होईल. एखाद्या विजेच्या ताराला जर पतंग अडकली तर तारांचे घर्षण होऊन ठिणग्या निर्माण होतात आणि त्यातून विजेच्या धक्क्याने एखाद्याचा प्राणसुद्धा जाऊ शकतो. पोलिस विभाग नायलॉन मांजाच्या बाबतीत सतर्कता बाळगून लाखो रुपयांचा नायलॉन मांजा रोज जप्त करीत आहे. परंतु प्रश्न आहे की, मांजा येतो कुठून? याचा उलगडा झाला पाहिजे.

**रमेश लांजेवार**/९९२१६९०७७९

●● ●●

## माणसाने माणसाशी माणसासम वागणे : एक वास्तववादी प्रार्थना

संत एकनाथ महाराज आपल्या एका अभंगात म्हणतात, ''सर्व भूती भाव नको ठेवू दुजा तेणे गरुडध्वजा समाधान संतांसी नमन, आलिया अन्नदान यापरते कारण आणिक नाही सर्वभावे वारी पंढरीची करी आणिक व्यापारी गुंतू नको म्हणे जनार्दन घेई हाच बोध सांडूनी सर्वदा द्वेष भेद ॥''

नुकत्याच दोन वेगवेगळ्या प्रसंगांच्या अनुभवाने वरील अभंग हा मनाला अंतर्मुख करणारा ठरला. एका कार्यक्रमात गेलो होतो. जेवणं झालीत. आता सारी आवरावर सुरू असताना, एक अनोळखी वयस्क महिला आली. तिला मुलांनी बसवून जेवण वाढलं. भरभरून आशीर्वाद देऊन ती पुढे निघून गेली.

एका नामांकित हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांकडे तपासणीसाठी गेलो होतो. दोन दिवसांपूर्वी डॉक्टरांनी सांगितलेल्या तपासण्याचे रिपोर्ट्स केवळ डॉक्टरांना दाखवायचे होते. हॉस्पिटलमध्ये पहिल्या भेटीत तपासणी फी ही चांगली मोठी रक्कम दिलीच होती. अगदी दोनच दिवसांनी, रिपोर्ट दाखवताना सुद्धा तेवढीच रक्कम द्यावी लागली. जरा कसंसच झालं. ''अरे बापरे माणुसकीच संपली की काय?'' हेच वाक्य तिथे बाहेर पडलं. विचारचक्र सुरू झालं. ही समस्या आपल्यासारख्या सामान्य माणसांसाठी नित्याची आणि सवयीची झालेली आहे. ''माणसाने, माणसाशी, माणसासम वागणे'' खरोखरीच आज आपण माणुसकीच विसरत चाललो आहे की काय असं वाटायला लागतं. ''माणसाने माणसांशी माणसासम वागणे'' हे केवळ कवी अविनाश पाटील यांचे शब्द नाहीत, तर तो मानवी उत्क्रांतीचा सर्वोच्च आदर्श आहे. आजच्या चकाकत्या पण तितक्याच निष्ठुर जगात जेव्हा आपण मागे वळून पाहतो, तेव्हा या वचनाची गरज ऐतिहासिक काळापेक्षा आज अधिक प्रकर्षाने जाणवते. आजची वर्तमानपत्रे उघडली की माणसासम वागणे या उक्तीला काळिमा फासणाऱ्या अनेक बातम्या समोर येतात. युद्धाच्या बातम्या, देशादेशांमध्ये सुरू असलेल्या संघर्षात पडणारे निष्पाप मृतदेह, अपघाताच्या ठिकाणी मदतीऐवजी व्हिडीओ काढणारी गर्दी किंवा जाती-धर्मावरून होणारी हाणामारी या वर्तमानपत्रातील बातम्या हेच दर्शवतात की, आपण तांत्रिकदृष्ट्या स्मार्ट झालो आहोत, पण मनाने पाषाण झालो/होत आहोत.

संत तुकाराम महाराज म्हणतात, ''जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले । तोचि साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा ॥'' अर्थात, जो दुःखी माणसाला जवळ करतो, तोच खरा माणूस आणि तिथेच देव असतो. संत ज्ञानेश्वर माउलींनी पसायदानात संपूर्ण विश्वाच्या कल्याणाची मागणी केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी तर ग्रामगीतेतून ''माणुसकी हाच श्रेष्ठ धर्म'' असल्याचे सांगितले. जेव्हा एखादा व्यापारी ग्राहकाला न फसवता योग्य माल देतो, जेव्हा एखादा डॉक्टर गरिबावर विनामूल्य उपचार करतो किंवा जेव्हा एखादा समृद्ध देश गरीब देशाला संकटात मदत करतो, तेव्हा तिथे माणुसकी प्रत्यक्ष अवतरते. समाजातील आदिवासी, भटके-विमुक्त, अनाथ किंवा तृतीयपंथी यासारखे उपेक्षित घटक आजही मुख्य प्रवाहापासून दूर आहेत. येथे माणसासम वागणे म्हणजे त्यांना दया दाखवणे नव्हे, तर त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार देणे होय. शिक्षण ही केवळ पदवी मिळवण्याची प्रक्रिया नसून माणूस घडवण्याची शाळा आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये केवळ स्पर्धा न रुजवता संवेदनशीलता रुजवावी. गरीब किंवा अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्याला कमी न लेखता, त्याला प्रेमाने जवळ घेऊन प्रोत्साहन दिल्यास तोही एक चांगला माणूस बनू शकतो. मालक आणि मजूर यांच्यातील संबंध अनेकदा शोषणाचे असतात. वरच्या हुद्यावर असलेल्या व्यक्तीने आपल्या हाताखालील कर्मचाऱ्याला माणूस म्हणून मिळणारी वागणूक देणे आवश्यक आहे. अधिकार गाजवण्यापेक्षा सहकार्य करणे हाच या वचनाचा खरा अर्थ आहे.

**श्रीकांत भास्कर तिजारे**/९४२३३८३९६६

●● ●●

## अल्कोहोलिक्स ॲनानिमस : दारूमुक्तीसाठी नवी आशा

आमच्या गावातील दोन तरुण मुलांना व्यसनमुक्ती केंद्रामध्ये भरती करण्यासाठी मी घेऊन चालले होते. एसटी बसचा प्रवास, दोघेही माझ्या आजूबाजूला बसलेले. माझ्या डोळ्यांसमोरच वाढलेली ही मुलं! नागपूर शहरा लगतच्याच गावातली. घरच्यांनी शेती विकली, भरपूर पैसा हाती आला. नको ती संगत लागली. मुलं दारूच्या अधीन झाली. गावात जवळपास सर्वच घरांत हीच परिस्थिती. दारूच्या व्यसनापायी अनेक संसार उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आलेले. शिक्षण तेवढ्यापुरतेच, डोळ्यासमोर काही ध्येय नाही. युवा पिढीही व्यसनात गुरफटत चालली होती. या दोन्ही मुलांच्या आयुष्याची दारूच्या व्यसनापायी झालेली अवस्था पाहताना, त्यांच्या आई-बाबांच्या डोळ्यातील अश्रू थांबत नव्हते. देव-धर्म, बुवा-बाबा, औषध सारे इलाज करून झाले, पण दारू सुटत नव्हती. शेवटी दारूमुक्ती केंद्रात मी त्यांना भरती करून द्यावे, अशी गळ मला त्यांच्या आई-बाबांनी घातली. म्हणून मी त्यांना व्यसनमुक्ती केंद्रात भरती करून आले. तीन महिन्यांचा कालावधी उलटला. दोन्ही मुलं घरी परत आली. चार दिवस चांगले गेले. पाचव्या दिवशी पुन्हा तेच. दारू काही सुटली नाही. २००२ ते २०१२ या दहा वर्षांच्या काळात व्यसनमुक्तीच्या कार्यासाठी मी शर्थीचे प्रयत्न करीत राहिले. पण प्रत्येकवेळी हाती निराशा आली! एका वर्तमानपत्रातून माझा दारूमुक्तीच्या कामावर आधारित 'व्यसन' हा लेख प्रकाशित झाला. हा लेख वाचून 'एए' म्हणजे अल्कोहोलिक्स ॲनानिमसच्या एका सदस्याचा, मी त्यांच्या कार्यक्रमात वक्ता म्हणून यावं असा निरोप मिळाला आणि मला त्या दिवशी दारूमुक्तीच्या कार्याची सुवर्णवाट गवसली. ती वाट होती अल्कोहोलिक्स ॲनानिमस या जागतिक संघटनेची! दारूने पीडित कितीतरी लोकांना मी 'एए'शी जोडत गेले. त्या दोन मुलांसह अनेक लोकांना या संघटनेमुळे दारूपासून मुक्त होता आले. अनेकांचे तुटलेले संसार सावरत गेले. गेलेला आत्मसन्मान परत मिळू लागला.

हे 'एए' म्हणजे आहे काय? आणि कुठलेही औषध-पाणी, जंतर-मंतर, जादूटोणा, देव-धर्माशिवाय 'एए'मध्ये आल्यानंतर दारूच्या पूर्णतः आहारी गेलेला माणूस दारूमुक्त होतो तरी कसा? जगाच्या पाठीवर जवळपास दोनशे देशांमध्ये 'एए' ही स्वयंसेवी संघटना दारूमुक्तीचे कार्य करीत आहे. 'दारू सोडण्याची इच्छा' ही या संघटनेचे सभासद होण्याची एकमेव अट आहे. यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही. बिल आणि डॉ. बॉब यांच्या अथक परिश्रमातून उदयास आलेल्या या जागतिक स्वयंसेवी संघटनेचा १० जून हा स्थापना दिवस आहे. 'एए'मध्ये दारूमुक्तीसह अनेक मानवी विकार अर्थात षडरिपूंपासून दूर राहण्याकरिता काही तत्त्वे व कृती अंमलात आणल्या जातात. ज्यांना बारा पायऱ्या (ट्वेल्थ स्टेप्स) म्हटले जाते. मद्यपाश हा एक आजार असून स्वतःसह इतरांनाही या आजारापासून दूर ठेवण्यासाठी सर्व सदस्य सतत कार्यरत असतात. जगभरातील अनेक देशांत शहरांपासून तर गाव खेड्यांपर्यंत 'एए'चे लाखो समूह आहेत. 'फक्त आजचा दिवस' या तत्त्वाने दारूमुक्तीचा प्रवास सुरू होतो. 'एए'च्या समूहांमध्ये सदस्य आपले स्वतःचे अनुभव शेअर करतात आणि एकमेकांना भावनिक आधार देतात. भारतात १९५७ पासून ही संस्था अत्यंत यशस्वीपणे कार्य करीत आहे. मद्यपीडितांना अनुभव, शक्ती आणि नवजीवनाची आशा प्राप्त करून त्यांना सकारात्मक व संयमित जीवन जगण्याची दिशा मिळावी या दृष्टीने अधिवेशनांचे आयोजन केले जाते. यातून नशामुक्ती, मानसिक स्वास्थ्य, सेवा आणि एकतेचा संदेश सर्वांपर्यंत पोहचविला जातो. ९, १० व ११ जानेवारी २०२६ या कालावधीत नागपूर येथे अल्कोहोलिक्स अनानिमसचे राष्ट्रीय अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले.

**डॉ. संध्या पवार**/नागपूर

●● ●●

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### शहरात २४ जानेवारीपर्यंत जमावबंदी सदृश निर्बंध; शस्त्रे, स्फोटके, मिरवणुका व घोषणांवर बंदी

**सोलापूर, दि.१० जानेवारी-**

शहरात सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी पोलीस उप आयुक्त डॉ. अश्विनी पाटील यांच्या आदेशाने कडक निर्बंध लागू करण्यात आले आहेत. दि. १० रोजी रात्री १२.०१ वाजल्यापासून ते दि. २४ जानेवारी रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत हे निर्बंध लागू राहणार आहेत. आयुक्तालयाच्या हद्दीत शस्त्रे, अग्निशस्त्रे, तलवारी, भाले, दंडुके, सोटे, काठ्या, लाठ्या, चाकू तसेच हिंसाचाराच्या वस्तूंस बंदी घातली आहे. केवळ सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या वैध परवान्याच्या शस्त्रांना यातून वगळले आहे. स्फोटके, दगड, क्षेपणास्त्रे, प्रक्षेपणासाठी वापरली जाणारी साधने वाहून नेणे, साठवणे अथवा तयार करणे यावरही सक्त मनाई आहे. कोणत्याही व्यक्तीचे, प्रेताचे, पुतळ्याचे प्रदर्शन तसेच सार्वजनिक ठिकाणी घोषणाबाजी, उच्च स्वरात गाणी गाणे, संगीत वाजवणे यालाही बंदी आहे. सामाजिक शालीनता, नैतिकता किंवा सार्वजनिक सुरक्षेला धोका पोहोचवू शकणारी चित्रे, फलक, चिन्हे किंवा साहित्य तयार करणे, प्रदर्शित करणे अथवा प्रसारित करण्यास मनाई आहे. हा आदेश शासकीय सेवेत कार्यरत अधिकारी-कर्मचारी त्यांच्या कर्तव्याच्या अनुषंगाने शस्त्रे बाळगत असतील तर त्यांना लागू होणार नाही. तसेच खाजगी सुरक्षा रक्षक, गुरखा, चौकीदार आदींनाही (३२ फूट लांबीपर्यंतच्या लाठ्यांसह) सूट देण्यात आली आहे.



### एसपीएम स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर, दि. १० जानेवारी-**


शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे यांच्या अंतर्गत कार्यरत एस.पी.एम. इंग्लिश स्कूल येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठीचे वार्षिक स्नेहसंमेलन व पदवीदान समारंभ पार पडला. या सांस्कृतिक म होत्सवाला प्रतिबिंब - द रिफ्लेक्शन असे नाव देण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन हृदयरोग तज्ज्ञ डॉ. सुनील शेवाळे तर सन्माननीय पाहुणे म्हणून डॉ. नील (श्रीकांत) अंजुटगी उपस्थित होते. तसेच संस्थेचे विविध शाळेचे मुख्याध्यापक व मुख्याध्यापिका उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीपप्रज्वलन व स्वागतगीताने वातावरण मंगलमय झाले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील नाट्यप्रयोगांनी उपस्थितांची मने जिंकली. सामाजिक संदेश देणारे मराठी नाटक, देशभक्तीवर आधारित हिंदी नाट्यछटा तसेच इंग्रजी भाषेतील प्रभावी लघुनाट्य यांमधून विद्यार्थ्यांच्या अभिनयकौशल्याचे दर्शन घडले. यासोबतच पदवीदान समारंभात विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. प्राचार्या संगीता कोळी यांनी मनोगत व्यक्त केले. शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी या कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

### मार्केट यार्ड येथील अपघातात दुचाकीस्वार पिता-पुत्र जखमी

**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

मार्केट यार्ड परिसरात भरधाव चारचाकी वाहनाने दुचाकीला कट मारल्याने झालेल्या अपघातात पिता-पुत्र जखमी झाल्याची घटना ५ जानेवारी रोजी सकाळी सातच्या सुमारास घडली. याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धनराज भिमराव सितापुरे (वय ५०) रा. तळे हिप्परगा, सोलापूर असे जखमी फिर्यादीचे नाव असून ते मुलगा प्रियाल याच्यासह दुचाकी एमएच २५ बीजी ६७७८ वरून कामावर जात होते. यावेळी चारचाकी वाहन एमएच २५ आर १४७७ चालक आमीन बद्रहिन फुलारी रा. गुंजोटी, ता. उमरगा, जि. धाराशीव याने वाहन हयगयीने व निष्काळजीपणाने चालवत दुचाकीला कट मारला. या अपघातात धनराज सितापुरे यांना मुकामार लागला असून मुलगा प्रियाल याच्या डाव्या हाताला खरचटले तसेच डाव्या पायाला फ्रॅक्चर झाले आहे. उपचारासाठी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल वाडीकर हे करीत आहेत.

### मराठा सेवा संघातर्फे सोमवारी जिजाऊ जन्मोत्सव



**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

सालाबादप्रमाणे याही वर्षी मराठा सेवा संघाच्या वतीने जिजाऊ सृष्टी सिंदखेडराजा (जि. बुलढाणा) येथे दिनांक १२ जानेवारी रोजी जिजाऊ जन्मोत्सव सोहळा संपन्न होणार आहे. तमाम मराठा बहुजन बांधवांचे श्रद्धा स्थान असणाऱ्या जिजाऊ सृष्टीवर नववर्षीन प्रकल्प वेगाने उभे राहत आहेत. या कामी निधीची नितांत गरज लागते. हे काम अविरत सुरू रहाव यासाठी प्रत्येकाच्या मदतीची गरज आहे. आपण या सत्कार्यात आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन मराठा सेवा संघाचे विभागीय अध्यक्ष प्रशांत पाटील यांनी केले आहे.

### डॉ. आंबेडकर मेमोरियल हायस्कूल येथे सावित्रीबाई फुले जयंती

**सोलापूर, दि..१० जानेवारी-**

डॉ.आंबेडकर मेमोरियल हायस्कूल येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांची समयोचित भाषणे झाली. दीपक माने, मुख्याध्यापिका संतोषी साबळे यांनी विचार व्यक्त केले. सूत्रसंचालन सुशील जानराव यांनी केले तर अज्ञीर मीना कोळी यांनी मानले.

# चारचाकीच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

### वळसंगमध्ये भीषण अपघात; चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.१० जानेवारी-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील दर्गनहळ्ळी परिसरात भरधाव व निष्काळजीपणे चालवलेल्या चारचाकी वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या प्रकरणी वळसंग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस तपास सुरू आहे.

दि. ७ जानेवारी रोजी सायंकाळी साडेसात



वाजण्याच्या सुमारास मौजे दर्गनहळ्ळी (ता. दक्षिण सोलापूर) येथे हा अपघात झाला.

विठ्ठल गुंडेबा भोसले (वय ६५, रा. पापरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर) यांचा मुलगा अभिमान विठ्ठल भोसले हे त्यांच्या मोटरसायकल (एमएच १३ बीएल ८६९०) वरून जात असताना समोरून येणाऱ्या चारचाकी वाहना (एमएच १३ एझेड ७२३९) ने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. चारचाकी वाहनाचा चालक अनिकेत दयानंद वाघमारे (वय ३६, रा. मुळेगाव, ता. दक्षिण सोलापूर) याने वाहन भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालविल्यामुळे हा अपघात झाल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

धडकेनंतर अभिमान भोसले गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी हलविण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद दि. ९ जानेवारी रोजी सायंकाळी ८ वाजण्याच्या सुमारास वळसंग पोलीस ठाण्यात करण्यात आली. या प्रकरणाचा तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल कुंवर करीत असून अद्याप आरोपीस अटक करण्यात आलेली नसून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# मंत्रीचंडक सोसायटीत वृद्धाची गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० जानेवारी-**

मंत्रीचंडक सोसायटी परिसरात ७० वर्षीय वृद्धाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शनिवार दि. १० जानेवारी रोजी सकाळी उघडकीस आली. शिवप्पा तेजप्पा कांबळे (वय ७०, रा. मंत्रीचांडक सोसायटी, आसरा चौक, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या वृद्धाचे नाव आहे.

शनिवारी सकाळी सुमारे ७.३० वाजण्याच्या सुमारास मंत्रीचांडक सोसायटी येथील आसरा चौकाजवळ असलेल्या मोकळ्या मैदानातील लिंबाच्या झाडाला एका वृद्धाने गळफास घेतल्याचे स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास आले. याची माहिती तात्काळ पोलिसांना देण्यात आली.

माहिती मिळताच पोलिस हेड कॉन्स्टेबल मनुरे यांनी घटनास्थळी धाव घेत वृद्धाला बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले. मात्र सकाळी सुमारे ८.३० वाजता डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या प्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्याचे अधिकारी अधिक तपास करीत आहेत.

### प्रभाकर पवार यांना पीएचडी पदवी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्यावतीने प्रभाकर विठ्ठल पवार यांना पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.



प्रभाकर पवार यांच्या संशोधनाचा विषय मेकॅनिकल इंजिनिअरिंगमधील 'डिझाईन ॲनॅलिसिसी ॲण्ड ऑप्टिमायझेशन ऑफ अ टू स्टेज प्लॅनेटरी गिअर बॉक्स फॉर हाय रिडक्शन रेशो' हा होता. या संशोधनासाठी गाईड म्हणून वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाचे विभाग प्रमुख डॉ. बी.बी. देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले. प्रभाकर पवार हे लक्ष्मी हायड्रॉलिक्स प्रायव्हेट लिमिटेड येथे संशोधन व विकास विभागात जनरल मॅनेजर म्हणून कार्यरत असून हा शोध प्रबंध करता असताना व्यवस्थापकीय संचालक शरद ठाकरे व संचालक आदित्य ठाकरे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे.

# पत्रकार समाजाचे 'प्रबोधन'कार असतात : प्रा.उबाळे

### कै.बाबुरावसा भुमकर पत्रकारिता पुरस्कार वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

सामान्य जनतेच्या वेदना राज्यकर्त्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम पत्रकार करत असतात. समाजाला साक्षर करणारे पत्रकार हेच सम जाचे खरे प्रबोधनकार असतात. राज्यकर्ते व समाजाने पत्रकारांच्या व्यथा समजून घेतल्या पाहिजेत, असे प्रतिपादन दयानंद शिक्षण संस्थेचे प्रशासक तथा माजी प्राचार्य डॉ.विजयकुमार उबाळे यांनी केले.

सो.स.सत्रिय समाज विठ्ठल मंदिर ट्रस्ट सोलापूर संचलित सहस्रार्जुन शैक्षणिक संकुलात आयोजित कै.बाबुरावसा दत्तात्रयसा भुमकर पत्रकारिता पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ट्रस्टचे अध्यक्ष संजीव बिद्री हे होते. व्यासपीठावर शिक्षण



संकुलाचे अध्यक्ष राजु भूमकर, ट्रस्टचे सचिव जयकुमारसा कोल्हापुरे, शिक्षण संकुलाचे सचिव गजानन गोयल, भरतकुमार शालगर, गणेश दामजी, संजीव रंगरेज, शिरीष कोल्हापुरे, तुकाराम पवार, मुख्याध्यापक भगवंत उमदीकर, मुख्याध्यापिकाद्वय मंजुषा काशीद, सविता हातवळणे उपस्थित होते. मंजुषा काशीद यांनी प्रास्ताविक तर जय कबाडे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकाश आळंगे,

**दै.तरुण भारतचे अविनाश गायकवाड यांच्यासह 'या' पत्रकारांचा सन्मान**

दैनिक तरुण भारतचे वरिष्ठ उपसंपादक अविनाश गायकवाड यांच्यासह पत्रकार नागराज बगले, विनोद कामतकर, प्रभू वारशेट्टी, श्रीशैल भद्रशेट्टी, शरीफ सय्यद, संतोष चितापुरे, विष्णू सुरवसे, प्रीतम पंडित, मनोज हुलसुरे, सोनू शहानूरकर, बाळकृष्ण दोड्डी, शेखर गोतसुर्वे, नितीन पात्रे आदी पत्रकारांचा सन्मान करण्यात आला.

मल्लेश पुरवंत, अजय कोल्हापुरे, उमेश गायकवाड, नागेश दलभंजन, प्रमोद काकडे यांनी परिश्रम घेतले.

# यमाईदेवी आश्रमशाळेत नंदीध्वज मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**उत्तर सोलापूर, दि. १० जानेवारी-**

यमाईदेवी प्राथमिक आश्रम शाळा मार्डी तालुका उत्तर सोलापूर येथे सालाबाद प्रमाणे या ही वर्षी सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्ध रामेश्वर महाराज यांच्या यात्रे निमित्त नंदिध्वज मिरवणूक काढण्यात आली.

सर्वप्रथम श्री सिद्धेश्वर सहकारी बँकेचे तज्ञ संचालक ॲड. धान्प्पा चिवरी यांच्या हस्ते श्री शिवयोगी सिद्ध रामेश्वर महाराज व बारा ज्योतिर्लिंग यांच्या फोटोंचे विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी संस्थापक अध्यक्ष अशोक लांबतुरे, सचिव मधुकर गवळी, मुख्याध्यापिका सौ रुक्मिणी गवळी, ज्येष्ठ शिक्षक नानासाहेब लोखंडे, महादेव करे, तानाजी तानगावडे, अशोक देशमुख, विनोद कोळेकर, अमोल गुरव, बसवराज तुळजापूरे, संदिप चव्हाण उपस्थित होते.

प्रसंगी शाळेच्या परिसरातून आकर्षक मैदानाची सजावट करून फुलांच्या पायघड्या घालून श्री शिवयोगी सिद्ध रामेश्वर महाराज यांच्या पालखीची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांनी पारंपारिक बाराबंदी पोषाख, मानाचे मानकरी





यांची वेशभूषा करून मिरवणूकीची शोभा वाढवली. श्री शिवयोगी सिद्धेश्वर महाराज की जय, हर बोला हरच्या घोषणांनी परिसर दुमदुमून निघाला.

सूत्रसंचालन विनोद कोळेकर यांनी केले तर आभार तानाजी तानगावडे यांनी मानले.

**आज वितरण**

# उद्योजक आदमाने व डॉ.गोडगे यांना समृध्दी युवा पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**उत्तर सोलापूर, दि. १० जानेवारी-**

राष्ट्रीय युवक दिनानिमित्त समृद्धी कला मंच वतीने उद्योजक युवक सुहास आदमाने व युवती डॉ. ऋचा गोडगे यांना समृद्धी युवा पुरस्कार जाहिर करण्यात आला असल्याचे समृद्धी सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष संजय सावंत यांनी जाहिर केले. निवड समिती सदस्य गणेश पवार, संतोष शिरसट व अरविंद मोटे यांनी यांची निवड केली आहे.

येथील समृद्धी कला क्रीडा सांस्कृतिक मंडळ अंतर्गत समृद्धी कला मंचच्या राज्यस्तरीय खुल्या वक्तृत्व स्पर्धेचा सम रोपप्रसंगी हे पुरस्कार देण्यात येणार आहेत. मानपत्र, शाल, फेटा व बुके देऊन त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. तसेच समृद्धी





परिवारातील मयुरेश वाघमारे व भक्ती घुले या युवक व युवतीचा तसेच खेळाडूंचाही सत्कार मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे.

सिद्धेश्वर मंदिराशेजारील डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात याचे वितरण रविवारी (दि.११) सायंकाळी सात वाजता होणार आहे. राष्ट्रीय युवक दिन व राजमाता जिजाऊ जन्मोत्सवाच्या निमित्ताने राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचेही आयोजन रविवारी केले आहे. ही स्पर्धा सकाळी एक वाजता सुरू होणार आहे. या स्पर्धेत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून निवडक ४७ स्पर्धकांची नोंदणी करण्यात आली आहे.

सोलापुरातील श्रोत्यांनी उत्कृष्ट भाषणे ऐकण्याच्या संधीचा लाभ घ्यावा, असे आव्हान समृद्धी कला मंचचे अध्यक्ष कृष्णकांत चव्हाण उपाध्यक्ष मल्हारी बनसोडे, सुमित फुलमामडी, किरण लोंढे, सहकार्यवाह श्रीमंत कोळी यांनी केले आहे. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी स्पर्धाप्रमुख मल्लिनाथ निंबर्गी सहकार्यवाह, हिरालाल धुळम, श्रीमंत कोळी, अर्चना कलखांबकर, डॉ माधुरी भोसले, अमोलिका जाधव विशेष प्रयत्न करीत आहेत.

# रिक्षात आढळला तरुणाचा मृतदेह

**तभा वृत्तसेवा,**
**उ.सोलापूर, दि. १० जानेवारी-**

शहरातील मंजरेवडी परिसरात रिक्षात बेशुद्ध अवस्थेत आढळलेल्या तरुणाचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याची घटना शनिवारी दि. १० वाजता सकाळी उघडकीस आली आहे.

मयत तरुणाचे नाव नितीन गणपत गायकवाड वय ३७ असून तो गजानन नगर, मंजरेवडी, सोलापूर येथे राहणारा होता. शनिवारी सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास सहील नगर, मजरेवडी रोड परिसरात रस्त्याच्या कडेला थांबलेल्या रिक्षामध्ये नितीन गायकवाड बेशुद्ध अवस्थेत आढळून आला.

ही बाब लक्षात येताच त्याचा मित्र मनोज भडकुंबे यांनी तातडीने त्याला उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीअंती उपचारापूर्वीच नितीनचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. नितीन गायकवाड यांच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# विकी गायकवाड दोन वर्षांसाठी सोलापुरातून तडीपार

**तभा वृत्तसेवा,**
**उत्तर सोलापूर, दि. १० जानेवारी-**

सामान्य नागरिकांवर मारहाण, दमदाटी व चोरीसारख्या गुन्ह्यांमध्ये वारंवार सहभाग आढळून आल्याने विकी राजू गायकवाड वय २९, रा. सेटलमेंट फ्री कॉलनी क्र. ०१, सोलापूर यास सोलापूर शहर तसेच उर्वरित सोलापूर जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आले आहे.

विकी गायकवाडवर जयवायाविरोधात सन २०२३ ते २०२५ या कालावधीत सलगर वस्ती पोलीस ठाण्यात विविध गुन्हे दाखल असून, त्यामध्ये साथीदारांसह सामान्य नागरिकांना मारहाण करणे, दहशत निर्माण करणे व चोरीसारख्या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांचा समावेश आहे. त्याच्या या गुन्हेगारी पार्श्वभूमीमुळे सार्वजनिक सुव्यवस्थेला धोका निर्माण होत असल्याने सलगर वस्ती पोलीस ठाण्याकडून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम ५६ (१) (अ) व (ब) अन्वये तडीपारचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

या प्रस्तावावर सुनावणी करून पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ) सोलापूर शहर विजय कबाडे यांनी कार्यवाही करत विकी राजू गायकवाड यास सोलापूर शहर व उर्वरित सोलापूर जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार करण्याचे आदेश दिले आहेत.


**Classifieds**

**भाड्याने देणे आहे**

मंद्रुपमधील समर्थ नगर येथील टू बीएचके घर भाड्याने देणे आहे. कुटुंब असणाऱ्यांना प्राधान्य. लाईट, पाणी, पार्किंग, या सर्व सोयी सहित घर भाड्याने देणे आहे.

संपर्क - सावन चव्हाण ९७६७३६९७८९

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्या नुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**इंजिनिअरिंग कार्य**

मध्य रेल्वे कार्यालय मंडळ रेल प्रबंधक (कार्य) सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी दिनांक ०६/०२/२०२६ रोजी १५:०० वाजेपर्यंत खालील कामांसाठी ई-निविदा (e-tender) आमंत्रित करत आहेत: ०१ कामाचे नाव: Development work at Osmanabad Good shed. ०२ अंदाजित खर्च: ₹ १४,०४,५६,३७५.२१ ०३ बयाना रक्कम (Earnest Money): ₹ ८,५२,३००.०० ०४ समाप्तीचा कालावधी: १२ (Twelve) Months ०५ अनुरक्षण (Maintenance) कालावधी: २४ (Twenty F$our) Months ०६ ई-निविदा फॉर्मची किंमत: Nil ०७ ई-निविदा फॉर्म जमा करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: ०६/०२/२०२६ up to १५:०० hrs. ०८ ई-निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: ०६/०२/२०२६ after १५:३० hrs. ०९ वेबसाइट तपशील: www.ires.gov.in, नोट: संभाव्य निविदाकर्त्यांना सल्ला देण्यात येतो की त्यांनी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी या वेबसाइटला वारंवार भेट द्यावी, जेणेकरून या निविदा वेबसाइटसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्रक (corrigendum) लक्षात घेता येईल. www.ires.gov.in. ANJ-11

तिकिटांसाठी UTS ॲप डाउनलोड करा.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. निविदा क्रमांक SUR/L/T/2025/25. कामाचे नाव: सोलापूर विभागातील DEN/W/SUR आणि DEN/LUR अंतर्गत SUR (प्रकार-III 04 युनिट्स आणि प्रकार-खत02 युनिट्स), PJR (प्रकार-खख ०४ युनिट्स) आणि YSI (प्रकार-II 02 युनिट्स) येथे जुन्या क्वार्टरच्या जागी क्वार्टर बांधण्याच्या संबंधात कामाचा इलेक्ट्रिकल जनरल सर्व्हिस भाग. अंदाजे किंमत:- 2738492.26/-, बोली सुरक्षा: 54800/-, पूर्ण कालावधी: -12, महिने ऑफरची वैधता:- 60 दिवस, निविदा क्रमांक SUR/L/T/2025/27. कामाचे नाव: - DEN/KWV (BG) उपविभागाअंतर्गत KWV (प्रकार-III 04 युनिट्स), MLM² (प्रकार-खख 04 युनिट्स) येथे जुन्या क्वार्टरच्या ऐवजी क्वार्टर बांधण्याचे काम, अंदाजे किंमत:- 1705254.35/-, बिल्ड सुरक्षा:-34800/-पूर्ण कालावधी:- 12 महिने ऑफरची वैधता: 60 दिवस निविदा क्रमांक SUR/L/T/2025/28. कामाचे नाव: सोलापूर विभागातील उुख्छ/ LUR अंतर्गत LUR (प्रकार-III 04), OS (प्रकार-II 04 युनिट्स), DKY (प्रकार-11 02 युनिट्स) येथे नवीन क्वार्टरच्या बांधकामाशी संबंधित कामाचा इलेक्ट्रिकल जनरल सर्व्हिस भाग, अंदाजे खर्च:-रू. 1903142.20/- बोली सुरक्षा: 38100/- पूर्ण कालावधी: -12 महिने, ऑफरची वैधता: -60 दिवस ANJ-09

तिकिटांसाठी UTS ॲप डाउनलोड करा.

**मध्यवर्ती रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**व्यावसायिक काम**

सूचना क्रमांक: GEM/2025/B/6919710 दिनांक- 09.01.2026, डीआरएम(सी) कार्यालय सोलापूर विभाग, सोलापूर, लातूर आणि पंढरपूर वस्तूंच्या शेड येथे घरकाम स्वच्छता करारासाठी दोन पॅकेट प्रणालीद्वारे खुली ई-निविदा आमंत्रित करते. अ. कामाचे नाव: सोलापूर विभागातील सोलापूर (एसयूआर), लातूर (एलयूआर) आणि पंढरपूर (पीव्हीआर) वस्तूंच्या शेड येथे 02 वर्षांच्या कालावधीसाठी क्रियाकलाप आधारावर घरकाम आणि स्वच्छता करारासाठी निविदा. ब. करार कालावधी: 2 वर्षे क. अंदाजे बोली मूल्य: रू. 1,05,47,443.59 ड. कमाईची रक्कम ठेव: 2,02,740 इ. निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 30.01.2026 रोजी सायंकाळी 5:00 वाजता. F. निविदा कागदपत्रांची तपशीलवार माहिती Ge.M पोर्टलवर उपलब्ध असलेल्या निविदा कागदपत्रांची आणि संपूर्ण माहितीची माहिती. कोणत्याही प्रश्नांसाठी, संपर्क साधा: वरिष्ठ डीसीएम कार्यालय, डीआरएम कार्यालय, सोलापूर. संपर्क क्रमांक: ०२१७-७२३१२२०७, ६३८६४२७८७३, ई-मेल: srdcmrallnet.gov.in. ANJ-12

तिकिटांसाठी UTS ॲप डाउनलोड करा.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, रेल्वेज् ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. निविदा क्रमांक SUR/L/T/2025/26. कामाचे नाव: - टिकेकरवाडी रेल्वे स्थानकावरील ग्रीनफिल्ड मेगा रेल्वे टर्मिनलच्या विकासाशी संबंधित कामाचा इलेक्ट्रिकल जनरल सर्व्हिस भाग (फेज-1:-2 वॉशिंग कम पिट लाईन्स-750 मीटर सोलापूर विभाग. अंदाजे खर्च:- रु. 37,43,368.33/- बिल्ड सिक्युरिटी: -रु. 74,900/- पूर्ण कालावधी: महिने ऑफरची वैधता.- 60 दिवस वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: -27/01/2026 दुपारी 3.00 वाजता. बोली सुरक्षा खर्च www.ireps.gov.in वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरला जाईल. ANJ-04

टिकट के लिए UTS APP डाउनलोड करे

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**

मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD) यांनी भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेत. निविदा क्रमांक SUR/TD/T/2025/31 कामाचे नाव: - ठिकाणी पादचारी भुयारी मार्गाच्या तरतूदीसंदर्भातील कामाचा इलेक्ट्रिकल TRD भाग 1) ढोकी-औसा रोड दरम्यान 509/2-3, 2) औसा रोड-हरंगुल दरम्यान 517/7-8, 3) लातूर-लातूर रोड दरम्यान 551/7-8, 4) लातूर-लातूर रोड दरम्यान 552/1-2, 5) कुर्डूवाडी-लातूर रोड विभागातील हरंगुल-लातूर दरम्यान 522/2-3 आणि 6) मोडलिंब-पंढरपूर दरम्यान 416/4-5, 7) कुर्डूवाडी-मिरज विभागातील पंढरपूर-सांगोला दरम्यान 441/4-5. अंदाजे किंमत:- 792,83,725.08, बिल्ड सिक्युरिटी - रू. 1,85,700/-, पूर्ण कालावधी:- 12 महिने, ऑफरची वैधता.-60 दिवस, वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ:- 05/02/2026 दुपारी 3.00 वाजता. ANJ-07

तिकिटांसाठी UTS ॲप डाउनलोड करा.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत आणि बांधकाम काम**

मध्य रेल्वे, सोलापूरचे वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD) यांनी भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेत. निविदा क्रमांक SUR/TD/T/2025/18 कामाचे नाव: दौंड-मोहोळ विभागात 26 बॅरल लांबीचा विस्तार आणि 09 (स्लॅब 05, आरसीसी पाईप 02 आणि आर्च 02) पुलांची पुनर्बांधणी. 2) महत्त्वाच्या पूल क्रमांक २ च्या मार्गावर GEO CELL, Geo Textile आणि ब्लँकेटिंग मटेरियल वापरून संक्रमण प्रणाली बसवणे. सोलापूर विभागातील दौंड-सोलापूर विभागात किमी 431/5-8 (यूपी ॲंड डीएन) येथे 431/1 आणि किमी 315/0-2 येथे पूल क्रमांक 315/1. अंदाजे किंमत: रु. 73,65,625.41/- बोली सुरक्षा: -रु. 1,47,300/- पूर्ण कालावधी: - १२ महिने ऑफरची वैधता: -60 दिवस वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 04/02/2026 दुपारी 3.00 वाजता. ANJ-03

तिकिटांसाठी यूटीएस ॲप डाउनलोड करा



## चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

भाग - ३८

### व्हीडिओटी ट्रेनिंग सिस्टिम

जॅक डॅनिएल्स यांनी विकसित केलेली व्हीडिओटी ट्रेनिंग सिस्टिम -ही धावपटूंची खरी फिटनेस क्षमता मोजण्यासाठी आणि योग्य प्रशिक्षण तीव्रता (ट्रेनिंग इन्टेन्सिटी) ठरवण्यासाठी वापरली जाणारी वैज्ञानिक पद्धत आहे. व्हीडिओटी ही संकल्पना थेट व्हीओटू मॅक्सशी संबंधित असली तरी ती फक्त प्रयोगशाळेतील चाचणीवर नाही, तर प्रत्यक्ष रेस परफॉर्मन्स आणि रनिंग इकॉनॉमी यावर आधारित आहे.

व्हीओटू मॅक्समधील व्ही वर असलेला डॉट (.) याचा अर्थ "प्रति मिनिट" असा होतो. म्हणजेच शरीर एका मिनिटात किती ऑक्सिजन वापरते हे मोजले जाते. वेगवेगळ्या वेळेत (३० सेकंद, ४० सेकंद) मोजलेली ऑक्सिजन किंवा हवेची मात्रा थेट तुलना करता येत नाही. म्हणून सर्व मोजमाप १ मिनिटाच्या मूल्यामध्ये रूपांतरित (कॉन्व्हर्ट) केली जातात. यामुळे वेगवेगळ्या धावपटूंची किंवा एकाच धावपटूची वेगवेगळ्या परिस्थितीतील कामगिरी योग्य पद्धतीने तुलना करता येते. या योग्य संज्ञेला व्हीडिओटी O2 असे म्हटले जाते.

जॅक डॅनिएल्स आणि जिम्मी गिलबर्ट यांनी अनेक वर्षे विविध क्षमतेच्या धावपटूंवर चाचण्या करून व्हीडिओटी टेबल्स तयार केल्या. जिम्मी गिलबर्ट हे अत्यंत शिस्तबद्ध आणि तपशीलाकडे लक्ष देणारे धावपटू व प्रोग्रामर होते. त्यांनी आयुष्यात सुमारे १लाख मैल (१.६ लाख किमी) धाव पूर्ण केली. त्यामुळे व्हीडिओटी टेबल्स अत्यंत विश्वासार्ह आणि अचूक मानल्या जातात.

व्हीडिओटी टेबल्स तयार करताना तीन मुख्य घटकांचा विचार केला गेला: शरीराची कमाल ऑक्सिजन वापरण्याची क्षमता, रनिंग इकॉनॉमी- कमी ऑक्सिजनमध्ये किती कार्यक्षमतेने धावता येते, रेस फ्रॅक्शन ऑफ व्हीओटू मॅक्स - वेगवेगळ्या अंतरांच्या रेसमध्ये चा किती टक्का वापरला जातो.

उदाहरणार्थ, एखादा धावपटू ६ मिनिटे प्रति मैल या वेगाने धावत असेल, तर त्या वेगासाठी लागणारा ऑक्सिजन खर्च सुमारे ५१.७ एमएल/केजी/मिनिट असतो. जर ही रेस ३० मिनिटांची असेल, तर धावपटू साधारण ९३.६% VO2 मॅक्स वर धावत असतो. त्यामुळे व्हीडिओटी = ५१.७ ÷ ०.९३६ = ५५.२ असा काढता येतो.

कधी कधी लॅब VO2 मॅक्स आणि व्हीडिओटी वेगवेगळे येतात. यात चूक नसते. लॅब VO2 मॅक्स ही कम ाल क्षमता दाखवते, तर व्हीडिओटी ही प्रत्यक्ष धावण्यातील कार्यक्षमता (इकॉनॉमी+ परफॉर्मन्स) दर्शवते. म्हणूनच प्रशिक्षणासाठी आणि रेस पेस ठरवण्यासाठी व्हीडिओटी जास्त उपयुक्त ठरते.

थोडक्यात, व्हीडिओटी सिस्टिम मुळे धावपटूला योग्य पेस, योग्य तीव्रता आणि सुरक्षित प्रगती साधता येते, अंदाजावर नव्हे तर शास्त्रीय आधारावर.

**- अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रामॅरेथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, सोलापूर.
संपर्क - ९१७५८२८२०३

# भारत विजयी सुरुवात करण्यास उत्सुक

### रोहित-कोहलीच्या कामगिरीवर नजर

◆ **वडोदरा, १० जानेवारी**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यादरम्यान रविवारपासून तीन सामन्यांच्या वन-डे मालिकेला प्रारंभ होणार आहे. रविवारी कोटांबी स्टेडियमवर पूर्ण ताकदीचा यजमान भारतीय संघ मालिकेतील पहिल्या सामन्यात नवीन चेहऱ्यांच्या न्यूझीलंड संघाशी दोन हात करण्यासाठी सज्ज झाला आहे.

विराट कोहली व रोहित शर्माच्या उत्कृष्ट फॉर्ममुळे एकदिवसीय सामन्यांमध्ये भारताच्या प्रगतीला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. एका महिन्यापेक्षा कमी कालावधीवर असलेल्या टी-२० विश्वचषकावर लक्ष केंद्रित असले तरी, दुहेरी सात दिवसांत होणाऱ्या तीन एकदिवसीय सामन्यांमध्ये कोहली व रोहितच चर्चेत राहतील.

या दोन्ही सुपरस्टार खेळाडूंना सरावासाठी पुरेसा वेळ मिळाला आहे, कारण त्यांनी विजय हजारे चषकाच्या लीग फेरीत प्रत्येकी काही सामने खेळले व मोठी धावसंख्या उभारून आपण लवकरच निवृत्त होणार नाही हे दाखवून दिले आहे.

परंतु, टी-२० विश्वचषक संघातून वगळल्यानंतर भारताचा कर्णधार शुभमन गिल कशी



सराव सत्रादरम्यान श्रेयस अय्यर व प्रशिक्षक गौतम गंभीर

**भारत वि. न्यूझीलंड वन-डे सामना**
**स्थळ** : कोटांबी स्टेडियम, वडोदरा
**वेळ** : दुपारी १.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

प्रतिक्रिया देतो हे पाहणे शिल्लक आहे. गत वर्षीच्या अखेरीस दक्षिण आफ्रिकेविरुद्ध्या मालिकेतील बहुतेक सामन्यांमधून त्याला दुखापतीमुळे बाहेर राहावे लागले होते, त्याशिवाय त्याचा फॉर्मही चिंतेचा विषय आहे.

तथापि, गिलच्या पुनरागमनामुळे यशस्वी जयस्वालला फलंदाजीच्या अव्वल फळीतून बाहेर बसावे लागण्याची शक्यता आहे. त्याने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या शेवटच्या सामन्यात आपले पहिले एकदिवसीय शतक झळकावले होते.

श्रेयस अय्यरच्या पुनरागमनामुळे फलंदाजीच्या क्रमातील मोठ्या प्रमाणावर अयशस्वी ठरलेल्या प्रयोगांना पूर्णविराम मिळण्याची शक्यता आहे. केएल राहुलची तळाच्या फळीतील फलंदाज व यष्टिरक्षक म्हणून भूमिका कायम राहिल्याने ऋषभ पंतला अंतिम एकादशमधून बाहेर राहावे लागेल. अय्यर, पंत व मोहम्मद सिराज शनिवारपर्यंत येथील कोटंबी येथील एकदिवसीय मालिकेच्या तयारीचा भाग नव्हते, तर रवींद्र जडेजाने

शुक्रवारी पूर्ण जोमाने सराव केला, त्यामुळे त्याची उपलब्धता स्पष्ट झाली.

जसप्रीत बुमराह व हार्दिक पांड्याला टी-२० सामन्यांसाठी ताजेतवाने ठेवण्यासाठी वन-डे मालिकेतून विश्रांती देण्यात आली आहे, त्यामुळे वेगवान गोलंदाजीची जबाबदारी मोहम्मद सिराज, अर्शदीप सिंग, हर्षित राणा व प्रसिध कृष्णावर असेल. कुलदीप यादव, वॉशिंग्टन सुंदर व जडेजा फिरकी गोलंदाजीची जबाबदारी सांभाळतील.

न्यूझीलंडसाठी, गत वर्षी चॅम्पियन्स चषकाच्या अंतिम फेरीत भारताकडून झालेल्या पराभवाला फारसे महत्त्व नाही. ही मालिका नवीन व दुसऱ्या फळीतील खेळाडूंना आपले नशिब आजमावण्यासाठी एक उत्तम संधी आहे.

न्यूझीलंडचे पसंतीचे खेळाडू उपलब्ध असोत वा नसोत, संघ त्याच सांघिक मंत्रावर ठाम राहतील. न्यूझीलंडने २०१४-१५ मध्ये भारताच्या त्यांच्या शेवटच्या दौऱ्यात कमाल केली होती व त्यांनी कसोटी मालिकेत भारताला ३-० ने धूळ चारली होती. **(वृत्तसंस्था)**

### न्यूझीलंडचे प्रमुख खेळाडू अनुपस्थित

या भारत दौऱ्यात न्यूझीलंडचे अनेक प्रमुख खेळाडू अनुपस्थित आहे व त्यामुळे या दौऱ्यातील संघाचा मंत्र आहे 'तुम्ही जिथे आहात, तिथेच लक्ष केंद्रित करा'. पायाच्या दुखापतीमुळे मिचेल सॅन्टनर वन-डे सामन्यांना मुकणार आहे व टॉम लॅथम आपल्या पहिल्या बाळाच्या स्वागतासाठी घरी परतला आहे. माजी कर्णधार केन विल्यमसन दक्षिण आफ्रिकेत टी-२० मधील आपली वचनबद्धता पूर्ण करत आहे.

रचिन रवींद्र व वेगवान गोलंदाज जेकब डफीला विश्रांती देण्यात आली आहे, तर पोटरीच्या स्नायूंच्या दुखापतीतून परतलेला मॅट हेनरी विश्वचषकाचा विचार करून टी-२० मालिकेत पुनरागमन करण्यावर लक्ष केंद्रित करत आहे.

सॅन्टनरच्या अनुपस्थितीत मायकेल ब्रेसवेल संघाचे नेतृत्व करेल, तर उंचपुरा अष्टपैलू काईल जेमिसन व २३ वर्षीय लेग-स्पिनर आदित्य अशोकची कामगिरी कशी होते याकडेही लक्ष असेल. सॅन्टनरच्या जागी जयडेन लेनोक्सला संघात स्थान देण्यात आले आहे. संघामध्ये अनेक नवीन आणि अननुभवी खेळाडू असूनही, न्यूझीलंडकडे अजूनही एक मजबूत फलंदाजी फळी आहे. यात डेव्हॉन कॉनवे, डॅरिल मिशेल, हेनरी निकोल्स, विल यंग आणि ग्लेन फिलिप्सचा समावेश आहे.



# खेलो इंडिया बीच स्पर्धेत महाराष्ट्राची रुपेरी सांगता

### दुसरी खेलो इंडिया बीच स्पर्धा: दिक्षा यादवला रौप्यपदक

**तभा वृत्तसेवा,**
**दीव, दि. १० जानेवारी -**

खेलो इंडिया बीच स्पर्धेत महाराष्ट्राने समारोपाच्या दिवशी रूपेरी सांगता केली. सागरी जलतरणात साताऱ्याच्या दिक्षा यादवने रौप्यपदक पटकावले.

दीवमधील अरबी समुद्रात सकाळच्या सत्रात ५ कि.मी. सागरी जलतरणाचा थरार रंगला. महिलांच्या गटात सुरुवातीपासून महाराष्ट्र व कर्नाटकात चुरस रंगली. महाराष्ट्राची दिक्षा यादव ४ किमी पर्यंत आघाडीवर होती. निर्णायक टप्पात कर्नाटकच्या अश्मिता चंद्राने दीक्षासोबत बरोबरी केली. अखेरच्या टप्प्यात १.३५.११ वेळ नोंदवून अश्मिताने स्पर्धेतील सलग दुसरे सुवर्ण जिंकले. १.३५.५३ वेळेसह दीक्षाने रुपेरी यश संपादन केले.

कर्नाटकच्या असरा सुधीरने कांस्यपदकाची कमाई केली.

दीव येथील स्पर्धेत सलग दोन पदकाचा करिश्मा दीक्षा यादवने घडविला. गतवर्षी याच प्रकारात तीने २ सुवर्णपदके जिंकली होती. साताऱ्यातील दिक्षा ही पुण्यातील शासनाच्या क्रीडा प्रबोधिनीत सराव करते. खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धा, खेलो इंडिया युवा स्पर्धा तर खेलो इंडिया बीच स्पर्धेत १७ पदके जिंकण्याचा पराक्रम तीने केला आहे. पथकप्रमुख नवनाथ फडतरे यांनी दीक्षाचे अभिनंदन केले आहे.


गेली ६ दिवस घोघला समुद्र किनाऱ्यावर दुसर्या खेलो इंडिया बीच स्पर्धेचा थरार रंगला. सागरी जलतरणाच्या जोरावर कर्नाटकने सर्वसाधारण विजेतेपद पटकविले. ३ सुवर्ण, २ रौप्य व ६ कांस्यपदकाची लयलूट करीत कर्नाटकने स्पर्धेत सर्वाधिक पदकाची बाजी मारली. तामि ळनाडून स्पर्धेत दुसरे तर मणिपूरने तिसरे स्थान संपादन केले. स्पर्धेत महाराष्ट्राच्या ७७ जणांचे पथक सहभागी झाले होते. यामध्ये ३१ पुरूषव २८ महिला खेळाडूंचा समावेश होता. स्पर्धेत बीच सॉकर, बीच कबड्डी, बीच पेंचक सिलट, सागरी जलतरण महाराष्ट्राच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरीचे प्रदर्शन घडवले. महाराष्ट्राने ३ रौप्य, ५ कांस्यपदकांसह ८ पदकांची कमाई केली आहे.

# सबालेन्का अंतिम फेरीत

◆ **ब्रिस्बेन, १० जानेवारी**

गतविजेत्या आर्यना सबालेन्काने कॅरोलिना मुचोव्हाला ६-३, ६-४ असे नमवून शनिवारी ब्रिस्बेन आंतरराष्ट्रीय टेनिस स्पर्धेच्या अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले.

तिने आता सलग तिसऱ्या वर्षी ऑस्ट्रेलियन ओपनच्या सराव स्पर्धेची अंतिम फेरी गाठली आहे. जागतिक



क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेली ही खेळाडू वर्षातील पहिल्याच स्पर्धेत उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे आणि मागील फेरीत मेलबर्न पार्कची विद्यमान विजेती मॅडिसन कीजला सरळ सेटमध्ये पराभूत करून ती या सामन्यासाठी आली होती.

मुचोव्हाविरुद्ध सामना अधिक आव्हानात्मक असेल अशी अपेक्षा होती, कारण ती तिच्या नाविन्यपूर्ण टेनिस शैलीसाठी ओळखली जाते आणि सबालेन्काविरुद्ध तिचा कारकिर्दीतील आमनेसामनेचा विक्रम ३-१ असा होता. **(वृत्तसंस्था)**

### उमरान मलिकला जम्मू-काश्मीर संघातून वगळले

**नवी दिल्ली :** वेगवान गोलंदाज उमरान मलिकला पाँडिचेरी येथे होणाऱ्या रणजी करंडक सराव शिबिरासाठी जम्मू-काश्मीरच्या संघातून वगळण्यात आले आहे. भारतासाठी १० एकदिवसीय आणि ८ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळलेल्या मलिकचा रणजी करंडकाच्या पहिल्या टप्प्यासाठी संघात समावेश होता, परंतु त्याने श्रीनगरमध्ये राजस्थानविरुद्ध केवळ एकच सामना खेळला आणि त्याला एकही बळी मिळाला नाही. सय्यद मुश्ताक अली चषकामध्ये मलिकने पाच सामने खेळून सहा बळी घेतले होते, परंतु त्याला विजय हजारे चषकासाठीच्या संघातून वगळण्यात आले होते. अरुण जेटली स्टेडियमवर दिल्लीविरुद्ध जम्मू-काश्मीरच्या संस्मरणीय रणजी करंडक विजयात शतक झळकावणारा सलामीवीर कामरान इक्बाललाही संघातून वगळण्यात आले आहे. जम्मू-काश्मीरने दीक्षांत कुंडल आणि कवलप्रीत सिंग यांचा संघात समावेश केला आहे.

# युनायटेड ॲकॅडमी अंतिम फेरीत

### मास्टर्स क्रिकेट अकादमीची १२ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धा : सुपर ओव्हरमध्ये एनजी क्रिकेट अॅकॅमीवर मात



**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

मास्टर्स क्रिकेट अकादमीच्या १२ वर्षांखालील लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत युनायटेड क्रिकेट अॅकॅमीने अंतिम फेरीत प्रवेश केला. हर्षदीप साठे सामन्याचा मानकरी ठरला.

डोणगाव येथील पुष्प अकादम ीच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत उपांत्य सामन्यात त्यांनी निलेश गायकवाड क्रिकेट अॅकॅम ीचा सुपर ओव्हरमध्ये १२ धावांनी पराभव केला. निलेश गायकवाड क्रिकेट अॅकॅमी संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ४९ षटकांत सर्वबाद १८७ धावा केल्या. त्यात अनिश बिराळी ३२ व पूर्णचंद्रने २८ धावा केल्या. युनायटेड क्रिकेट अॅकॅमीकडून अर्जुनने ३४ धावांत ३ बळी घेतले. युनायटेड अॅकॅमीने विजयासाठी १८७ धावांचा पाठलाग करताना ५० षटकात ७ बाद १८७ धावा केल्या. हा सामना बरोबरीत सुटल्याने सूपर ओव्हर खेळविण्यात आला. युनायटेडने प्रथम फलंदाजी करताना १ षटकात १६ धावा केले. त्याचा पाठलाग करताना निलेश गायकवाड क्रिकेट अॅकॅमीने ४ धावा केल्या. युनायटेडकडून फलंदाजी करताना हर्षदीप साठे ५६ धावा व अभय अजलापूरकर नाबाद ३२ धावा केल्या. निलेश गायकवाड संघाकडून गोलंदाजी करताना अथर्व पाटीलने २७ धावात ३ गडी बाद केले. हर्षदीप साठे सामनावीर ठरला.

**अंतिम सामना -** रोहन क्रिकेट अॅकॅमी विरुद्ध युनायटेड क्रिकेट अॅकॅमी

# विदर्भ व महाराष्ट्राचे दोन्ही संघ उपांत्यपूर्व फेरीत

### ४४ व्या सिनियर शुटींग बॉल चॅम्पियन स्पर्धा



**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि.११ जानेवारी**

विदर्भ व महाराष्ट्राच्या पुरुष व महिला दोन्ही संघाने ४४ व्या सिनियर शुटींग बॉल चॅम्पियन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला

येथील जिल्हा परिषद क्रीडांगणावर ४४ व्या सिनियर शुटींग बॉल चॅम्पियन स्पर्धेचे थाटात उद्घाटन राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील व आमदार उत्तमराव जानकर यांच्या हस्ते करण्यात आले.

**महाराष्ट्रात ३० वर्षांनी स्पर्धा**

१९९५ मध्ये गोरेगाव येथे सिनियर शुटींग बॉल चॅम्पियन स्पर्धा झाल्या होत्या. त्यानंतर ३० वर्षांनी महाराष्ट्रात ही स्पर्धा होत असून माळशिरस येथे होत असून माळशिरसच्या शुटींग बॉल प्रेमी साठी मेजवानी आहे.

यावेळी माजी जि. प. सदस्य शितलदेवी मोहिते पाटील, एशियन शुटींग बॉल फेडरेशन जनरल सेक्रेटरी रवींद्रसिंग तोमर, खजिनदार जे पी.कादियान, कार्यकारी सदस्य डो ओ पी.माचरा, शुटींग बॉल फेडरेशन ऑफ इंडिया जनरल सेक्रेटरी जीतराज तोमर , खजिनदार जितेन बघेल यांच्यासह तुकाराम देशमुख, कार्यकारी सदस्य रणजित काळे,किरण सावंत,अस्लम मुजावर ,विपिन ननवरे,आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत २५ राज्यातील पुरुषांचे व महिलांचे संघ सहभागी झाले आहेत. याम ध्ये भारताच्या संघाचे कर्णधार सुरेशकुमार बिष्णोई, जशविंदरसिंग जज (पंजाब), मित्तल नागर (उत्तराखंड), जितेंद्र बघेल (मध्यप्रदेश,सोहेब जामनेर, बखर अंजुम, सुशांत पवार (महाराष्ट्र), मोनिकासिंग (राजस्थान ) मुस्कान तनवी हे नामवंत खेळाडूंनी सहभाग घेतला आहे.या स्पर्धे साठी पंच म्हणून टेक्निकल चेअरमन रणजित बिष्णोई(मध्यप्रदेश),अतुल तोमर (उत्तरप्रदेश),जाकीर खान (मध्यप्रदेश ) सुनिल गावडे,(गोवा),प्रशांत पवार (म हाराष्ट्र ) सदेमअली (उत्तराखंड)हे काम पाहत आहेत.



# जानकी पुरस्कार प्राप्त वाडीकुरोलीच्या स्नेहा लामकाने हिचा सत्कार

**सोलापूर, दि.१० जानेवारी -**

नुकताच झालेल्या ४४व्या कुमार राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडूचा जानकी पुरस्कार वाडीकुरोली ( ता. पंढरपूर ) येथील वसंतराव काळे प्रशाचेची विद्यार्थिनी व कल्याणराव काळे स्पोर्ट्स क्लबची खेळाडू स्नेहा अनिल लामकाने हिला प्राप्त झाला.

त्यानिमित्त तिचा व तिचे प्रशिक्षक अतुल जाधव यांचा सोलापूर म्युचर खो खो असोसिएशनच्या वतीने अध्यक्ष महेश गादेकर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी असोसिएशनचे उपाध्यक्ष अजितकुमार संगवे, सचिव उमाकांत गायकवाड, सहसचिव मोहन रजपूत, तांत्रिक समिती सचिव शिवशंकर राठोड, कार्यकारणी सदस्य सुरेश खुर्द-भोसले, शरद व्हनकडे, जावेद मुलाणी आदी उपस्थित होते.

# महाराष्ट्राचे वादळ तेलंगणात धडकणार!

### वरिष्ठ गट ५८ व्या राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी 'मिशन चॅम्पियन' सज्ज

**तभा वृत्तसेवा,**
**बीड, दि. १० जानेवारी-**

अस्सल मराठी मातीतील खेळ असलेल्या खो-खोचा रणसंग्राम आता तेलंगणाच्या भूमीत पेटणार असून महाराष्ट्राची फौज जेतेपदाचा झेंडा रोवण्यासाठी सज्ज झाली आहे. काजीपेठ (तेलंगणा) येथील रेल्वे ग्राउंडवर ११ ते १५ जानेवारी, २०२६ दरम्यान होणाऱ्या ५८ व्या पुरुष व महिला राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेसाठी महाराष्ट्र खो-खो असोसिएशनने आपले पुरुष व महिला संघ जाहीर केले आहेत. हे संघ सहभागापुरते नसून जेतेपदावर दरारा निर्माण करण्याच्या निर्धाराने मैदानात उतरले आहेत.

स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिर बीड येथील राजश्री शाहू कन्या शाळेच्या मैदानावर यशस्वीरीत्या पार पडले. शिबिराचा सम ारोप महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे माजी सरचिटणीस प्रा. जनार्दन शेळके व सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. दोन्ही संघ सुवर्णपदक जिंकतील, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यानंतर महाराष्ट्राचे दोन्ही संघ काजीपेठ, तेलंगणा येथे रवाना झाले.

**गटवारीचा थरार : 'अ' आणि 'ब' गटात महाराष्ट्र सज्ज**

भारतीय खो-खो महासंघाच्या गटवारीनुसार





पुरुष संघ 'ब' गटात असून उत्तर प्रदेश, मणिपूर, जम्मू-काश्मीर व मेघालय यांच्याशी लढत देणार आहे. महिला संघ 'अ' गटात असून उत्तर प्रदेश, छत्तीसगड, अरुणाचल प्रदेश व चंदीगड ही आव्हाने असतील. दोन्ही गटांत फ ेव्हरेट म्हणून महाराष्ट्र आपली ताकद दाखवणार आहे.

**मुंबई उपनगरचा निहार दुबळे व पुण्याची रितिका राठोड कर्णधारपदी**

**पुरुष संघ :** शुभम थोरात, प्रतिक वाईकर, सुयश गरगटे, रुद्र थोपटे (सर्व पुणे), अनिकेत चेंदवणकर, निहार दुबळे (कर्णधार), प्रतिक देवरे, ऋषिकेश मुर्चावडे (सर्व मुंबई उपनगर), विजय शिंदे, सचिन पवार (सर्व धाराशिव), अक्षय मासाळ, अभिषेक केरीपाळे (सर्व सांगली), शुभम उतेकर (ठाणे), वेदांत देसाई (मुंबई), तुकाराम कारंडे (बीड) यांचा समावेश आहे. प्रशिक्षक : डॉ. नरेंद्र कुंदर (मुंबई उपनगर), सहाय्यक प्रशिक्षक : अजित शिंदे (सोलापूर), व्यवस्थापक : प्रफुल हाटवटे (बीड).

**महिला संघ :** अश्विनी शिंदे, संध्या सुरवसे, सुहानी धोत्रे, संपदा मोरे, मैथिली पवार, तन्वी भोसले (सर्व धाराशिव), प्रियांका इंगळे, कोमल दारवटकर, श्वेता नवले, रितिका राठोड (कर्णधार) (सर्व पुणे), रेश्मा राठोड, पूजा फरगडे (सर्व ठाणे), सरिता दिवा (नाशिक), प्रतिक्षा बिराजदार (सांगली), पायल पवार (रत्नागिरी) या रणरागिणी मैदानात उतरतील. प्रशिक्षक : नरेंद्र मेंगळ (ठाणे), सहाय्यक प्रशिक्षक : निकिता पवार (धाराशिव), व्यवस्थापिका : सुनिता जायभाय (बीड).

**शुभेच्छांचा वर्षाव**

दोन्ही संघांसोबत अनुभवी प्रशिक्षक, सहाय्यक प्रशिक्षक व व्यवस्थापनाची मजबूत टीम असल्याने तांत्रिक तयारी, डावपेच आणि मानसिक बळ या तिन्ही आघाड्यांवर महाराष्ट्र सज्ज आहे. महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव व खजिनदार ॲड. गोविंद शर्मा यांनी खेळाडूंना सुवर्णमय यशासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### बास्केटबॉल स्पर्धेत एसएसए न्यू इंग्लिश स्कूलला उपविजेतेपद

**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिनानिमित्त पोलिस मुख्यालयावर झालेल्या शालेय १७ वर्षाखालील बास्केटबॉल स्पर्धेत एसएसए न्यू इंग्लिश मिडियम स्कूलने उपविजेतेपद संपादिले. फरहान बागवान, हमजा जमादार, अरहान शेख, सुफियान बागवान, फैजान पठाण, जुनेद मिरजकर, उमर बागवान, अबरार भाईकट्टी, मुसाब इनामदार, कौनैन कुरेशी यांनी उत्कृष्ट खेळ केला. संघास क्रीडा शिक्षक अझहर अलगुर यांचे म ार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे चेअरमन डॉ. अखलाक वडवान, प्रा. स्वालेहा वडवान, हाफिज वडवान यांनी अभिनंदन केले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### तलवार व दगडाने गंभीर दुखापत व दमदाटी केल्याप्रकरणी ५ आरोपींची निर्दोष मुक्तता

**बार्शी, दि.१० जानेवारी -**

पांगरी पोलीस स्टेशन अंतर्गत भारतीय दंड विधान संहिताचे कलम १४३ १४७ १४८ ३२३ ५०४ ५०६ प्रमाणे आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल झाला होता. सदर प्रकरणातील फिर्यादीने आरोपी विरुद्ध शेतात घुसून काही कारण नसताना अडवून शिवीगाळ करुन दांडक्याने मारहाण करुन, तलवारीने हल्ला करुन गंभीर जखमी केल्याप्रकरणी गुन्हा नोंद केला होता. सदर प्रकरणाची सुनावणी बार्शी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे समोर झाली. सदर प्रकरणी सरकार पक्षातर्फे साक्षीदार तपासण्यात आले. सरकार पक्षातर्फे तपासलेले साक्षीदार यांचा पुरावा आरोपींना शिक्षा देण्यासाठी पुरेसा नाही व आरोपी विरुद्ध सबळ पुराव्याच्या अभाव असल्याबाबत युक्तिवाद ड. एस.एम. गुंड यांनी केला. सदर प्रकरणातील आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरुन सदर आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. साक्षीदार व अनेक बाबींची पडताळणी करुन न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. सदर प्रकरणी यात आरोपीच्यावतीने ड. एस.एम. गुंड व ड. व्ही.पी. जाधव, ड. आर आर घोडके, ड. ए. एस. गुंड, ड. आर. के. ननवरे, ड. पी.ए. शेळवणे, यांनी काम पाहिले

### दूध उत्पादकता स्पर्धेत शेतकऱ्याने पटकावला क्रमांक

**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

भव्य पशु-पक्षी प्रदर्शनातील दूध उत्पादकता स्पर्धेत नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथे आयोजित अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेरमधील शेतकरी सूरज बाळासाहेब शिंदे यांच्या दोन्ही गायींनी पहिल्या दोन क्रमांकांची पारितोषिके जिंकली. या दोन्ही गायी त्यांनी गोदरेज कॅटल जेनेटिक्स फार्म येथून घेतल्या होत्या. या गायींनी स्पर्धेत ४२.३ आणि ४२.२ लिटर दूध दिले. चांगल्या शेती पद्धतींच्या गरजेबाबत बोलताना गोदरेज ॲग्रोव्हेट लिमिटेडच्या ॲनिमल अँड ॲक्वा फीड बिझनेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी कॅप्टन (डॉ.) ए.वाय. राजेंद्र म्हणाले,सूरज शिंदे यांचा अनुभव म्हणजे आनुवंशशास्त्र, पोषण आणि वैज्ञानिक पद्धतीने केलेले डेअरी व्यवस्थापन अधिक दूध उत्पादन कसे देऊ शकते,याचे उदाहरण आहे.

# अनुष्का पाटोळे च्या प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालावे

## दलित महासंघाची मागणी; सीआयडी चौकशी करुन दोषींना फाशी द्यावी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० जानेवारी-**

लातूर येथील जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता सहावीत शिकणारी अनुष्का किरण पाटोळे या विद्यार्थिनीतड ३ जानेवारी सावित्रीमातेच्या जन्मदिनी सकाळी नऊच्या दरम्यान तिच्या कॉटवर बसून टॉवेलने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा निरोप तिच्या आई-वडिलांना जवाहर नवोदयचा प्रशासनाकडून मिळाला होता. परंतु ती आत्महत्या नसून तिची हत्या असल्याचे तिच्या शरीरावरील असलेल्या जखमावरुन स्पष्ट होते. अनुष्काने आत्महत्या केली नसून तिचा खून झाला आहे, अशी तक्रार तिच्या पालकांनी केली असून या खुनात सहभागी असलेले जवाहर नवोदय विद्यालयातील प्राचार्य, ड्युटी शिक्षक व त्या संबंधित सर्वांचे सीआयडीमार्फत चौकशी करुन त्यांना नोकरीतून बडतर्फ करुन फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी दलित महासंघाच्यावतीने जिल्हाध्यक्ष सुनील अवघडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणात लक्ष घालावे व दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी या निवेदनाद्वारे केली आहे. केंद्र शासनाच्या अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या शाळेमध्ये भर सकाळी असा प्रकार होत असून हा संशयास्पद असून मृत अनुष्काच्या शरीरावरती अनेक जखम आहेत. इयत्ता सहावीत शिकणारी अनुष्का ही गळफास घेऊ शकत नाही, तिचा खून झाला आहे. सकाळी नऊ वाजता संबंधित शिक्षक, शिक्षिका रेक्टर व इतर विद्यार्थिनी तिथे उपस्थित असताना ती कशी काय गळफास घेऊ शकते असे अनेक प्रश्न उपस्थित होत असून अनुष्काला न्याय देण्याकरता तिच्या खुण्याची सीआयडीमार्फत चौकशी व्हावी. जवाहर विद्यालयातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात यावेत. अनुष्काच्या कुटुंबियांना संरक्षण देऊन त्यांना आर्थिक मदत करावी. सदरचा हा विषय अत्यंत संवेदनशील असून एका गरीब मातंग समाजातील मुलीच्या न्याय हक्काच्या प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी जाणीवपूर्वक लक्ष घालावे अन्यथा दलित महासंघ २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन संपूर्ण महाराष्ट्रभर रस्त्यावर उतरुन उग्र स्वरुपाचे आंदोलन करेल, असे देखील निवेदनात स्पष्ट केले आहे.या निवेदनावर जिल्हाध्यक्ष सुनील अवघडे, तालुकाध्यक्ष संगीतराव शिंदे ,शहराध्यक्ष संदीप आलाट, तालुका उपाध्यक्ष रमेश शेंडगे, युवक आघाडी अध्यक्ष अमोल कांबळे, तालुका सहअध्यक्ष हरिश्चंद्र कांबळे व इतर पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.



# स्नेहसंमेलन म्हणजे उत्साहाचा परमोच्च क्षण : रामचंद्र इकारे

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १० जानेवारी-**

वार्षिक स्नेहसंमेलन म्हणजे शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांसाठी उत्साहाचा परमोच्च क्षण असतो, असे मत महाराष्ट्र राज्य कलाशिक्षक महासंघाचे उपाध्यक्ष रामचंद्र इकारे यांनी व्यक्त केले.

शिवप्रभा शैक्षणिक संकुल, रुई ता.बार्शी येथील वार्षिक स्नेहसंमेलनात उद्घाटक म्हणून संबोधित करताना ते बोलत होते. ग्रामीण भागातील जगण्याचे अनुभव साहित्य व कलेसाठी पोषक ठरतात. त्यामुळे आपल्या मुलांना पालकांनी संस्कारासोबतच स्वातंत्र्य द्यावे, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

सुरज क्रीडा व सांस्कृतिक मंडळाचे सचिव प्रताप दराडे यांनी प्रास्ताविक करताना संकुलातील गुणवत्ता आणि उपक्रमांचा आढावा घेऊन पालकांच्या अपेक्षेचा विचार करुन बदलत्या शैक्षणिक प्रवाहासाठी व्यवस्थापन सज्ज असल्याचे सांगितले.

संकुलातील विविध विभागातील आदर्श विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या उपस्थितीत प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन करण्यात आला. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी एकाहून एक सरस व नयनरम्य गाण्यांवर नृत्याभिनय केला. पर्यावरण रक्षण नाटक, भारुडातून करमणुकीच्या माध्यमातून प्रबोधन केले. तर छावा नाटकातून शौर्याचा इतिहास रंगमंचावर सादर केला. अध्यक्षस्थानावरुन बोलताना श्रीमती अर्चना डिसले यांनी कलाकारांना शुभेच्छा दिल्या. शाब्दिक स्वागत करणाऱ्या सुहास ढेकणे यांच्यासोबत विजय जुनवनकर यांनी सूत्रसंचालन केले. तर पांडुरंग देशमुख यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी पोलीस निरीक्षक कुंदन गावडे, विस्ताराधिकारी ज्ञानेश्वर जाधव, केंद्रप्रमुख शशिकांत चव्हाण, संस्था सचिव रवींद्र कापसे, मुख्याध्यापिका संध्याराणी अहिरे,

माजी सभापती लक्ष्मण संकपाळ, संभाजी भोसले, शरद जगदाळे, बाळासाहेब कापसे तसेच शिक्षक, परिसरातील नागरिक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### अरविंद कोरोलीकर



**सोलापूर , दि. १० जानेवारी-**

डॉ. वैशंपायन वैद्यकीय महाविद्यालयाचे निवृत कर्मचारी अरविंद कोरोलीकर( वय ८०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचे पश्चात पत्नी, मुलगा आहे.

### पंडितराव वरपे



**नरखेड, दि.१० जानेवारी-**

मोहोळ तालुक्यातील नरखेड येथील पंडितराव सदाशिव वरपे (परीट) (वय-६०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, दोन भाऊ, एक बहीण, सुन व नातवंडे असा परिवार आहे.

### रामचंद्र हरसुरे



**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

रामचंद्र गुंडप्पा हरसुरे यांचे अल्पशा आजाराने उपचारादरम्यान छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार शासकीय रुग्णालय येथे शनिवार, दि. १० जानेवारी रोजी सायंकाळी ४ वाजता दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे (वय ६०) वर्षे होते. रविवार दिनांक ११ जानेवारी सकाळी १० वाजता शांती चौक हिंदू स्मशान भूमी येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई व नातवंडे असा परिवार आहे. माकपचे युवा सामाजिक कार्यकर्ते कॉ. विजय हरसुरे यांचे ते वडील होत.

# खंडणी मागून हल्ला करणाऱ्या आरोपीस अटकपूर्व जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. १० जानेवारी-**

अक्कलकोट शहरातील हन्नूर रस्ता ब्रिज खाली रात्री गाडीला अडवून पाच लाखाची खंडणी मागणे तसेच धारदार शस्त्राने फिर्यादीवर हल्ला करणाऱ्या आरोपीस ॲड. संजय गायकवाड यांनी आपल्या युक्तीवादातून आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला आहे.



कर्नाटकातील भुयार (ता.इंडी जि.विजयपूर) येथील बिरप्पा भाजप्पा तडलगे, लिंगप्पा बिरप्पा पुजारी, शंभू श्रीशैल तडलगी, जक्कप्पा सिद्धप्पा नरोटे, गंगाधर शांतप्पा रेवगोळे या लोकांनी हातात धारदार शास्त्र घेऊन फिर्यादी कांतप्पा पुजारी (रा.हुवनहळ्ळी ता.अलमेल जि. विजयपूर) यांची वेनु होंडाई गाडी (के२८एम ७१३०) ही गाडी अक्कलकोट शहरातील हन्नूर ब्रिज खाली रात्री अडवली. गाडी फोडून गाडीतील फिर्यादी व त्यांच्या साथीदारांना मारहाण करून तुला धंदा करायचा असेल तर मला पाच लाख रुपये हप्ता दे नाही दिल्यास तुला जीवे ठार मारतो अशी धमकी दिली. अशी फिर्याद अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात दाखल केली. आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला होता.ॲड.गायकवाड यांनी सोलापूर येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश केंद्रे यांच्या न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला. आरोपी क्रमांक एक बिराप्पा भाजप्पा तडलगे यांचा अटकपूर्व जामीन कोर्टाने मंजूर केला. यातील आरोपी तीन ते पाच यांना रेग्युलर जामीन या अगोदर झाला होता.

# युवकांनी व्यसनापासून दूर रहावे : ॲड. भाकरे

## युवक दिनानिमित्त सांगोला न्यायालयात कायदेविषयक शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १० जानेवारी -**

युवकांनी आपल्या भविष्यकालीन आयुष्यामध्ये यश मिळविण्याकरीता व्यसनाधिनतेपासून दूर राहून जिद्द, चिकाटी व सातत्याने प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन ॲड. जी. एल. भाकरे म्हणाले यांनी केले.

राष्ट्रीय व राज्य तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्यावतीने सोलापूरचे अध्यक्ष जिल्हा न्यायाधीश एम.एस.शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सचिव पी.पी.पेठकर यांचे सहकार्याने सांगोला तालुका विधी सेवा समिती व विधिज्ञ संघ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय युवक दिनाचे औचीत्य साधून दिवाणी न्यायालय, सांगोला येथे विशेष कायदेविषयक शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

या शिबीराच्या अध्यक्षस्थानी दिवाणी न्यायाधीश पी.आर.कुलकर्णी व सह. दिवाणी न्यायाधीश ए.ए.पाटील, २ रे सह.दिवाणी न्यायाधीश एस.एस.साळुंखे, सांगोला विधीज्ञ संघाचे अध्यक्ष ॲड. एम. एन. ढाळे, महीला प्रतिनीधी ड.एस.व्ही.बोत्रे, सुभव प्रबोधिनीचे संस्थापक अध्यक्ष भारत शेळके उपस्थित होते.



दिवाणी न्यायाधीश पी.आर.कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना भविष्यकाळातील आपले ध्येय आत्तापासूनच निश्चीत करण्याचा कानमंत्र दिला. व ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी कायम जिद्द, चिकाटी, कष्ट व सातत्य या गोष्टींचा अंगीकार करणे अतिशय महत्वाचे असल्याबाबत नमूद केले. प्रास्ताविक ॲड. एस.व्ही.धनवडे, सूत्रसंचालन ॲड. आर. एन.दौंड यांनी केले. आभार ॲड.डी.एम.माने यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांगोला न्यायालयाचे सहा. अधिक्षक ए.एस.बमनळ्ळी, डी.डी.मायभाटे, विधी सेवा समितीचे वरिष्ठ लिपीक डी. एम. डोईफोडे यांनी परिश्रम घेतले.

# भारतीय संस्कृतीबद्दल नितांत आदर असणारी संघटना

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही राजकीय संघटना अथवा पक्ष नाही तर ती सांस्कृतिक व सामाजिक संघटना आहे. भारत देशाच्या परम वैभवाचा विचार करणारी ही संघटना हिंदू समाजाचे संघटन करण्यासाठी कार्यरत आहे. ज्या धर्म - समाजाचे संघटन करावयाचे त्या धर्म - संस्कृतीचा संघटनेला निश्चितच अभिमान असला पाहिजे, म्हणूनच संघ हा भारतीय संस्कृतीचा आदर करणारी संघटना आहे. आपल्या देशामध्ये जी सनातन संस्कृती आहे त्या संस्कृतीबद्दल आत्मियतेचा व आदराचा भाव संघ स्वयंसेवकांमध्ये आहे. भारतीय संस्कृतीमधील अनेक आदर्श तत्त्वे जगासाठी मार्गदर्शक अशी आहेत, या तत्त्वांचा अंगीकार करून त्याच्या प्रचार - प्रसाराचे कार्य संघ स्वयंसेवक करतात. भारतीय संस्कृतीमध्ये आमच्या सनातन अशा ग्रंथ- वाङ्मयाला आम्ही प्रमाण मानतो. वेद- उपनिषदे - विविध पुराणे व संत वाङ्मय यामध्ये जे आचार - विचार सांगितले आहेत, त्याप्रमाणे वर्तन करणे, संस्कृतीचे पालन व रक्षण आहे ही भावना स्वयंसेवकांमध्ये रुजलेली आहे.

आपल्या संस्कृतीमधील उच्च मूल्यांचे आपण रक्षण केले पाहिजे यासाठी ही मूल्ये आपल्या आचार विचारांमध्ये रुजवली पाहिजेत हा स्वयंसेवकांमध्ये संस्कार केला जातो. आपल्या देव - देवतांबद्दल, महापुरुषांबद्दल आपण आदर बाळगला पाहिजे. या देव - देवता व महापुरुषांच्या संदर्भाने ज्या कथा सांगितल्या जातात किंवा वेद - पुराणांमधून ज्या गोष्टी सांगितल्या जातात त्या श्रद्धापूर्वक सत्य मानून या कथा - गोष्टींमधील संस्कार मूल्ये आपल्या जीवनात उतरवण्याचा स्वयंसेवक प्रयत्न करतात. अनेकदा रामायण - महाभारत या ग्रंथांना काल्पनिक काव्ये मानली जातात, परंतु संघ स्वयंसेवक मात्र श्रद्धापूर्वक या महाकाव्यांचा स्वीकार करतात, देव - देवतांची अवहेलना होऊ नये यासाठी स्वयंसेवक जागृत असतात. निरनिराळे महापुरुष व त्यांची शिकवण याबाबत संघ स्वयंसेवकांना नेहमीच आदर वाटत आला आहे व संघ कार्यपद्धतीमध्ये या महापुरुषांच्या विचारांना अमृतवचन या स्वरूपात स्वीकारले जाते. महापुरुषांना आदर्श मानून त्यांच्या विचारांचा वारसा पुढे चालविण्याचे काम स्वयंसेवक करतात, या अर्थाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भारतीय संस्कृतीचा आदर करणारी संघटना आहे हे आपण अनेक उदाहरणातून लक्षात घेऊ शकतो.

**भारतीय संस्कृती रक्षण व संवर्धन करणारी संघटना**

भारतीय संस्कृती ही जगभरातील सर्वश्रेष्ठ व उदात्त संस्कृती म्हणून गणली जाते, कारण या संस्कृतीप्रमाणे वागणाऱ्या व्यक्तींनी या संस्कृतीचे महात्म्य वाढविले आहे. सनातन अशा भारतीय संस्कृतीच्या रक्षणाचे व संवर्धनाचे कृतीयुक्त काम राष्ट्रीय स्वयंसेवक संघ गेल्या शंभर वर्षांपासून करत आहे. संघाच्या स्थापनेचा मूळ उद्देश येथील धर्म - संस्कृती जपणे व अशा धर्म - संस्कृतीला जपणाऱ्या हिंदू समाजाचे संघटन करून त्या बळावर राष्ट्राला परम वैभवाला नेणे हाच आहे.

**मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाग – १६**

**– डॉ. सचिन लादे, पंढरपूर**
**पुणे विभाग सहप्रचार प्रमुख रा.स्व.संघ.**
**मो.क्र.७५८८२१६५२६**

रा.स्व.संघ भारतीय संस्कृतीचे रक्षण व संवर्धन आपल्या कार्यातून व कृतीतून करत आला आहे. भारतीय संस्कृती म्हटले, की प्रथम आपल्या डोळ्यासमोर येते, एक आदर्श कुटुंब. आदर्श कुटुंब व्यवस्था केवळ आपल्याच संस्कृतीत आहे. संघाच्या स्वयंसेवकांची कुटुंबे अशी आदर्शवत असतात. भारतीय संस्कृतीने घालून दिलेल्या आदर्शांचा विचार करून स्वयंसेवक आपल्या परिवारात वातावरण निर्मिती करत असतात. आजच्या आधुनिक जीवनशैलीमध्ये भारतीय कुटुंब व्यवस्था डळमळीत होत असताना संघाने देखील कुटुंब प्रबोधन या नव्या आयामाची निर्मिती करून या क्षेत्रात कार्याला सुरुवात केली आहे. भारतीय संस्कृतीमध्ये गाय या पशूला अनन्य साधारण असे महत्त्व आहे. गाय ही उपयोगी पशु असल्यामुळे तिचे रक्षण व संगोपन व्हावे यासाठी तिला धर्माशी जोडण्यात आले. त्यामुळेच संघाने देखील गोरक्षा विभाग सुरू केला आहे. भारतीय संस्कृती ही पर्यावरणाशी निगडित आहे, नव्हे - नव्हे पर्यावरण पूरकच आहे, म्हणूनच पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन होणे गरजेचे आहे. यातूनच आम्ही आमच्या संस्कृतीप्रमाणे जगू शकतो अथवा व्यवहार करू शकतो. यासाठीच संघाने पर्यावरण क्षेत्रात काम करण्याचा देखील विभाग सुरू केला आहे. भारतीय संस्कृती म्हणजेच ग्रामीण संस्कृती असे देखील म्हणायला हरकत नाही. स्वयंपूर्ण खेडे ही भारतीय संस्कृतीची खऱ्या अर्थाने ओळख आहे. ग्रामीण भाग हा सुजलाम - सुफलाम झाला तरच या देशाला आपण महासत्ता बनवू शकतो ही गोष्ट लक्षात घेऊन ग्रामविकास या विषयातही संघाने कामाला सुरुवात केली आहे. हिंदू समाजाचे संघटन करण्यामध्ये सर्वात मोठी अडचण म्हणजे जातीयता - अस्पृश्यता. भारतीय संस्कृतीमध्ये तर सर्वांना समान मानण्याचा संस्कार आहे, परंतु ही जातीयता - अस्पृश्यता यामुळे या संस्कृतीला धोका निर्माण झाला आहे, म्हणूनच मूळ संघाच्या स्थापनेमध्ये देखील हिंदू समाजाचे संघटन करण्यासाठी समरसतेचा भाव निर्माण करणे हा त्यामधील हेतू होता. या हेतूला धरूनच गेल्या शंभर वर्षांपासून संघाचे काम सुरू आहे. अलीकडच्या काळात समरसता या विषयाला अधिक महत्त्व दिले गेले आहे. देव - देवता - देवदेवतांची मंदिरे, आमच्या रूढी व परंपरा या साऱ्याच गोष्टी आमच्या संस्कृतीच्या मानबिंदू आहेत. त्या जपल्या पाहिजेत, त्याचं रक्षण झालं पाहिजे, त्याचं संवर्धन झालं पाहिजे. यासाठी देखील स्वयंसेवक कायम आग्रही असतात. सनातन काळापासून आलेल्या रुढी - परंपरा पाळणे म्हणजे अंधश्रद्धा असे देखील काही जणांना वाटू शकते. परंतु भारतीय संस्कृतीने जो संस्कार दिला आहे, त्या संस्कारातून ज्या रूढी व परंपरा निर्माण झाल्या आहेत, त्या कधीही - कोणत्याही कालखंडात समाज अहिताच्या असतील असे आपण म्हणू शकत नाही. वेगवेगळ्या कालखंडात या संस्कृतीच्या नावाखाली दुर्दैवाने ज्या चुकीच्या गोष्टी घुसविल्या गेल्या आहेत, त्याचा संघाने कायमच विरोध केला आहे. निषेध केला आहे. उलट या चुकीच्या गोष्टी दूर व्हाव्यात यासाठी संघ सातत्याने प्रयत्न करत आहे. आमच्या संस्कृतीच्या संस्काराला पूरक असणाऱ्या रुढी-परंपरा सांभाळण्याचा स्वयंसेवक प्रयत्न करतात. संपूर्ण विश्व हे आपले कुटुंब आहे ही भारतीय संस्कृतीची सर्वात मोठी शिकवण. या शिकवणुकी प्रमाणे देखील संघ कार्य करतो. विश्व विभागामध्ये असणाऱ्या हिंदू समाजाचे संघटन करून त्या-त्या देशातील समुदायाला आत्मियतने जोडण्याचे काम संघ गेल्या अनेक वर्षांपासून करीत आहे, या कामांमध्ये हजारो स्वयंसेवक कार्य करीत आहेत. अशा पद्धतीने भारतीय संस्कृतीचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी संघ कृतीयुक्त कार्य करीत आहे, अशा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्वयंसेवक हा भारतीय संस्कृतीचा रक्षणकर्ता आहे.





# ‘आई वडिलांना समजून घेताना’ विद्यार्थ्यांसह सारेच झाले भावुक

## वसंत हंकारे यांचे व्याख्यान; विवेकवर्धिनी विद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१० जानेवारी -**

येथील श्री. दादासाहेब सोमदळे शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विवेक वर्धिनी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचा ६४ वा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ कार्यक्रम संपन्न झाला.

प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध व्याख्याते वसंत हंकारे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना ‘आई आणि वडिलांना समजून घेताना’ या विषयावर व्याख्यान दिले. विद्यार्थ्यांना आई वडिलांचे महत्त्व सांगताना त्यांनी अनेक भावनिक दाखले दिले. आई वडिलांच्या काळजाचा तुकडा म्हणजे मुलगा किंवा मुलगी असते. आलेल्या प्रत्येक कठीण प्रसंगाला तोंड देत केवळ आपल्या मुलासाठी आई वडील कष्ट करून त्यांच्या उज्वल भविष्याचे स्वप्न पाहत असतात. याची प्रत्येक मुला मुलीने जाणीव ठेवावी, मुलांनी कोणत्याही प्रकारच्या व्यसनाला बळी पडू नये व मुलींनी देखील आपल्या आई-वडिलांना मान खाली घालावी लागेल असे वागू नये असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. सूत्रसंचालन प्रा. तुकाराम मस्के, एम.यू.जरे, ए.एस. चंदनशिवे, एम.बी. मुळे यांनी केले. यावेळी संस्थेचे, सचिव ॲड. वैभव टोमके, खजिनदार सलीम वडगावकर, ज्येष्ठ संचालक आप्पासाहेब चोपडे, अनिरुद्ध सालविठ्ठल, विजय माळवदकर उपस्थित होते. उपमुख्याध्यापक विलास दराडे, पर्यवेक्षक अशोक पवार, मधुकर भोसले, ज्युनिअर विभाग प्रमुख विवेक चौगुले, तंत्र विभाग प्रमुख एन.टी.देवकते तसेच सर्व विभागातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. बाळासाहेब करपे, एकनाथ शिंदे उपस्थित होते.

### गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण

प्रशालेतील गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. मदनजी क्षीरसागर अध्यक्षस्थानी होते. त्यांनी विवेक वर्धिनीतील विविध उपक्रमाचे कौतुक केले. प्रशालेच्या अहवालाचे वाचन प्राचार्य डॉ. यू.आर.मुंढे यांनी केले. भविष्यात विवेक वर्धिनीचा विद्यार्थी हा प्रत्येक क्षेत्रामध्ये आपले नाव उज्वल करेल अशा प्रकारची सर्व भौतिक आणि शैक्षणिक सुविधा प्रशाला व कॉलेज मध्ये करण्यात आल्याचे त्यांनी आपल्या अहवालात सांगितले.

### पालकांच्या गळा पडून विद्यार्थी रडू लागले


यावेळी उपस्थित विद्यार्थी, विद्यार्थिनी, पालक, शिक्षक व सर्व मान्यवर देखील भावनिक झाले होते. अनेकांना अश्रू अनावर झाले होते. अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांच्या गळा पडून रडून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/
रविवार, ११ जानेवारी २०२६ । पान ८



## कमरीकोळा मूर्ती

सोलापूर : ग्रामदैवत श्रीसिध्देश्वर देवस्थान पंचकमिटीच्या वतीने तलाव परिसरात भव्य अशी कमरीकोळा मूर्ती उभारण्यात आली असून त्याचे टीपलेले छायाचित्र.



# कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांचा नागरिकांशी थेट संवाद

**विकासाचे व्हिजन असलेल्या आनंद चंदनशिवेंसह उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ५ मधील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी बाळे परिसरात नागरिकांशी थेट संवाद साधला आहे.

प्रभागातील विकास, नागरी सुविधा आणि भविष्यातील योजनांबाबत त्यांनी आपले मत मांडत राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना भक्कम पाठिंबा देण्याचे आवाहन केले. या प्रचार दौऱ्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार आनंद चंदनशिवे, गणेश पुजारी, भाग्यश्री काळे, महादेवी रणदिवे यांच्यासह पक्षाच्या युवती प्रदेश उपाध्यक्ष संध्याताई सोनवणे, शहर जिल्हा युवक अध्यक्ष सुहास कदम आदी उपस्थित होते. मंत्री भरणे यांनी बाळे येथील बिरोबा देवस्थान येथे दर्शन घेतले. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. बाळे परिसरातील विविध ठिकाणी नागरिकांशी संवाद साधत त्यांनी स्थानिक प्रश्न, पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता आणि रोजगाराच्या संधी यावर भर दिला. विकासाचे स्पष्ट व्हिजन असलेले आनंद चंदनशिवे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार निवडून आल्यास प्रभागाचा सर्वांगीण विकास साधला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नागरिकांकडून या संवादाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दरम्यान, विविध पक्षांतील बबलू पठाण, बंटी पसारे, हुसेन शेख साई, शाहिद शेख, अजिंक्य सुरवसे, विक्रांत पोळ यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन करण्यात आले.

# मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतले ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वरांचे दर्शन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शनिवारी सोलापुरात आले असता ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वर मंदिरात जावून श्रींचे दर्शन घेत आशीर्वाद घेतले. विशेष म्हणजे, पारंपारिक बाराबंदी पोशाखात संबोधित त्यांनी सोलापूरकरांची मने जिंकली. श्री सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी त्यांचे स्वागत केले. ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर मंदिराच्या गाभाऱ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिवत पूजा केली.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार समाधान आवताडे, विश्वस्त सिद्धेश्वर बमणी, ॲड. आर.एस.पाटील, मल्लिनाथ मसरे, शिवकुमार पाटील, सोमशंकर देशमुख, डॉ.राजेंद्र घुली, नीलकंठ कोनापुरे, विश्वनाथ लब्बा, मल्लिकार्जुन कळके, सी.बी. नाडगौडा, गुरु माळगे, प्रभुराज मैंदर्गीकर, रतन रिक्के, कुंभार आदी उपस्थित होते.

मंदिरातून सभेच्या ठिकाणी आल्यानंतर भाषणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पुढील ५ वर्षे सोलापूरकरांच्या सेवेची संधी आम्हाला द्यावी, अशी प्रार्थना मी श्री सिद्धरामेश्वर महाराजांकडे केली आहे. ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर महाराजांचा आशीर्वाद मिळाला की मागे वळून पहावे लागत नाही. सोलापूर शहर भारतीय जनता पार्टीतर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना नंदीध्वज आणि बाराबंदी परिधान केलेल्या भक्तांची प्रतिकृती भेट स्वरूपात देण्यात आली. दरम्यान, व्यासपीठावर असलेली ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर महाराजांची भव्य मूर्ती, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा बाराबंदीचा पोशाख, त्यांना देण्यात आलेली नंदीध्वजांची प्रतिकृतीची भेट आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेला 'एकदा भक्तलिंग हर्र बोला हर्र, श्री सिद्धेश्वर महाराज की जय' चा जयघोष यामुळे वातावरण भक्तीमय झाले होते.



# 'होम टू होम'द्वारे प्रभाग ७ मध्ये भाजपने घेतली प्रचारात आघाडी

**निराळे वस्तीसह परिसरातील महिला मतदारांकडून भाजपच्या कार्यकर्त्यांचे औक्षण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत हाय व्होल्टेज असलेल्या प्रभाग क्रमांक ७ मध्ये भाजपाच्यावतीने होम टू होम प्रचारावर प्रचंड भर दिल्यामुळे भाजप उमेदवारांनी प्रचारात आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे.

सकाळ आणि सायंकाळच्या सत्रात प्रभाग क्रमांक ७ चा परिसर पिंजून काढण्यासाठी भाजप उमेदवार शर्थीचे प्रयत्न करत आहेत. प्रभाग क्रमांक ७ मधील लोकमंगल ऑक्सीपार्क, निराळे वस्ती, यश नगर, अभिमानश्री भाग दोन, मनोहर सांस्कृतिक भवन परिसर, रो हाऊस फेज ०१, गोल्डन गेट, उज्वल हाउसिंग सोसायटी परिसर, थोबडे नगर परिसरात प्रभाग क्रमांक ७ चे उमेदवार पद्माकर काळे, उत्तरा बरडे-बचुटे, श्रध्दा पवार, आनंद कोलारकर यांच्यासह कार्यकर्त्यांनी नागरिकांच्या भेटी घेत होम टू होम प्रचार केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाच्या पाठीशी आम्ही राहणार असून भारतीय जनता पार्टीचे चिन्ह असलेले कमळ हाच उमेदवार समजून सर्व मतदार मतदान करणार असल्याचे आश्वासित केले. या पदयात्रेत प्रभाग क्रमांक ७ चे उमेदवार पद्माकर (नाना) काळे, उत्तरा बरडे-बचुटे, श्रध्दा पवार, आनंद कोलारकर, निवडणूक प्रमुख श्रीकांत घाडगे यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते, विविध सामाजिक संस्था, तरुण मंडळाचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.



# माजी उपमहापौर राजेश काळे यांच्या विकासकामांचा प्रभाव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने प्रभाग क्रमांक २४ मध्ये राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, माजी उपमहापौर राजेश काळे यांनी गेल्या कार्यकाळात केलेल्या भरीव विकासकामांचा थेट फायदा शिवसेनेच्या पॅनलला होणार असल्याचे चित्र दिसत आहे. स्थानिक पातळीवर शिवसेनेचे चारही उमेदवार प्रचंड बहुमताने निवडून येतील, असा विश्वास कार्यकर्ते आणि नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

दरम्यान, माजी उपमहापौर राजेश काळे यांनी प्रभाग २४ मध्ये पायाभूत सुविधा, उद्याने, रस्ते, नागरी सोयी-सुविधा, समाजोपयोगी उपक्रम यांवर विशेष भर देत सातत्याने कामे केली. जानकी नगर बाग, बसवेश्वर उद्यान, अंतर्गत रस्ते, मोनार्क सारख्या अद्यावत दवाखान्यामध्ये मोफत लसीकरण केंद्र सुरू केले,पथदिवे, ड्रेनेज लाईन, नागरिकांच्या दैनंदिन अडचणी सोडवण्यासाठी केलेली तत्पर कार्यवाही यामुळे राजेश काळे यांच्याबाबत सर्वसामान्य जनतेमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. माजी उपमहापौर राजेश काळे हे स्वतः संपूर्ण ताकदीनिशी शिवसेनेच्या पॅनलच्या पाठीशी उभे राहिले आहेत. बूथनिहाय नियोजन, कार्यकर्त्यांची मोट बांधणी, घराघरांत संपर्क, विकासकामांचा अहवाल मांडत ते मतदारांशी थेट संवाद साधत आहेत. प्रभाग २४ ड सर्वसाधारण गटामध्ये ओबीसी प्रवर्गातील उमेदवार दिल्याने तसेच प्रभाग २४ मधील 'ब' गटात अनुसूचित जमाती महिला प्रवर्ग यामध्ये अनुसूचित जमातीची जात पडताळणी उषा राजेश काळे यांच्याकडेच असून त्या एकमेव स्थानिक उमेदवार आहेत. 'क' गटात ओबीसी महिला प्रवर्ग या ठिकाणी तिरंगी लढत असली, तरी प्रत्यक्ष मैदानात शिवसेनेवर लोकांचा वाढता विश्वास स्पष्टपणे दिसून येत आहे. महिलांमध्ये झालेली कामे, सुविधा, सुरक्षितता, मूलभूत प्रश्नांवर केलेली दखल यांसह भाजपविरोधातील सामाजिक नाराजी, उबाठा गटातील उमेदवारी बाबतचा असंतोष आणि माजी उपमहापौर राजेश काळे यांच्या विकास कामांची मजबूत पार्श्वभूमी लक्षात घेता, शिवसेनेच्या चारही उमेदवारांचा विजय जवळपास निश्चित मानला जात आहे.

# मतदान केंद्रांवर आवश्यक स्टेशनरीसह इतर साहित्य वितरणाची तयारी



**१२५० स्टेशनरी किट, २५०० बॅलेट युनिट कव्हर कंपार्टमेंटचा समावेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० जानेवारी-**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान केंद्रात आवश्यक असलेले स्टेशनरी साहित्यासह इतर आवश्यक साहित्य वितरण करण्यासाठीची तयारी करण्यात आली आहे.

उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या दोन पिशव्यांमध्ये हे सर्व साहित्य पॅक करून वितरणासाठी नेटके नियोजन केले आहे.

सोलापूर महापालिका आवारातील इंद्रभूवन मागील जागेतील कक्षात निवडणुकीसाठी मतदान केंद्रात आवश्यक असलेले स्टेशनरी साहित्यासह इतर आवश्यक साहित्य पॅकिंग करण्याची लगबग पाहायला मिळाली. सोलापूर महापालिकेसाठी एकूण ३५३ ठिकाणी एकूण १०९१ मतदान केंद्र आहेत.

महापालिकेतील वितरण कक्षात १२५० स्टेशनरी किट, सुमारे २ हजार ५०० ईव्हीएम चे बॅलेट युनिट कव्हर करणारे कंपार्टमेंट हे साहित्य पॅक करून ठेवण्यात आले आहे. विविध ठिकाणच्या निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाकडे हे साहित्य सुपूर्द करण्यात येणार आहे. विविध लिफाफे, स्टेशनरी, दिशादर्शक फलक, ईव्हीएमचे बॅलेट युनिट कव्हर करणारे कंपार्टमेंट, पोस्टर, सूचना पत्र, लेखन सामग्री, स्टेशनरी, विविध नमुने, बॅच बिल्ले, कागदी सील असे सुमारे २४ साहित्यांचे पॅकींग करण्यात येत आहे. याकामी उपअभियंता अविनाश वाघमारे, सतीश बुर्ला, विशाल जकातदार, सिध्दाराम मेंदगुडले यांच्यासह सुमारे २५ कर्मचारी कार्यरत होते.



# प्रभाग २२ मध्ये विकासाचे नवे पर्व

**भाजप उमेदवार किसन जाधव यांचे प्रतिपादन**

**कष्टकरी कामगारांच्या आरोग्यासाठी ठोस व्हिजन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१० जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर प्रचाराला चांगलाच वेग आला असून मतदानास अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. प्रभाग क्रमांक २२ मध्ये भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार किसन जाधव, दत्तात्रय नडगिरी, सौ.अंबिका नागेश गायकवाड व सौ. चैत्राली शिवराज गायकवाड यांच्या होम टू होम प्रचाराला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

मागील वीस वर्षांत नागेश गायकवाड व किसन जाधव यांनी या प्रभागात रस्ते, पाणी, ड्रेनेज, दिवाबत्ती, समाज मंदिरे व मूलभूत सुविधांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी आणून प्रभागाचा कायापालट केला आहे. ईच्छा भगवंताची परिवाराचे आधारस्तंभ मार्गदर्शक लक्ष्मणमामा जाधव यांच्या समाजसेवेमुळे भाजपच्या चारही उमेदवारांना मोठा जनाधार लाभत आहे. आमदार देवेंद्र कोठे यांच्या माध्यमातून प्रभाग २२ साठी पुन्हा मोठ्या प्रमाणात निधी मंजूर होणे ही या प्रचाराची महत्त्वाची बाब ठरली आहे. यावेळी किसन जाधव म्हणाले की, दोन नंबर झोपडपट्टी, इरण्णा वस्ती, मोठे इरण्णा वस्ती, धोंडीबा वस्ती, सनत नगर, मंजुनाथ नगर, लिमयेवाडी, सेटलमेंट, यतीम खाना, विजापूर नाका या भागात कष्टकरी वर्गाची संख्या मोठी आहे. त्यांच्या आरोग्यासाठी रामवाडी येथे अद्ययावत असे सुविधा उपलब्ध करुन देण्याचा, परिसराचा कायापालट करणे हेच त्यांचे प्राथमिक ध्येय असेल. रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाण्याची व्यवस्था आणि पथदिवे यांसारख्या मूलभूत गरजांची पूर्तता करून या भागाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा मानस आहे.

प्रभाग २२ चा सर्वांगीण विकास आणि कष्टकरी कामगारांचे आरोग्य हेच आमचे प्राधान्य आहे. भाजपाच्या माध्यमातून येथे विकासाचे नवे पर्व सुरू होणार आहे, असे जाधव यांनी स्पष्ट केले. गाठीभेटीदरम्यान मतदारांना व्हीव्हीपॅडद्वारे मतदानाचे प्रात्यक्षिक दाखवून कमळावरच बटण दाबण्याचे आवाहनही करण्यात आले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

# धाराशिव दिनांक

## नवनिर्वाचित नगरसेवकांचा भाजपा कार्यालयात सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१० जानेवारी -**

परंडा नगरपरिषदेतील जनशक्ती नगर विकास आघाडीच्या सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचा परंडा येथे भाजपा संपर्क कार्यालयात मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

यावेळी सर्वश्री मा.आ. सुजितसिंह ठाकूर, रणजीत पाटील, सुभाषसिंह सद्दीवाल, मुकुल देशमुख, सुबोधसिंह ठाकूर, शब्बीरखॉं पठाण, भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. जहीर चौधरी, भाजपा माजी जिल्हा सरचिटणीस विकास कुलकर्णी, भाजपा नेते अजिमभाई हन्नूरे, बाबासाहेब जाधव, रामदास गुडे, गौरव पाटील, सुरज काळे तसेच प्रा.डॉ. शहाजी चंदनशिवे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त वृत्त...



### तालुकाध्यक्षपदी केशनी माकणे, जिल्हा उपाध्यक्षपदी वंदना भगत

**लोहारा, दि.१० जानेवारी -**

लोहारा शहरात जिजाऊ ब्रिगेडची बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत तालुकाध्यक्षपदासह विविध पदांवरील निवडी करण्यात येऊन नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. सदर बैठक लोहारा शहरात आयोजित करण्यात आली होती. बैठकीचे प्रास्ताविक जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा रेखा पवार यांनी केले. मराठा सेवा संघाचे विभागीय सचिव भास्कर वैराळे व ताई बोराडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या बैठकीत जिजाऊ ब्रिगेडच्या तालुकाध्यक्षपदी केशनी माकणे, तर जिल्हा उपाध्यक्षपदी वंदना भगत यांची निवड करण्यात आली. तसेच तालुका उपाध्यक्षपदी नंदिनी मोरे व तालुका संघटकपदी मंजुषा बलसुरे यांची निवड करण्यात आली. बैठकीस भाग्यश्री रणदिवे, सुनंदा रणखांब, मीनाक्षी जाधव यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या.



### अनाळा येथील न्यू हायस्कूलमध्ये आनंद बाजाराचे आयोजन

**परंडा, दि.१० जानेवारी -**

परंडा तालुक्यातील अनाळा येथील न्यू हायस्कूलमध्ये दि.१० रोजी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आनंद बाजाराचे आयोजन करण्यात आले होते. या आनंद बाजाराचे उद्घाटन माजी जिल्हा परिषद सदस्य दत्तात्रय पाटील यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी संस्थेचे सहसचिव वसंत हिवरे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे तालुकाध्यक्ष दादासाहेब सरवदे, हभप. ईश्वर महाराज ईटकर, मुख्याध्यापक जयकुमार भोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या आनंद बाजारातून एकूण ६७ हजार ४५६ रुपयांची विक्री झाली. बाजारात १०० विद्यार्थी विक्रेत्यांनी पालेभाज्या, फळभाज्या, विविध खाद्यपदार्थ, इलेक्ट्रिक व इलेक्ट्रॉनिक साहित्य, स्टेशनरी वस्तू तसेच गमती-जमतीचे खेळ यांचे स्टॉल लावले होते. या उपक्रमास पालक, शिक्षक उपस्थित होते.



### क्रीडा तज्ञ महंमदइसाक पटेल यांचा सत्कार

**तुळजापूर, दि.१० जानेवारी -**

तालुक्यातील क्रीडा संस्कृती जिवंत ठेवण्याचे काम करणारे क्रीडा तज्ञ, राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त क्रीडा मार्गदर्शक महंमदइसाक गुडूसाब पटेल यांचा न.प. शाळा क्र.३ मध्ये सत्कार करण्यात आला. पटेल हे क्रीडा क्षेत्रातील नामवंत नाव असून त्यांनी जि.प. कन्या प्रशाला तुळजापूर शाळेचे माजी मुख्याध्यापक पद, त्याचबरोबर तालुका क्रीडा मार्गदर्शक म्हणून काम पाहिलेले आहे. यावेळी त्यांच्या मार्गदर्शनात शाळेत होणाऱ्या क्रीडा स्पर्धांचा त्यांनी आढावा घेतला. न.प. शाळेचे क्रीडाप्रमुख अनिल राठोड आणि अतुल काकडे याचाही याप्रसंगी सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक तुकाराम मोटे व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.



### लोहारा तहसील कार्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा

**लोहारा, दि.१० जानेवारी -**

लोहारा तहसील कार्यालयात अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या वतीने राष्ट्रीय ग्राहक दिन कार्यक्रम दि.९ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नायब तहसीलदार अनिल अहीरे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ग्राहक पंचायत राज संघटनेचे कार्यकर्ते पंचाक्षरी चव्हाण, पुरवठा निरीक्षक हर्षाली खडे, अशोक शिंदे, महादेव गोरे, ऐश्वर्या जाधव तसेच राजेंद्र कदम आदी उपस्थित होते. कार्यक्रमास अर्जुन मुखे, श्रीशैल हुडगे, इनूस पटेल, शिवराज पाटील, वैजनाथ माणिक शेट्टी, प्रफुल्ल माने यांच्यासह तहसील पुरवठा कर्मचारी महेश्वरी साळुंखे, दयानंद शिदोरे आदी नागरिक उपस्थित होते.

### कळंबमध्ये ३० लिटर गावठी दारु जप्त

**धाराशिव, दि.१० जानेवारी -**

कळंब तालुक्यातील भोगजी चौफुला येथे पोलीसांनी ३० लिटर गावठी दारु अवैध विक्रीसाठी बाळगलेल्या आरोपी रेश्मा विजय शिंदे (वय ३०, रा. भोगजी, ता. कळंब) यांच्याकडून अंदाजे ३,००० रुपये किमतीची मद्य जप्त केली.

# धाराशिवमध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या भव्य स्मारकाचा मार्ग मोकळा

**स्मारकासाठी शासकीय दूध संघाची जागा विनामूल्य; नगरपालिकेचे २ कोटी वाचणार**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० जानेवारी -**

धाराशिव शहरात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या भव्य स्मारक उभारणीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून स्मारकासाठी आवश्यक असलेली शासकीय दूध संघाची जागा विनामूल्य देण्याचा शासन आदेश शुक्रवार, दि. ९ जानेवारी रोजी निर्गमित करण्यात आला आहे. यामुळे धाराशिव नगरपालिकेचे सुमारे २ कोटी रुपयांचे आर्थिक बचत होणार आहे.

या पार्श्वभूमीवर लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या भव्य व ऐतिहासिक स्मारक उभारणीच्या अनुषंगाने सोमवारी एक महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली असल्याची माहिती 'मित्र'चे उपाध्यक्ष आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली. धाराशिव शहरात अण्णाभाऊ साठे यांचा पूर्णाकृती पुतळा व भव्य स्मारक उभारावे, अशी अनेक वर्षांपासून मागणी होती. त्यानुसार नगरविकास विभागाच्या माध्यमातून यापूर्वीच १.५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेण्यात आला होता. तसेच पालिका निवडणुकीपूर्वी शहरवासीयांना स्मारक उभारणीचे अभिवचन देण्यात आले होते. ऑगस्ट महिन्यात तत्कालीन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी जागा हस्तांतराचा निर्णय घेतला होता. मात्र बाजारभावानुसार २ कोटी ८ लाख रुपये भरण्याची अट असल्याने पालिकेकडे निधी नसल्यामुळे विषय प्रलंबित राहिला होता. ही रक्कम विशेष बाब म्हणून माफ व्हावी, यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आले. अखेर महायुती सरकारने त्यास मान्यता दिली असून शासनाने अधिकृत आदेश जारी केला आहे.

राज्य मंत्रिमंडळाने धाराशिव नगरपालिकेला सर्व्हे क्र.४२६ येथील १ एकर जमीन स्मारकासाठी भोगाधिकार विनामूल्य, मूल्यरहित व महसूलमुक्त स्वरूपात देण्यास मान्यता दिली आहे. जागा पालिकेकडे वर्ग झाल्यानंतर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत पुतळा उभारणीसाठी आवश्यक सर्व परवानग्या दिल्या जाणार आहेत.

उर्वरित प्रशासकीय प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी अखेरपर्यंत पाठपुरावा केला जाईल, असे आ. पाटील यांनी स्पष्ट केले. या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माजी महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व पालकमंत्री प्रताप सरनाईक यांचे आभार मानले.

### स्मारकासाठी लोकसहभाग आवश्यक : आ. राणादादा



जिल्ह्यातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे हे पहिले भव्य स्मारक असणार असून येथे पूर्णाकृती पुतळा, सुसज्ज बगीचा व अभ्यासिकाही उभारण्यात येणार आहे. या ऐतिहासिक स्मारकासाठी सर्वांचा लोकसहभाग आवश्यक असून आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी स्वतः १ लाख रुपयांची देणगी जाहीर केली आहे. या स्मारकाच्या माध्यमातून अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांची, साहित्याची व सामाजिक लढ्याची स्मृती जिवंत राहून पुढील पिढीला प्रेरणा मिळेल, असा विश्वासही आ. पाटील यांनी व्यक्त केला आहे.

## चाकूचा धाक दाखवून ट्रॅक्टर लुटल्याप्रकरणी दोघांना अटक



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० जानेवारी -**

चाकूचा धाक दाखवून मारहाण करत अंदाजे ५ लाख रुपये किमतीचा ट्रॅक्टर जबरदस्तीने लुटून नेल्याप्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणातील फिर्यादी सचिन शिवाजी काळे (वय २९, रा. पारा, ता. वाशी, जि. धाराशिव) यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांचा महिंद्रा अर्जुन ५५५ कंपनीचा ट्रॅक्टर (क्र. एम एच २५ बी.एफ. ७०६२), चेसी नं. MBNBEBB८SND३७०७२ व इंजिन नं. NSD2TEO२४४, असा अंदाजे ५ लाख रुपये किमतीचा ट्रॅक्टर दि.८ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२.४५ वाजण्याच्या सुमारास भैरवनाथ साखर कारखान्याच्या यार्डात, तांदुळवाडी शिवारातून आरोपींनी जबरदस्तीने नेला.

आरोपी शिवा शिंदे व सरदार दादा शिंदे (दोघे रा. नांदुरघाट, ता. केज, जि. बीड) यांनी फिर्यादीला चाकूचा धाक दाखवून मारहाण केली तसेच जिवे ठार मारण्याची धमकी देत ट्रॅक्टर पळवून नेल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी फिर्यादी सचिन काळे यांनी दि.९ जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

गुन्ह्याच्या तपासादरम्यान वाशी पोलिसांनी दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.

या प्रकरणाचा अधिकचा तपास वाशी पोलीस ठाण्याच्या वतीने सुरू आहे.

## येरमाळ्याच्या वैभव कवडे यांची एमपीएससी राज्यसेवेत भरारी



**पुरवठा निरीक्षण अधिकारी (राजपत्रित वर्ग-२) पदी निवड ...**

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१० जानेवारी -**

येरमाळा येथील सुपुत्र वैभव जीवन कवडे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) घेण्यात आलेल्या राज्यसेवा परीक्षा २०२४ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत पुरवठा निरीक्षण अधिकारी (राजपत्रित वर्ग-२) या मानाच्या पदावर निवड मिळवली आहे. त्यांची ही निवड दि.५ जानेवारी २०२६ रोजी जाहीर झाली असून, त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे हे तिसरे मोठे यश ठरले आहे. विशेष म्हणजे वैभव कवडे यांची ही पहिलीच निवड नसून, यापूर्वी त्यांनी ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) या पदावर यश मिळवले होते. त्यानंतर दि.४ नोव्हेंबर २०२५ रोजी त्यांनी राज्य कर निरीक्षक (एसआयटी) या महत्त्वाच्या पदावर निवड मिळवली.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल येरमाळा ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने वैभव कवडे यांचा कुटुंबीयांसह विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी विकास बारकुल, मदन बारकुल, उमेश बारकुल, मुरहारी कांबळे, जाफर शेख, तानाजी सवने, विशाल बारकुल, दशरथ जाधव, सतीश लोमटे, पांडूरंग बारकुल आदी मान्यवर उपस्थित होते.

## शालेय जीवनात वक्तृत्व स्पर्धांची गरज : आ. प्रवीण स्वामी



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१० जानेवारी -**

वक्तृत्व केल्यामुळे विचारांना योग्य दिशा मिळते. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन विचारांची देवाणघेवाण होते. त्यामुळे शालेय जीवनात वक्तृत्व स्पर्धांची नितांत गरज असून यासाठी सर्वांनी पुढे यावे, असे आवाहन आमदार प्रवीण स्वामी यांनी केले.

ते युवास्पंदन सामाजिक संस्था व मराठवाडा सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने श्री तुळजाभवानी शाकंभरी नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने आयोजित राज्यस्तरीय आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा तुळजाभवानीची वक्ता महाराष्ट्राचा या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

यावेळी नगरसेवक अमोल कुतवळ यांनी वक्तृत्व स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत शाकंभरी महोत्सवात राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी स्वतःचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी अधिकाधिक वक्तृत्व स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

तुळजाभवानीची वक्ता महाराष्ट्राचा या स्पर्धेत महाराष्ट्रातील २१ जिल्ह्यांतील ३ गटांतून एकूण ३०९ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला आहे.

स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी अमर हंगरगेकर, महेंद्र कावरे, किरण हंगरगेकर, चंद्रकांत साळुंके, निरंजन डाके, अशोक खडके, नितीन ढगे, भाग्यश्री कावरे व उज्वला जोशी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवशंकर जळकोटे यांनी केले, तर आभार संदीप गंगणे यांनी मानले.

## तुळजापूरमधील अवैध धंदे तात्काळ बंद करण्याची मागणी

**पोलीस अधिक्षकांना निवेदन**




**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१० जानेवारी -**

शहरात राजरोसपणे सुरू असलेले सर्व प्रकारचे अवैध धंदे तात्काळ बंद करण्यात यावेत, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) यांच्या वतीने पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, तुळजापूर शहरात सध्या दोन नंबरच्या धंद्यांचा मोठ्या प्रमाणात सुळसुळाट सुरू असून मटका, गुटखा व इतर अवैध धंदे जोमाने सुरू आहेत. यामुळे शहरातील गोरगरीब नागरिक तसेच तुळजापूरला येणाऱ्या भाविक भक्तांची मोठ्या प्रमाणात लूट होत असून शहराच्या प्रतिमेला धक्का बसत आहे.

हे निवेदन तुळजापूर पोलीस ठाण्यात देण्यासाठी आरपीआयचे पदाधिकारी व कार्यकर्ते गेले असता, पोलीस निरीक्षकांनी मटका व गुटखा विक्री करणाऱ्यांची नावे नमूद केल्याशिवाय निवेदन स्वीकारता येणार नाही, असे सांगून निवेदन घेण्यास टाळाटाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

त्यामुळे अवैध धंद्यांबाबत कारवाईची जबाबदारी झटकून दिल्याचे दिसून येत असून पोलीस निरीक्षकांचा या धंद्यांना अप्रत्यक्ष पाठिंबा असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

तुळजापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांची या प्रकरणाची चौकशी करून मटका चालविणाऱ्यांवर व गुटखा विक्री करणाऱ्यांवर कडक कारवाई करून अवैध धंदे तात्काळ बंद करण्यात यावेत. तसेच निवेदन स्वीकारण्यास टाळाटाळ करून कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी संबंधित पोलीस निरीक्षकांवरही कारवाई करण्यात यावी, अन्यथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) च्या वतीने तीव्र जनआंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

या निवेदनावर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे धम्मशिल कदम, वैजनाथ पांडागळे व पोपट लांडगे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## अनुष्का पाटोळे मृत्यू प्रकरणी चौकशीची मागणी; अन्यथा रास्ता रोकोचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१० जानेवारी -**

जवाहर नवोदय विद्यालय, लातूर येथे इयत्ता सहावीत शिकणाऱ्या अनुष्का पाटोळे हिचा अमानुष छळ करून खून करण्यात आल्याचा गंभीर आरोप सकल मातंग समाजाने केला आहे. ही घटना आत्महत्या नसून सुनियोजित हत्या असल्याचा दावा करण्यात आला असून, प्रकरणाची डखढ मार्फत चौकशी करून फास्ट ट्रॅक कोर्टात खटला चालवावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच सत्य बाहेर यावे यासाठी लातूर जिल्हाधिकाऱ्यांना सहआरोपी करण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. शासनाने तात्काळ कारवाई न केल्यास १२ जानेवारी रोजी धाराशिव जिल्ह्यातील भूम शहरातील गोलाई चौकात रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

संबंधित निवेदन उपविभागीय अधिकारी, भूम यांच्यामार्फत मुख्यमंत्री व गृहमंत्र्यांना सादर करण्यात आले आहे.

## नळदुर्ग शहरातील व्यापारवाढीसाठी नगरपालिका माध्यमातून प्रयत्न करणार : धरणे

**व्यापारी मंडळाच्या वतीने नगराध्यक्ष, नगरसेवक व पत्रकारांचा सत्कार**

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१० जानेवारी -**

नळदुर्ग शहराच्या सर्वांगीण विकासाबरोबरच शहरातील बाजारपेठेत आवश्यक त्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देत व्यापार वाढीसाठी नगरपालिका माध्यमातून ठोस प्रयत्न करण्यात येतील, असे प्रतिपादन नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी केले.

दि.१० जानेवारी रोजी नळदुर्ग येथील मल्लिकार्जुन मंदिरात शहर व्यापारी मंडळाच्या वतीने नवनिर्वाचित नगराध्यक्ष, सर्व पक्षीय २० नगरसेवक तसेच पत्रकार दिनाचे औचित्य साधून शहरातील पत्रकारांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्यासह नगरसेवक दत्तात्रय दासकर, नय्यर जहागीरदार, तानाजी जाधव, मारुती खारवे, इमाम शेख, आकाश कुलकर्णी, निरंजन राठोड, रिजवान काझी, ॲड. अरविंद बेडगे, छमाबाई राठोड, मीनाक्षीताई काळे, कमलबाई गायकवाड, राणी सुरवसे, सुमनबाई ठाकुर, साक्षी नळदुर्गकर यांच्यासह सर्व २० नगरसेवकांचा व्यापारी मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

तसेच पत्रकार दिनानिमित्त शहरातील विलास येडगे, लतिफ शेख, आयुब शेख, दादासाहेब बनसोडे, उत्तम बनजगोळे, जहीर इनामदार, भगवंत सुरवसे, विशाल डुकरे, इरफान काझी यांचाही व्यापारी मंडळाच्या वतीने सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहर व्यापारी मंडळाचे अध्यक्ष सतीश पुदाले यांनी केले. शहरातील जुन्या बाजारपेठेतील व्यापार कोलमडला असून व्यापाऱ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध नाहीत. नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांनी बाजारपेठेच्या पुनरुज्जीवनासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी त्यांनी केली.



यावेळी बोलताना नगराध्यक्ष बसवराज धरणे म्हणाले की, शहरातील बाजारपेठ व आठवडी बाजार परिसरात स्वच्छता, पाणी, प्रकाश व्यवस्था आदी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. शहराचा विकास आणि व्यापारवाढ हे दोन्ही उद्दिष्टे समोर ठेवून काम केले जाईल, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व्यापारी मंडळाचे अध्यक्ष सतीश पुदाले, सुभाष कोरे, दयानंद स्वामी, अजहर जहागीरदार, संतोष मुळे, सोमनाथ कोरे, राजेंद्र महाबोले, राजेंद्र खद्दे, राजेंद्र पिचे, प्रभाकर घोडके, कल्पना गायकवाड, डॉ. आनंद काटकर, मारुती घोडके, प्रविण कासार यांच्यासह सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# रस्ता दुरुस्तीसाठी सेवानिवृत्तांनी दिला उपोषणाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ १० जानेवारी :** शिरूर अनंतपाळ -आरी मोड -कांबळगा - मुशीराबाद - बोरी चामेवाडी व बाभळगाव लातूर जाणाऱ्या रस्ताचे मजबुतीकरण करण्यात यावे, या मागणीसाठी शिरूर अनंतपाळ येथील सेवानिवृत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उपोषणाचा इशारा दिला आहे.

गेल्या सात-आठ वर्षांपासून सा.बां. विभाग व ग्रामीणच्या आमदारांना निवेदने देऊन रस्ता दुरुस्त करून रस्त्याचे मजबुतीकरण करण्यात यावे, यासाठी शेकडो निवेदने देऊन एक वेळा लातूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागासमोर एकदिवसाचे धरणे आंदोलनही केले होते. त्यावेळी केवळ चामेवाडी ते मुशीराबाद पर्यंत रस्त्याची डागडूजी करण्यात आली. पण आज रोजी रस्त्यावर मोठमोठे खड्डेच खड्डे दिसून येत आहेत. त्यामुळे रस्तावरून वाहन घेऊन जाणे म्हणजे मरणाला आमंत्रण देण्यासारखे आहे . त्यामुळे कृषी



उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते एल. बी. आवाळे यांच्या नेतृत्वाखाली दि. ९ जानेवारी २६ रोजी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर यांना निवेदन देऊन बाभळगाव-चामेवाडी-बोरी-मुशीराबाद कांबळगा-आरीमोड-शिरूर अनंतपाळ रस्त्याचे कायमस्वरुपी काम दि.१९ जानेवारी २०२६ पर्यंत सुरुवात नाही केल्यास आपल्या कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा दिला आहे .

बाभळगाव-चामेवाडी-बोरी मुशिराबाद-कांबळगा-आरीमोड-शिरूर अनंतपाळ रस्ता पुढे साकोळ, जवळगा, वलांडी, देवणी ते भालकी, बीदरकडे जातो. हा कर्नाटक राज्याला जोडणारा सर्वात जवळचा मार्ग आहे. या रस्त्यावर फार मोठ्या प्रमाणावर वाहतूक आहे. बाभळगाव सेलू, पडीले पेट्रोलपंप ते विलासराव देशमुख चौक बोरी पुढे मुशीराबाद, ता. लातूर हद्दीपर्यंत रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट व खराब झालेली आहे. आदिच रस्ता खराब आणि त्यातच या रस्त्याच्या बाजुने गटारी नसल्यामुळे गावातील सांडपाणी व पावसाचे पाणी रस्त्यावर थांबते. त्यामुळे रस्त्याची अवस्था अत्यंत वाईट व दयनीय झालेली आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजुने झाडेझुडपे मोठया प्रमाणात वाढलेली आहेत. मुशीराबाद गावात सिमेंट रस्त्याचे काम १०-१२ वर्षांपूर्वी अर्धवट केलेले आहे.

अर्धवट रस्ता सोडल्यामुळे त्या भागामध्ये सतत अपघात होतात. लातूर जिल्ह्यातील सर्व तालुके सिमेंट रस्त्याने जोडलेले आहेत. फक्त शिरूर अनंतपाळ तालुका सिमेंट रस्त्याने जोडलेला नाही, ही खेदाची बाब आहे. यासाठी सेवानिवृत्त अधिकारी व नागरीक शिरूर अनंतपाळचे एल.बी. आवाळे यांच्या नेतृत्वाखाली बी.एम. धुमाळे,

एस.एम. दरेकर, डी.एन. कोटलवार, एस.वाय. नाब्दे , माजी सैनिक आनंद कामगुंडा शिरूर अनंतपाळचे माजी सरपंच नामदेवराव जगताप यांच्या स्वाक्षरीचे निवेदन कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले ,अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, लातूर, जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, पोलिस अधिक्षक कार्यालय, लातूर यांना देण्यात आले आहे.

# मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा उपक्रमात महांडोळची शाळा प्रथम

**तभा वृत्तसेवा,**

**चाकूर, १० जानेवारी :** मुख्यमंत्री सुंदर माझी शाळा उपक्रमांतर्गत चाकूर तालुक्यातील शेळगाव केंद्रातील महांडोळ येथील जिल्हा परिषद शाळेने प्रथम क्रमांक पटकावला आहे. मुख्याध्यापिका जिजाबाई माने यांनी लोकसहभागातून या शाळेचा कायापालट केल्याने शाळेने सदर यश संपादन केले आहे.



मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा टप्पा क्रमांक ३ मध्ये केंद्रस्तरीय मुल्यांकनासाठी एक पथक नेमण्यात आले होते. त्यामध्ये चापोली केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश केंद्रे ,चापोली येथील संजीवनी उच्च माध्यमिक महाविद्यालयाचे प्रा.महेंद्र वळसंगीकर,चाकूर येथील जि. प. शाळेचे अविनाश भोकरे आणि चापोली येथील स्वामी विवेकानंद विद्यालयाचे मुख्याध्यापक व्यंकट शिंदे यांनी अतिशय सखोल व पारदर्शक मुल्यांकन केले. अतिशय कमी वेळेत शेळगाव केंद्रातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा महांडोळ या शाळेत विविध भौतिक सुविधा, शैक्षणिक साहित्य, विद्यार्थी प्रिय वातावरण यामुळे महांडोळ जिल्हा परिषद शाळेचा प्रथम क्रमांक आला.

# महिला सक्षमीकरण समाजाच्या प्रगतीचा मार्ग : हभप शेळके सृष्टी

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, १० जानेवारी :**



महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे लिंबाळा येथे विशेष वार्षिक श्रमसंगकार शिबिर चालू असून त्यात महाराष्ट्र महाविद्यालयाच्या बी कॉम प्रथम वर्षाची विद्यार्थिनी ह.भ.प. कु.सृष्टी शेळके यांचे महिला सक्षमीकरणावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी कीर्तनाच्या माध्यमातून बोलताना त्यांनी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महिला सक्षमीकरण करणे अत्यंत गरजेचे असल्याचे सांगितले.

शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि स्वावलंबनाच्या माध्यमातून महिलांना सक्षम बनवणे गरजेचे असल्याचे सांगितले. यासाठी शासन, नागरिकांनी पुढाकार घेऊन त्यांना संधी उपलब्ध करून दिल्यास महिलांचे आर्थिक व सामाजिक स्थान अधिक बळकट होईल असे प्रतिपादन केले. यावेळी गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला, सरपंच, उपसरपंच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.व्ही पी.सांडूर, प्रा.एस. एस बदनाळे, प्रा.एस.एम.दिवे स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# २६ जानेवारीपर्यंत मेनरोड परिसरातील समस्या सोडवा

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १० जानेवारी :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रभाग क्रमांक सहाच्या नूतन नगरसेविका सौ. कोमल दीपक हालसे यांनी आपल्या प्रभागातील मुख्य समस्या संदर्भात नगरीचे नगराध्यक्ष श्री स्वप्निल जी व्हते व मुख्य अधिकारी यांना निवेदन सादर केले.

यात त्यांनी व्यापाऱ्याच्या जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणजे जुना आंबेडकर चौक येथे नगरपरिषदेचे जे कॉम्प्लेक्स आहे त्यातील सुलभ स्वच्छतालय सर्व सुविधांनी युक्त तात्काळ चालू करावे. ग्रामीण रुग्णालय अहमदपूर येथे मूळ गावातील लोकांना औषध उपचारासाठी ये जा करण्यासाठी जो जुना रस्ता होता तो अधिकाऱ्याच्या खोडसाळपणामुळे बंद करण्यात आलेला आहे. तो तात्काळ खुला व्हावा. तसेच नगरपरिषदेचे साफसफाई करणारे कर्मचारी यांचा

## नगरसेवक व व्यापाऱ्यांचे यांचे नगराध्यांना निवेदन

काही वर्षापासून पगार रखडलेला आहे ते तात्काळ मार्गी लावावे. उन्हाळ्याची चाहूल लक्षात घेता प्रभागातील सर्व बोर विहीर याची दुरुस्ती व सुधारणा करण्यात यावी. शहरातील जाज्वल्य देवस्थान शिप्र गणेश मंदिर येथे दर बुधवारी महापूजा व महाप्रसाद असतो या ठिकाणी हजारो सदभक्त दर्शनासाठी येत असतात तेथील साफसफाई आठवड्याच्या प्रत्येक गुरुवारी करण्यात यावे.

या सर्व विषयी निवेदन सादर करण्यात आले असून येणाऱ्या प्रजासत्ताक दिनापर्यंत सर्व प्रश्न




सोडवावेत अन्यथा नगर परिषदेच्या प्रांगणात प्रजासत्ताक दिनास उपोषणास बसणार आहे असे निवेदना द्वारे कळविले आहे.

यावेळी दीपक हालसे, नगरसेवक प्रतीक बालाजी रेड्डी, माजी नगरसेवक धनंजय जोशी, राष्ट्रवादी शरदचंद्रजी पवार पक्षाचे युवक शहराध्यक्ष समीर खान पठाण, डॉक्टर मधुसूदन चेरेकर, दिलीप शास्त्री, कुमार महाराज, चव्हाण, सुनील भुतडा, मनोज सोनी, विजय सोनी, निलेश बाहेती, बालाजी काळवदे, सौरभ फुलारी, इत्यादी सह नागरिक व व्यापारी यांच्या वतीने निवेदन देण्यात आले.

# करिअरची पायाभरणी योग्य वेळी करा : यादव

**त.भा. वृत्तसेवा,**

**जळकोट, १० जानेवारी :** पुढील दहा वर्षाचा विचार करून करिअरची सुरुवात करायला सुरुवात करा १२ वी नंतर करिअरच्या




अनेक संधी उपलब्ध आहेत. त्या आपण शोधाव्यात आणि करिअरची पायाभरणी योग्यवेळी करावी असे प्रतिपादन संभाजीराव केंद्रे कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य जयदीप यादव यांनी केले.

येथील आकरावी आणि बारावी शाखेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यासाठी १२ वी नंतर करिअरच्या संधी या विषयावर बोलत होते .

याप्रसंगी या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य राहूल लटपटे होते. प्रा गौताळे एस.ए., प्रमुख पाहुणे म्हणून श्रीहरी वेदपाठक, (डी बी इन्स्ट्यूट ऑफ फॉर्मसी महाळंगा) ग्रंथपाल प्रा. डॉ. नामदेव राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना प्राचार्य डॉ जयदीप यादव यांनी टेक्निकल, मेडीकल, पॅरॉमेडीकल, लाईफ सायन्स, बायोमेडीकल, बी टेक फॉरेन्सीक सायन्स , हायब्रीड कोर्स उपलब्ध आहेत. बेसिक सायन्स मध्ये संशोधन करणाऱ्या संस्थेमधून शिक्षण घेतलात तर चांगले आर्थिक पॅकेज मिळविता येते.

टेक्निकल कोर्ससला आज एन्टरन्स परिक्षा आहेत नीट सारख्या परिक्षा द्यावी लागेल. पॅरामेडिकल कोर्समध्ये नर्सिंग, लॅब टेक्निशियन म्हणून काम करता येईल. जॉब प्रोफाइल तयार करा. एम्स सारख्या संस्थेतून पदवी प्राप्त केल्यानंतर सरकारी नोकरी मिळू शकते .फूड इन्डस्टिज लाईफ सायन्स बायो केमेस्ट्रिरी, मायक्रोबायलाजीस्ट बनता येते असे म्हणाले.

यावेळी प्रा मुंडे. जी.आर., प्रा. श्रीमंगले. बी. एल, प्रा.कांबळे डी.बी, व शिक्षकेत्तर कर्मचारी केंद्रे. बी.एच, कांबळे. पी.एस, सोनहिवरे.डी.एम, दाडगे.आर. ए, श्रीमती गायकवाड.ए.व्ही आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कांबळे डी. बी. यांनी केले तर आभार श्रीमंगले बी. एल. र यांनी मानले.

## लेखी आश्वासनानंतर उपोषण घेतले मागे

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरुर अनंतपाळ, १० जानेवारी :** शिरूर अनंतपाळ येथील तहसील कार्यालयासमोर वंचित बहुजन आघाडीच्या तालुका शाखेच्या वतीने विविध मागण्यांसाठी बेमुदत उपोषण सुरू होते. अखेर चौथ्या दिवशी प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी यांच्या नेतृत्वात येथील तहसील कार्यालयासमोर सोमवारपासून बेमुदत उपोषण सुरू होते. तहसील कार्यालय तसेच पंचायत समितीत बायोमॅट्रिक प्रणाली सुरू करावी, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासाठी तालुकास्तरावर जागा उपलब्ध करून द्यावी, आदी मागण्यांसाठी हे उपोषण सुरू होते.

# कासार शिरसी पोलीस ठाण्यात रेझींग डे

**त.भा. वृत्तसेवा,**

**कासार सिरसी, १० जानेवारी :** कासार शिरसी पोलीसांच्या वतीने संपूर्ण जिल्ह्यात रेझींग डे साजरा केला जात असुन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली येथील पोलीस ठाण्यात शुक्रवार दि. ९ जानेवारी रोजी रेझींग डे साजरा करण्यात आला.

यावेळी सहायक पोलिस निरीक्षक प्रविण राठोड विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, नागरीकांना व शालेय विद्यार्थ्यांना पोलीस प्रशासन कसे चालते व विविध हत्यारांची माहिती व्हावी यासाठी हा रेझींग डे साजरा करण्यात येतो. तर पोलीस उपनिरीक्षक अजय पाटील यांनी येथील मदर तेरेसा इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांना विविध हत्यारांची माहिती दिली.



यात बोअर रायफल, पिस्टल, सेल्फ लोडेड बंदुक, लाठी व सुरक्षा कवच या विषयी सखोल माहिती दिली तर विद्यार्थ्यांनी उत्सुफुर्त पणे सहभाग नोंदवत प्रशासकीय कामकाजाची माहिती घेतली. या रेझींग डे निमित्त सपोनि प्रविण राठोड, सपोनि प्रताप गर्जे, पोलिस उपनिरीक्षक अजय पाटील, पोलीस बालाजी जाधव, नवनाथ इंदापुरे, सुनिल मुळे, केशव ढोणे, गणेश सोनटक्के, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर मडोळे, शिक्षक अनिल जगताप, आकाश गायकवाड, संगिता गायकवाड, पल्लवी उमापुरे, वैष्णवी आकडे, कोमल पांचाळ, रंजना सुर्यवंशी, संध्या जाधव, विद्या बरकंबे, सविता अंतरेड्डी, संध्या गायकवाड, विद्यार्थी उपस्थित होते.

# अवकाश सफरीतून 'यशवंत'च्या विद्यार्थ्यांनी घेतले ब्रह्मांडाचे ज्ञान

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १० जानेवारी :** यशवंत विद्यालय, अहमदपूर येथील विद्यार्थ्यांनी 'फिरते तारांगण' या अनोख्या उपक्रमातून ब्रह्मांडातील अदभूत रहस्यांचा रोमांचक अनुभव घेतला. कला व भूगोल विभागाच्या नाविन्यपूर्ण कल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या ज्ञानकक्षा भक्कमपणे रुंदावल्या.

हवा भरून उभे केलेल्या विशेष डोममध्ये बसून विद्यार्थी जणू आकाशगंगेतच प्रवेश करतात. चंद्र, सूर्य, तारे आपल्या अगदी जवळ असल्याचा भास निर्माण होतो. पृथ्वी पलीकडील ताऱ्यांचे विश्र्व डोळ्यासमोर जिवंत उभे राहते आणि अवकाश किती विशाल आहे याची प्रत्यक्ष अनुभूती विद्यार्थ्यांना मिळते. सामान्यतः अतिरंजीत वाटणारी ही कल्पना, यशवंत विद्यालयात मात्र साकार झाली.

हा उपक्रम भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल प्रा. लि., जालना व पोलाद स्टील यांच्या संयुक्त विद्यमाने चव्हाणवाडी शाळेत आयोजित करण्यात आला. अंदाजे पाच ते आठ मीटर व्यासाचे डीजी स्टारचे हवा भरलेले तारांगण काही क्षणांत उभे राहत होते. मध्यभागी बसवलेल्या अत्याधुनिक फिश-आय लेन्स आणि उच्च दर्जाच्या रिझोल्युशन प्रोजेक्टरमुळे विद्यार्थ्यांना त्रिमितीय आकाश दर्शनाचा थक्क करणारा अनुभव मिळाला. एका वेळी ४५ ते ५० विद्यार्थी डोममध्ये बसू शकतात. हा उपक्रम सलग तीन दिवस राबविण्यात येत असून तब्बल ३५०० विद्यार्थी या फिरत्या तारांगणातून अवकाश सफरीचा आनंद घेणार आहेत.

यावेळी भूगोल शिक्षक विजय चव्हाण, राजाराम निलेवाड, अरुणकुमार चोचंडे, भिमराव कांबळे, मधुबाला आंधळे तसेच विज्ञान शिक्षक गिरीहरी गिरी, गौरव चवंडा, सांगवीकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दृकश्राव्य माध्यमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी कलाशिक्षक महादेव खळुरे यांचे विशेष योगदान राहिले.

या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. दत्तात्रय मठपती, प्राथमिक शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे, टागोर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोक सांगवीकर, सचिव डी. बी. लोहारे गुरुजी, उपाध्यक्ष डॉ. भालचंद्र पैके, सहसचिव डॉ. सुनिता चवळे, प्राचार्य गजानन शिंदे, उपमुख्याध्यापक माधव वाघमारे, पर्यवेक्षक रामलिंग तत्तापुरे, शिवाजी सुर्यवंशी आदींनी कौतुक व अभिनंदन केले.

यशवंत विद्यालयातील 'फिरते तारांगण' हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला पंख देणारा, विज्ञान-भूगोल शिक्षणाला नवी दिशा देणारा आणि ब्रह्मांडाकडे पाहण्याची दृष्टी बदलणारा ठरला आहे.

## अहमदपूरमध्ये शेतकरी प्रशिक्षण संपन्न

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १० जानेवारी :** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत, तालुका कृषी अधिकारी कार्यालय अहमदपूर यांच्या वतीने राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान (कडधान्य) २०२५-२६ अंतर्गत पीक पद्धतीवर आधारित एकदिवसीय शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन सुनेगाव (शें.) येथे करण्यात आले होते. खरीप व रब्बी हंगामातील कडधान्य उत्पादकता वाढवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राम जायभाये हे होते . या कार्यक्रमात कृषी विभागाच्या विविध अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना सखोल तांत्रिक मार्गदर्शन केले. यात दिलीप जाधव (मंडळ कृषी अधिकारी) यांनी तूर पिकाचे लागवड तंत्रज्ञान, एकात्मिक खत व्यवस्थापन आणि मर रोगावर उपाययोजना यावर माहिती दिली. तसेच 'महाविस्तार ए आय प'ची उपयुक्तता आणि 'प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना' यांसारख्या शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.




# राजीव गांधी तंत्रनिकेतन महाविद्यालयात चर्चासत्र

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १० जानेवारी :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ही देशातील अग्रगण्य विद्यार्थी संघटना असून गेल्या ७७ वर्षांपासून शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधावा या उद्देशाने अभाविपतर्फे विविध उपक्रम राबवले जात आहेत.

अभाविप दरवर्षी राज्यस्तरीयप्रकल्प प्रदर्शनाचे आयोजन करते. यावर्षी हा कार्यक्रम छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आला असून, या माध्यमातून विद्यार्थ्यांना उद्योगपती,

## विद्यार्थ्यांना उद्योगविश्वाशी जोडणारा दिशादर्शक उपक्रम

शिक्षणतज्ज्ञ व समाजाशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले जाणार आहे. तसेच शैक्षणिक क्षेत्र आणि उद्योगजगत यांमधील दरी कमी करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर, राजीव गांधी तंत्रनिकेतन महाविद्यालय, उदगीर येथे अभाविपतर्फे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी उदगीर येथील नारायणा ॲग्रो ऑईल्सचे व्यवस्थापकीय संचालक सागर महाजन हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना उद्योग, नवोपक्रम, स्टार्टअप ,स्वप्न, संधी तसेच करिअर नियोजनाबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

या प्रसंगी अभाविप लातूर विभाग संघटन मंत्री महेश भवर यांनी अभाविपची भूमिका व उपक्रमाची सविस्तर मांडणी केली.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य मा. जाधव उपस्थित होते त्यांनी अभाविपच्या या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांसाठी अशा मार्गदर्शक कार्यक्रमांची गरज अधोरेखित केली.

अभाविपतर्फे राबविण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख शिक्षणाकडे वळवणारा आणि त्यांच्या भविष्यातील करिअरला नवी दिशा देणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. यावेळी अभाविप उदगीर शहर मंत्री सुमित लाल उपस्थीत होते.

धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ‘इग्नाईट कन्व्हेंशन-२०२६’ अंतर्गत उद्या एकदिवसीय कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० जानेवारी -**

धाराशिवमध्ये, दि.१२ जानेवारी २०२६ रोजी, ‘इग्नाईट कन्व्हेंशन-२०२६’ अंतर्गत एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहे. या कार्यशाळेत राज्याच्या आर्थिक विकासात मोलाचे योगदान देणाऱ्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) क्षेत्रावर भर देऊन त्यांची कार्यक्षमता व उत्पादकता वाढविणे, रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे, एक जिल्हा - एक उत्पादन उपक्रमाला चालना देणे आणि निर्यातवृद्धीस प्रोत्साहन देणे यावर मार्गदर्शन केले जाणार आहे.

जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली ही कार्यशाळा सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सेंट्रल बिल्डिंगजवळ, धाराशिव येथे होणार आहे.

या उपक्रमात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटक, निर्यातदार, नवउद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, औद्योगिक वसाहती, शेतकरी सहकारी संस्था, प्रक्रिया उद्योग केंद्रे, तसेच राज्य शासनाचे अधिकारी, जिल्हा निर्यात प्रचालन समितीचे सदस्य, बँक प्रतिनिधी व संशोधक उपस्थित राहणार आहेत.



### संक्षिप्त वृत्त...



### मुर्शदपूर येथे सभामंडपाचे आ. प्रविण स्वामी यांच्या हस्ते भूमिपूजन

**धाराशिव, दि.१० जानेवारी -**

लोहारा तालुक्यातील मुर्शदपूर गावामध्ये आमदार निधीमधून उभारण्यात येणाऱ्या सभामंडपाचे भूमिपूजन सोहळा उत्साहात पार पडला. या सभामंडपाचे भूमिपूजन आ. प्रविण स्वामी, दीपक जवळगे व अजिंक्य पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बळवंत पाटील, भानुदास मोरे, पवन मोरे, सुनील मुगळे, शिवराम मोरे, बाबू चाकोरे, भीमा कोलाडे, महादेव घोडके, अशोक सुरवसे, भालचंद्र घोडके, विनोद गोबाडे, बालाजी कदेरे, नामदेव घोडके, विष्णू घोडके, भास्कर मोरे, नितीन मोरे, रामचंद्र घोडके, यांच्यासह गावातील अनेक प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सभामंडपामुळे गावातील सामाजिक, सांस्कृतिक व सार्वजनिक कार्यक्रमांसाठी सुविधा उपलब्ध होणार असून ग्रामस्थांनी या विकासकामाबद्दल समाधान व्यक्त केले.



### उपासे सरिताने जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत पटकावला प्रथम क्रमांक

**उमरगा, दि.१० जानेवारी -**

उमरगा तालुक्याच्या जिल्हास्तरीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत २०० मीटर चालण्याच्या स्पर्धेत जिल्हा परिषद प्रशाला, मुळज येथील प्राथमिक पदवीधर शिक्षिका उपासे सरिता यांनी प्रथम क्रमांक मिळवून तालुक्याचे नाव उज्वल केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे उमरगा तालुक्याच्या शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत भर पडली असून, त्यांच्या कर्तृत्वाचे सर्व स्तरातून मनापासून अभिनंदन व कौतुक केले जात आहे. शिक्षकवर्ग, सहकारी, विद्यार्थी तसेच पालक वर्गाकडूनही उपासे सरितावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



### डॉ. तनवीर शेख हिचा सत्कार

**तुळजापूर, दि.१० जानेवारी -**

येथील इकरामुद्दीन शेख यांची कन्या डॉ. तनवीर यांनी दंतशास्त्रातील पदवी (BDS) यशस्वीरीत्या पूर्ण करून उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल नवनिर्वाचित नगरसेविका प्रियंका गंगणे यांनी त्यांचा सत्कार केला. ही पदवी तिला महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्सेस (MUHS), नाशिक येथून प्राप्त झाली आहे. कठोर परिश्रम, सातत्य आणि उत्कृष्ट शैक्षणिक गुणवत्तेच्या जोरावर या अभ्यासक्रमात टॉपर रँक मिळवत दंतशास्त्र क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. पदवी शिक्षणाच्या कालावधीत तिने शैक्षणिक गुणवत्ता, चिकित्सक दृष्टिकोन तसेच रुग्णसेवेसंबंधी असलेली विशेष आवड व जिद्द दाखवत तुळजापूरचे नाव उज्ज्वल केले आहे.

# मराठा उद्योजकांनी समाज घडविण्याचे कार्य करावे : बी.बी. ठोंबरे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० जानेवारी -**

धाराशिव येथे मराठा उद्योजक संघटना (एमईए) वतीने दि.१० जानेवारी २०२६ रोजी भव्य मेळावा पार पडला. या कार्यक्रमात मराठा समाजातील उद्योजकांना एकत्र आणून त्यांच्या व्यवसायाला प्रोत्साहन देणे तसेच तरुणांना रोजगार निर्मितीच्या संधी उपलब्ध करून देणे हाच उद्देश ठेवण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मंचावर नॅचरल शुगर उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष बी.बी. ठोंबरे, तसेच उद्योजक हनुमंत मडके, विक्रम गायकवाड, पी.के. मुंडे, चित्राव गोरे, विजय बारकुल, सतीश देशमुख, उमेश सोकांडे, विक्रम नरसाळे, बालाजी येरुळे, आश्रम काळे आदी उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना बी.बी. ठोंबरे यांनी सांगितले की, मराठा समाजातील तरुणांनी रोजगार निर्मितीत सक्रिय सहभागी व्हावे. सर्वांना नोकऱ्या मिळत नसल्याने उद्योजकांनी उद्योग उभारणीत लक्ष केंद्रीत करावे. ग्रामीण भागात शेतीमाल प्रक्रिया, पशुपालन आणि इतर क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात उद्योगाची संधी उपलब्ध आहे. मराठा तरुणांनी एकत्र येऊन या क्षेत्रात उद्योग उभारावे, असे त्यांनी आवाहन केले.



कार्यक्रमाचे आयोजक व एमईए अध्यक्ष विक्रम गायकवाड यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट करत सांगितले की, उद्योजकांना एकत्र आणून समाजातील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे हा आमचा मुख्य हेतू आहे. उद्योजकांनी आपल्या उद्योगाबाबत भीती बाळगू नये; त्यांना कर्जाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

मेळाव्यात उपस्थित उद्योजकांनी देखील मराठा समाजातील उद्योजकांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले आणि धाराशिव शहर व जिल्ह्यातील उद्योजकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दौलत निपाणीकर यांनी केले. मेळाव्यामध्ये अनेक उद्योजकांनी आपले प्रश्न विचारले आणि मार्गदर्शन मिळवले.

या कार्यक्रमात मराठा समाजातील तरुण उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते आणि रोजगार निर्मिती व उद्योजकतेला चालना मिळवण्याचा संकल्प केला.

## भाजप युवा नेते मल्हार पाटील यांची परंड्याला सदिच्छा भेट



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१० जानेवारी -**

**सुजितसिंह ठाकूर यांच्याकडून सत्कार, जि.प. निवडणूक तयारीवर चर्चा...**

भाजपाचे युवा नेते मल्हार राणाजगजितसिंह पाटील यांनी परंडा येथे भाजपाच्या संपर्क कार्यालयात सदिच्छा भेट देत भाजप नेते व धाराशिव जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक प्रमुख मा. आमदार सुजितसिंह ठाकूर यांचा सत्कार केला. याप्रसंगी मल्हार पाटील यांचाही सत्कार करून त्यांचे स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमास भाजप परंडा तालुकाध्यक्ष अरविंद रगडे, धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष ॲड. संतोष सूर्यवंशी, भाजप नेते सुखदेव टोंपे, डोमगावचे माजी सरपंच मनोहर मिस्कीन, भाजप युवा मोर्चा परंडा शहराध्यक्ष व नगरसेवक अविनाश विधाते, नगरसेवक समरजीतसिंह ठाकूर, अकिब पठाण, उत्तम शिंदे आदी उपस्थित होते.

यावेळी मल्हार पाटील यांनी येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटन बळकट करण्यासह विविध विकास कामांबाबत सविस्तर चर्चा केली.

## आदर्श अंगणवाडी पर्यवेक्षिका, सेविकांना आ. प्रविण स्वामी यांच्या हस्ते पुरस्कार वितरण

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१० जानेवारी -**

उमरगा तालुक्यातील पंचायत समिती सभागृहात आदर्श अंगणवाडी पर्यवेक्षिका, सेविका व मदतनीस पुरस्कार (सन २०२५-२६) अंतर्गत भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास उमरगा-लोहारा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रवीणजी स्वामी प्रमुख उपस्थित होते.

कार्यक्रमात तालुका आरोग्य अधिकारी डॉ. उमाकांत बिराजदार यांनी उपस्थित राहून महिलांना आरोग्यविषयक महत्त्वपूर्ण माहिती व मार्गदर्शन केले. तसेच वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्टच्या चंदा टेकाळे यांचीही उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंजुषा कुलकर्णी यांनी केले.


कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एम. एस. जमादार, बालविकास प्रकल्प अधिकारी होते. सिंधु माने यांनी आभार प्रदर्शन केले, तर



विद्या कांबळे यांनी महिलांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय कोथळीकर यांनी केले.

या कार्यक्रमात आदर्श अंगणवाडी पुरस्कार प्राप्त सेविका व मदतनीस यांचा सन्मान करण्यात आला. पुरस्कारार्थींमध्ये सेविका : सुरेखा ठाकूर (तालुका अध्यक्षा, अंगणवाडी महासंघ), तय्यबी मुजावर, अनिता स्वामी, सखुबाई पुजारी, उमा जमादार, पौर्णिमा खमितकर, शामल मुसंडे. मदतनीस : दुधंबी झाकडे, परविन परब, सरोजा सोनकांबळे, लता घोडके, भाग्यश्री कुंभार, भारतबाई गायकवाड, जहराबी मिरगाळे यांना पुरस्कार देण्यात आला.

यावेळी कार्यालयीन कर्मचारी राहुल सोनकांबळे, संतोष कांबळे, विकास झंपले यांच्यासह मोठ्या संख्येने अंगणवाडी सेविका, मदतनीस उपस्थित होत्या.




## दुहेरी पदावर मानधन उचलून फसवणूक; आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० जानेवारी -**

पोलीस पाटील व प्रशासन व लेखा सहाय्यक (कंत्राटी) अशी दोन पदे एकाच वेळी भूषवून दुहेरी मानधन उचलून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणातील आरोपी प्रवीण वसंत वराळे (रा. मुळेवाडी, ता.जि. धाराशिव) असे आहे. आरोपीने दि.५ जानेवारी २०१८ ते दि.१७ मार्च २०२५ या कालावधीत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, धाराशिव येथे प्रशासन व लेखा सहाय्यक (कंत्राटी) म्हणून पूर्णवेळ नोकरी करत असताना, त्याच कालावधीत पोलीस पाटील या पदाचेही मानधन उचलल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

विशेषतः आरोपीने ऑक्टोबर २०१८ ते फेब्रुवारी २०२० तसेच जानेवारी २०२१ ते डिसेंबर २०२३ या कालावधीत पोलीस पाटील पदाचे व प्रशासन व लेखा सहाय्यक (कंत्राटी) या दोन्ही पदांचे एकाच वेळी मानधन घेतल्याने शासनाची आर्थिक फसवणूक झाल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी फिर्यादी वनिता राजेंद्र डोंगरे (वय ४७, व्यवसाय नोकरी, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, धाराशिव) यांनी दि.९ जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास आनंदनगर पोलीस ठाण्याच्या वतीने सुरू आहे.

## रुईभर शाळेतील विद्यार्थ्यांची पोस्ट ऑफिसला भेट

**‘काहीतरी नवीन जाणून घेऊया’ उपक्रमांतर्गत प्रत्यक्ष अनुभव**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१० जानेवारी -**

जयप्रकाश माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथील विद्यार्थ्यांनी काहीतरी नवीन जाणून घेऊया उपक्रमांतर्गत धाराशिव येथील मुख्य पोस्ट ऑफिसला भेट देऊन डाक सेवेचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवातून जाणून घेतले.

भारतीय डाक सेवा मागील १५० वर्षांपासून जनतेला विश्वासनीय सेवा पुरवत आहे. पोस्ट ऑफिसच्या माध्यमातून पत्र, पार्सल, मनीऑर्डर, स्पीड पोस्ट, बिजनेस पोस्ट, एक्सप्रेस पार्सल, डाक बचत बँक, डाक जीवन विमा, ई-पोस्ट, ई-पेमेंट, आधार सेवा, एटीएम सेवा, नेट बँकिंग, ई-पासबुक, डीबीटी सुविधा, सुकन्या योजना, अल्पबचत योजना, आंतरराष्ट्रीय सेवा अशा विविध सेवा राबवल्या जातात.



धाराशिव पोस्ट ऑफिसचे मुख्य कार्यालय सोलापूर येथे असून, देश पातळीवरील मुख्य कार्यालय नवी दिल्ली येथे आहे. विद्यार्थ्यांना मुख्य पोस्टमास्टर व्ही.व्ही. गोवर्धन व डाक सहाय्यक अमोल जाधव, अजय बोयने, कृष्णा तांबे यांनी टपाल विभागाच्या विविध योजनांची माहिती देऊन कार्यप्रणालीवर सखोल मार्गदर्शन केले.

या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाष दादा कोळगे, रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, शिवकन्या साळुंके, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रोत्साहन दिले.

# जन्मतः अंध असूनही स्वरांच्या बळावर आयुष्य जगणारा ‘भीमा सगट’

**आई गेल्यानंतरही थांबली नाही भक्तीची आणि कलेची साधना...**

**तभा वृत्तसेवा / अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.१० जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील तीर्थ बुद्रुक येथील भीमा सगट हा जन्मतः अंध असलेला कलाकार आजही आपल्या स्वरांच्या आधारे आयुष्याशी झुंज देत आहे. वयाच्या अवघ्या पाच-दहा वर्षांपासून आईच्या साथीने गावोगावी, घरोघरी जाऊन देवाधीशांची सुरेल अशी भावगीते, भक्तीगिते गात उदरनिर्वाह करणारा भीमा आज वयाच्या ८० वर्षांहून अधिक वयात एकाकी जीवन जगत आहे.

भीमाच्या आयुष्यातील सर्वात मोठा आधार असलेली त्याची आई सुमारे दहा वर्षांपूर्वी देवाघरी गेली. आईच्या निधनानंतरही भीमा खचला नाही. आजही तो आपल्या गावातील तीर्थ येथील नागोबा मंदिरात बसून



भक्त जे देतील त्यावर आपली गुजराण करत आहे. आजमितीला भावाचे मुले, सुना त्यांचा सांभाळ करत आहेत.

पूर्णतः अंध असूनही भीमाची दिशाज्ञानाची क्षमता विलक्षण होती. तीर्थ बुद्रुकसह आजूबाजूच्या दहा-पाच गावांत तो दररोज फिरत असे.

दिवसभर शेकडो गाणी गाऊन मिळेल ते दान घेऊन तो रात्री न चुकता आपल्या गावात परतत असे. वाड्या-वस्त्या, बाजारपेठा, बस स्टॉप, हॉटेल्स हे सर्व तो कोणत्याही मदतीशिवाय सहज ओळखत असे.

**समाज आणि प्रशासनाकडे अपेक्षा**

ज्याने आयुष्यभर लोकांना भक्तीरसात न्हाऊ घातले, त्या कलाकाराच्या आयुष्याला आज आधाराची गरज आहे. अशा दुर्लक्षित कलाकारांसाठी शासन, समाजसेवी संस्था आणि लोकप्रतिनिधींनी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा ग्रामस्थ आणि जाणकार व्यक्त करत आहेत.

**आयुष्यभर कलेची सेवा**

भीमा सगटने आयुष्यभर कोणत्याही मंचाची, प्रसिद्धीची अपेक्षा न करता फक्त भक्ती आणि कलेची सेवा केली. आज मात्र आयुष्याच्या संध्याकाळी हा कलाकार समाजाच्या दृष्टीआड जातो आहे, ही बाब विचार करायला लावणारी आहे.

भीमाची स्मरणशक्तीही तितकीच थक्क करणारी आहे. एकदा कानावर पडलेला कोणाचाही आवाज तो कायमस्वरूपी लक्षात ठेवत असे.

गाणी, अभंग, भजने यांचा अक्षरशः खजिना त्याच्या स्मरणात साठलेला आहे.जन्मतः अंध असूनही आत्मविश्वास, श्रद्धा आणि कलेच्या बळावर आयुष्य जगणारा भीमा सगट हा केवळ व्यक्ती नसून एक जिवंत प्रेरणा आहे. अशा कलाकारांची दखल घेणे आणि त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांना सन्मान व आधार देणे, हेच खरे सामाजिक भान ठरेल.

आरळी बुद्रुक येथील प्रगतशील शेतकरी प्रभाकर उळेकर यांनी मुलीच्या म्हणजे महाराष्ट्राची स्टार युवा भारूडकार कृष्णाई उळेकर हिच्या वाढदिवस निमित्ताने अंध गायक असणारे भीमा सगट यांची मित्र परिवारासह सदिच्छा भेट घेऊन भरपेहराव कपडे, टॉवेल, चादर, शॉल, किराणा साहित्य देऊन सन्मान केला.

याप्रसंगी मित्र अमोल कुलकर्णी, पटाडे नाना,बाळू उळेकर,रवी उळेकर, सिद्राम आगलावे यांनीही आर्थिक मदत केली. लहान पनापासूनच भीमाची गाणे ऐकून मन प्रसन्न होत असल्याची भावना प्रभाकर उळेकर यांनी व्यक्त केली.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## मतदान केंद्र कर्मचाऱ्यांचे दुसरे प्रशिक्षण उत्साहात

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी मतदान केंद्राध्यक्ष तथा मतदान कर्मचाऱ्यांसाठीचे दुसरे प्रशिक्षण शुक्रवारी दयानंद सभागृहात उत्साहात पार पडले. या अधिकारी- कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रावरील जबाबदारीविषयीची माहिती देण्यात आली.

यावेळी मनपा उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, निवडणूक निर्णय अधिकारी सुशांत शिंदे, रोहिणी नऱ्हे, मंजुषा लटपटे, शरद झाडके, संदीप कुलकर्णी, सौदागर तांदळे यांच्या प्रमुख उपस्थितीत हे प्रशिक्षण पार पडले. दोन सत्रात पार पडलेल्या या प्रशिक्षणात निवडणूक साहित्य स्वीकृती व तपासणी, मतदानाच्या पूर्वसंध्येला केंद्रावरील पूर्वतयारी, प्रत्यक्ष मतदान सुरु होण्यापूर्वीची कामे, मतदानास प्रत्यक्ष सुरुवात, मतदान केंद्राध्यक्ष व कर्मचारी यांची कामे त्याचप्रमाणे मतदान केंद्राध्यक्ष यांनी महत्वाच्या प्रकरणी कारवायांची कार्यवाही, अहवालात माहिती भरणे व मतदान साहित्य परत करणे या प्रमुख विषयांबाबत उपस्थित सर्वांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सहभागी अधिकारी- कर्मचाऱ्यांना ईव्हीएम तपासणी, मतदान केंद्रात प्रवेशास पात्र व्यक्त, मतदान संपविणे आदी विषयांचे प्रशिक्षण देण्यात आले.

# लातूर मनपा निवडणुकीचे निकाल धक्कादायक..?

## लातूरचा सुजाण मतदार उमेदवारांना लागू देईना 'मनाचा थांग'! अनेक प्रभागात पक्ष नव्हे तर 'चेहरा' पाहून होणार मतदान!

**त.भा. वृत्तसेवा/श्रीधर स्वामी**

**लातूर, १० जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत अनेक प्रभागांचे निकाल अनपेक्षित आणि धक्कादायक राहतील, असे एकंदर परिस्थितीवरून निदर्शनास येत आहे. लातूरचा सुजाण मतदार मतदानाचा दिवस जस-जसा जवळ येत आहे तस -तसे आपल्या मनाचा निश्चित थांग लागू देत नसल्याचे वास्तव चित्र पाहावयास मिळत आहे. लातुरात यावेळी कधी नव्हे ते अनेक प्रभागात राजकीय पक्ष किंवा पक्षाचे चिन्ह न पाहता उमेदवाराचा 'चेहरा' पाहून मतदान होणार असल्याचे संकेतही मिळत आहेत.

मराठवाड्यात सर्वाधिक वेगाने विकसित होत जाणारे शहर म्हणूनही लातूरकडे पाहिले जाते. फारशी औद्योगिक प्रगती साधलेली नसतानाही राजकीय क्षेत्रातील जिल्ह्याच्या आजपर्यंतच्या योगदानामुळे लातूर जिल्हा प्रदेश तसेच राष्ट्रीय पातळीवरील राजकारणाचा केंद्रबिंदूही राहिलेला आहे, हे सर्वज्ञात आहे. दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख आणि आता ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनामुळे लातूरची राष्ट्रीय तसेच प्रादेशिक राजकारणावरील पकड बऱ्याच अंशी ढिली झाली आहे. राजकीय परिस्थिती कधीही कायमस्वरूपी एखाद्या पक्षाला पोषक किंवा नुकसानकारक राहत नसते. कालमानानुसार त्यामध्ये बदल अपेक्षितच असतो. बदलत्या राजकीय स्थित्यंतरात आजमितीस भाजपाला पोषक असे वातावरण सगळीकडे तयार केले जात असल्याचे पाहावयास मिळते. अन्य पक्षातून भाजपाकडे वाढलेला नेते-कार्यकर्त्यांचा ओघ हा तत्वाच्या राजकारणासाठी नव्हे तर स्वार्थाच्या कारणावरून होत आहेत, हे आता कोणालाही वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

चालू असलेल्या महानगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी आता हळूहळू निर्णायक टप्प्याकडे वाटचाल करत आहे. निवडणुकीच्या अगोदर मनपात पूर्ण बहुमताच्या स्पर्धेत असणाऱ्या भाजपाची अवस्था प्रत्यक्ष निवडणुकीदरम्यान काहीशी 'दोलायमान' झाल्याच्या प्रतिक्रिया जनमाणसातून उमटत असलेल्या ऐकायला मिळत आहेत. त्यातच उमेदवारी देताना भाजपकडून 'निष्ठावंतां' नाडावलून नव्या चेहऱ्यांना संधी देणे, भाजप प्रदेशाध्यक्षांनी अनावधानाने (?) लातुरात विलासराव देशमुखांबद्दलचे वक्तव्य करणे, भाजपातीलच निष्ठावंतांनी स्वतंत्र चूल मांडणे यासारख्या बाबींमुळे भाजपाला शेवटच्या टप्प्यात यशासाठी झगडावे लागण्याची चिन्हे




दिसत आहेत. काँग्रेसमधील काही चर्चेतले चेहरे ऐनवेळी अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेल्याने त्यांनीही काँग्रेसपुढे पेच निर्माण केला आहे. त्यामुळे या निवडणुकीत भाजप, भाजप निष्ठावंत, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), आम आदमी पार्टी, दोन्ही शिवसेना आपआपले नशीब आजमावत आहेत. लातूर शहर मनपाच्या स्थापनेनंतरची ही तिसरी सार्वत्रिक निवडणूक अतिशय चुरशीची होत आहे. शहरात अनेक प्रभागात काही अपक्षांनीही प्रचारात चांगलाच जोर पकडल्याचे पाहावयास मिळत आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार केवळ अकरा जागा लढवत असून प्राप्त परिस्थितीवरून प्रमुख राजकीय पक्षांच्या मानाने कमी जागा लढवूनही निवडणूक निकालानंतर एकंदर यशाच्या टक्केवारीत अग्रेसर ठरते की काय? असेही बोलले जात आहे.

लातूरचा सुजाण आणि चाणाक्ष मतदार केंद्रात आणि राज्यात भाजपचे सरकार आहे, त्यामुळे विकास कामाची गती कायम राहावी म्हणून भाजपच्या पाठीशी राहिल, असा मतप्रवाहही सुशिक्षित मतदारांतून व्यक्त केला जात आहे. मात्र, हाच स्वतःला सुजाण आणि सुशिक्षित समजणारा मतदार मतदान करण्यासाठी धडाडीने पुढे सरसावताना दिसत नाही. त्यांच्या तुलनेत अशिक्षित मतदार प्राधान्याने मतदानासाठी हिरीरीने पुढे येत असलेले आतापर्यंतच्या अनेक निवडणुकात पाहायला मिळाले आहे. निवडणुकीदरम्यान प्रमुख राजकीय पक्षात घडलेल्या घटनांवरून बहुसंख्य मतदार यावेळी मतदान करताना पक्ष-चिन्ह न पाहता उमेदवाराचा 'चेहरा' पाहून मतदान करण्याच्या मानसिकतेत असल्याचेही प्रकर्षाने जाणवते. त्यामुळे या निवडणुकीत शहराच्या काही प्रभागातील निकाल धक्कादायक आणि अनपेक्षित आल्यास फारसे नवल वाटायला नको, असे दिसून येत आहे.

## लातूर 'स्थागुशा' ने पकडला ४.९ लाखांचा गुटखा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० जानेवारी :** लातूर : लातूरच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने धडाकेबाज कामगिरी करत महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले विविध प्रकारचे गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखू असा एकूण ४ लाख ९ हजार ४९६ रुपयांचा मुद्देमाल आणि त्यासाठी उपयोगात आणलेली सात लाख रुपयांची कार जप्त केली आहे.

सार्वजनिक आरोग्याला गंभीर धोका निर्माण करणाऱ्या तसेच तरुण पिढीचे भवितव्य उद्ध्वस्त करणाऱ्या महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध वाहतूक व विक्रीविरोधात लातूर पोलिसांनी कठोर भूमिका घेत ही मोठी कारवाई केली आहे. उदगीर शहरातील उमा चौक ते शिवाजी चौक परिसरात एका पांढऱ्या रंगाच्या टोयोटा ईटॉस कारमधून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ विक्रीसाठी वाहतूक करण्यात येत असल्याची माहिती मिळाल्यावरून पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या आदेशाने ही कार्यवाही करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक उमा चौक परिसरात सापळा लावून उभे असताना वर्णनास जुळणारी टोयोटा ईटॉस कार क्र. एमएच २४ - ए एफ ४६०० मधून हा गुटखा, सुगंधी तंबाखू पकडली. याप्रकरणी आरोपी माधव तुकाराम मोरे, रा. जांब बु., ता. मुखेड, जि. नांदेड. हा अंधाराचा फायदा घेऊन फरार झाला. त्याच्याविरुद्ध उदगीर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## गंगापुरात आज लक्ष्मण शक्तीचा कार्यक्रम

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० जानेवारी :** लातूर शहरापासून जवळच असलेल्या गंगापूर येथे रविवार, दि. ११ जानेवारी २०२६ रोजी लक्ष्मण शक्तीचे आयोजन करण्यात आले आहे. पहाटे पाच वाजल्यापासून लक्ष्मण शक्तीचा हा कार्यक्रम सुरु होणार असून तो सायंकाळी चार वाजेपर्यंत चालणार आहे. लक्ष्मणशक्तीचा कार्यक्रम संपल्यानंतर आरती व महाप्रसाद होणार आहे. मागच्या अनेक वर्षांपासून गंगापूर येथील मंदिरात रामायण ग्रंथाचे वाचन केले जाते. रामायण कथा ऐकण्यासाठी भाविक मोठ्या प्रमाणात गर्दी करत असतात. ग्रामीण भागातील अनेक गावात नियमित अशा प्रकारचे धार्मिक उपक्रम सातत्याने राबविण्यात येत असतात. रविवारच्या लक्ष्मणशक्तीचा आणि महाप्रसादाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पं. अरविंदकुमार आझाद यांचे आज तबला वादन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० जानेवारी :** सुरताल संगीत महाविद्यालयच्या वतीने भारतीय शास्त्रीय संगीतातील महान गुरू पं.शांताराम चिगरी गुरुजी व शकुंतलादेवी चिगरी यांच्या स्मरणार्थ सुरताल संगीत सभेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दि. ११ जानेवारी रोजी सायंकाळी सात वाजता वाजता कै. प्रयागबाई पाटील कनिष्ठ महाविद्यालय सभागृह, मयूरबन कॉलनी अंबाजोगाई रोड लातूर येथे बनारस घराण्याचे महान तबलावादक पं. अरविंद कुमार आझाद यांचे स्वतंत्र तबलावादन होणार आहे.



पं.अरविंद कुमार आझाद जगप्रसिद्ध तबलावादक असून पद्मविभूषण पं.किशन महाराज यांचे ते शिष्य आहेत. त्यांना हार्मोनियमची साथ पं . बाबुराव बोरगावकर हे करणार आहेत. तरी लातूर मधील सर्व कलाकार, रसिक, संगीत शिक्षक विद्यार्थी यांनी संगीत सभेसाठी उपस्थित रहावे असे आवाहन पं.मुकेश जाधव, अंगद गायकवाड, सोनू डगवाले, संदीपान जगदाळे, संजय सुवर्णकार, प्रमोद भोयरेकर, विशाल जाधव, अमर कडतने, मीनाक्षी कोळी, नभा बडे, हरीश कुलकर्णी, वैभव जाधव, परमेश्वर पाटील व सुरताल संगीत महाविद्यालयातील सर्व सदस्यांनी केले आहे .

## आ. कराडांच्या नेतृत्वात रेणापूर सरपंच, पोहरेगावच्या माजी उपसरपंचासह अनेकांचा भाजपात जाहीर प्रवेश

### पोहरेगावमध्ये काँग्रेसला पडले खिंडार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० जानेवारी :** आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वात लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील होणाऱ्या विविध विकास कामांना प्रेरीत होऊन समसापूर ता. रेणापूर येथील सरपंच सौ. उज्वलाताई महादेव बरीदे आणि पोहरेगाव व पोहरेगाव तांडा ग्रुप ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच शंकर राठोड, भिमराव राठोड यांच्यासह अनेकांनी भाजपा नेते आमदार रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वात लातूर येथील संवाद कार्यालयात भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

यावेळी माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे, नाथसिंह देशमुख, विक्रमकाका शिंदे, नवनाथ भोसले, अनिल भिसे, अॅड. दशरथ सरवदे, भाजपा तालुकाध्यक्ष शरद दरेकर, रामराव मोरे, संतोष चव्हाण, विजय गंभिरे, अॅड. रमेश खाडप, श्रीमंत नागरगोजे, अशोक राठोड यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. या पक्ष प्रवेशामूळे पोहरेगाव जिल्हा परिषद गटात काँग्रेसला खिंडार पडले असून भाजपाची ताकद वाढली आहे.

समसापूर येथील काँग्रेसच्या सरपंच सौ. उज्वलाताई महादेव बरीदे, उपसरपंच लिंबराज चव्हाण, ग्रामपंचायत सदस्या रेखा चौधरी, छाया कलमे, सुरेखा काळे, बालाजी उपाडे यांनी आमदार रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

त्यांच्यासमवेत समसापूर येथील महादेव बरीदे, मदन चौधरी, बालाजी काळे, परमेश्वर फुलसे, शैलेश बरीदे, मनोज दत्त, बाबासाहेब इंगावले तर




सुमठाणा येथील प्रविण साखरे, बिटरगाव येथील भागवत पाटील यांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

पोहरेगाव तांडा येथील माजी उपसरपंच शंकर राठोड, भिमराव राठोड, माजी ग्रामपंचायत सदस्य व्यंकट पवार यांच्यासह अशोक राठोड, सर्जेराव राठोड, भागवत आडे, कविता आडे, पांडुरंग जाधव, बालासाहेब राठोड, दत्ता राठोड, कृष्णा राठोड, संतराम पवार, शिवाजी चव्हाण, रामराव राठोड तसेच कोळगाव येथील सतिश राठोड, राहुल राठोड यांनी भाजपात प्रवेश केला.

## जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी उमेदवारीसाठी काँग्रेसकडे इच्छुकांचा वाढता प्रतिसाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० जानेवारी :** आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका लवकरच घोषित होणार आहेत. या निवडणुकीसाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसकडे उमेदवारी मागणी करण्यासाठी इच्छुकांचा वाढता प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे काँग्रेसने इच्छुकांचे अर्ज स्वीकारण्यासाठी दि. १६ जानेवारी २०२६ पर्यंतची मुदत दिली आहे.

लातूर जिल्ह्यातील या आगामी निवडणुकांची जोरदार तयारीची सुरुवात लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीकडून युध्दपातळीवर सुरू करण्यात आली आहे. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी अधिकृत प्रसिद्धीपत्रक जारी करत लातूर जिल्ह्यातून जिल्हा परिषद व पंचायत समिती स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकी




करिता इच्छुक उमेदवारांचा वाढता प्रतिसाद पाहता अर्ज स्वीकारण्यासाठीची मुदत वाढविण्यात आली असल्याचे जाहीर केले आहे.

यानुसार शुक्रवार दि.१६ जानेवारी पर्यंत काँग्रेस भवन, लातूर येथे इच्छुक उमेदवारांचे अर्ज स्विकारण्यात येणार आहेत. काँग्रेस पक्षाकडे जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी ३७३ इच्छुकांनी उमेदवारी मागणी केली असून वाढता प्रतिसाद व लातूर जिल्ह्यातील सर्व तालुकाध्यक्षांची विनंती लक्षात घेऊन अर्ज स्वीकारण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकण्यासाठी पक्षाने संपूर्ण वेळापत्रक अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आखले असून, संपूर्ण प्रक्रिया लातूरमधील काँग्रेस भवन येथूनच पार पाडण्यात येत आहे.

या निवड प्रक्रीयेतील अर्ज काँगेस भवन लातूर या ठिकाणी आशिष पाटील-जळकोट, बाबासाहेब गायकवाड-औसा , चंद्रशेखर दंडीमे-लातूर, सहदेव मस्के-लातूर, दगडूसाहेब पडीले- लातूर, प्रभाकर बंडगर (शिरूर अनंतपाळ-निलंगा), प्रा. डॉ. बालाजी वाघमारे (लातूर), बाळकृष्ण माने (रेणापूर),निळकंठ भोसले,धनराज टेकाळे यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. काँग्रेस पक्षाकडील उमेदवारीसाठीचे इच्छुकांचे अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पक्षाच्या जिल्हा निवड समितीची बैठक होणार आहे. या बैठकीमध्ये दाखल झालेल्या सर्व अर्जांची छाननी करून, उमेदवारांच्या नावांची शिफारस प्रदेश काँग्रेस कमिटीकडे पाठवण्यात येणार आहे. जिल्हा समितीने शिफारस केलेल्या नावांवर प्रदेश निवड समिती निर्णय होऊन प्रदेश निवड समिती या नावांवर अंतिम शिक्कामोर्तब करून उमेदवारांची यादी जाहीर करणार आहे, अशी महिती जिल्हाध्यक्ष साळुंके यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली.

## जिल्हा परिषदेच्या सात कर्मचाऱ्यांना नव्या वर्षात मिळाली पदोन्नतीची भेट

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १० जानेवारी :** लातूर जिल्हा परिषदेतील प्रदीर्घ काळापासून पदोन्नतीच्या प्रतीक्षेत असलेल्या सात कनिष्ठ कर्मचाऱ्यांना नव्या वर्षाच्या प्रारंभी पदोन्नतीची भेट मिळाली आहे.

जिल्हा परिषदेत कनिष्ठ प्रशासन अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या मनिषा दीपक चामे, सदाशिव कठाळू नवले, किशोर बाबुराव कवळीकर यांची सहाय्यक प्रशासन अधिकारी या वर्ग तुमच्या पदावर पदोन्नती करण्यात आली आहे. तसेच वरिष्ठ सहाय्यक पदावर कार्यरत असलेल्या विकास रावसाहेब पाटील, शुभांगी सुनील रोहिणीकर, आदिनाथ राजेंद्रनाथ सोमवंशी, बालाजी शिवाजी चवनहिप्परगे यांना कनिष्ठ प्रशासन अधिकारी जिल्हा सेवा वर्ग या पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. सध्या मनपा निवडणुकीची धामधूम चालू असल्याने कर्मचाऱ्यांना पदोन्नतीबद्दल शाश्र्वती वाटत नव्हती. परंतु मुख्य कार्यकारीअधिकारी राहुलकुमार मीना यांनी पदोन्नती दिल्याने या कर्मचाऱ्यांच्या समाधान व्यक्त होताना दिसत आहे.